# छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९३६ । वर्ष १४ अंक ७
मूल्य रुपये वीस



## धम्माल सुट्टीसाठी
## वासंतिक विशेषांक

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!

# भारोतेरी माटीर घोरे (बंगाली गीत)

भारोतेरी माटीर घोरे
खेतेर आडे नोदीर तीरे
बाजुक शुखेर बांशी ।।धृ. ।।

गोठेर धेनु
राखाल बेनु
तुलशी तोला, प्रोदिप जोला
बॉजाख प्राणे खुशी ।।१ ।।

दुदेर आजान
बाऊलेर गान
कोची कोलोतान, पाखीदेर ।।२ ।।

पारेर खेया, पाले हावा
नोदिर बुके, बाझीर गावा
चोलुक दिबा निशी ।।३ ।।

पोंचो नोदी गोदाबोरी
मोहोनोदी, आर काबेरीर
धेव मोरा भाषी ।
ओनेक घेरे, बारे बारे
येई खानेते, येई भारोते
जेनो फिरे आशी ।।४ ।।

**कवी – भूपेन हजारिका**
कविता संकेतस्थळावर ऐका
(कवितेचा अर्थ आतील पानावर)



# छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९३६। वर्ष १४ अंक ७

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २६१ वा अंक, वर्ष २२ अंक ९

प्रकाशन दिनांक – सौर ११ चैत्र शके १९३६/१ एप्रिल २०१४


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

वासंतिक विशेषांक

## • अंतरंग •


४. **संवाद** – महेन्द्र सेठिया

५. कथा ...**सुरुवात** – मंगला गोडबोले

१०. कविता... **कवितेची ओळ** –अंजली कुलकर्णी

११. ललित... **पहाट** – डॉ. यशवंत पाठक

१४. भाषाविकास.. **दोस्ती भाषेशी**

१५. माहितीपर... **कॅरममधील विज्ञान** – डॉ. वर्षा जोशी

१८. कृतिपर... **भाज्यांपासून आकर्षक कलाकृती** – अपर्णा म्हात्रे

१९. कथा ...**गारपीट** – किशोर पाटील

२३. विज्ञान तंत्रज्ञानातील कल्पकता... ९
**सक्तीची जोडणी** (Forced Relationship) – डॉ. नलिनी गुजराथी

२५. ललित... **गारेगारवाला** – कृष्णात खोत

३०. खेळ... **चला पत्ते खेळूया !** – शशिकांत काळे

३१. चित्रपट रसास्वाद... **उत्कंठावर्धक, वजनदार ग्रॅव्हिटी**– शिल्पा कुलकर्णी

३३. कविता... **मचाण** – आश्लेषा महाजन

३४. प्रेरक... **ध्येयासक्ती महान टेनिसपटूची** – श्रीकृष्ण रानडे

३५. कथा ...**ओळख गावाची** – हरिहर आठलेकर

४१. संवाद कौशल्य...१०
**मुलाखत – एक संवाद!** – विजय जोशी

४५. ललित... **अद्‌भुत अरुणाचल** – अभिजित हजारे

४७. कृतिपर... **ठोकळ्याची किमया** – डॉ. अरविंद गुप्ता

४८. **स्पर्धा आढावा व निर्णय** – सुलभा कुलकर्णी

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **भारोतेरी माटीर घोरे** (बंगाली गीत)– भूपेन हजारिका

**सुट्टीतील उपक्रम**–व्यक्तिकार्ये (१३), अभिवाचन कार्यशाळा(२२), लिहिते व्हा, जोडीकार्ये,कार्यानुभव उपक्रम (४०), प्रतिसादी वाचकवीर व्हा...१ (४९), सुट्टीतील शिबिरे (५०) **यांशिवाय** – विज्ञान प्रयोग(१७), विशेष कौतुक (२२), हाऽ हाऽ हाऽ(२४), नेतृत्व संवर्धन शिबिरे (२९), पक्षी जगत, मुखपृष्ठाच्या आतील पद्याचा भावार्थ (४३), सुट्टीतील शिबिरे, तुम्ही काय कराल अन् का कराल...? (५०)

**तळटिपेतील ओळी** – इतर राज्यातील सांस्कृतिक उत्सव



♦ **संपादक, प्रकाशक, मुद्रक** ♦
महेन्द्र सेठिया

♦ **कार्यकारी संपादक** ♦
शिल्पा कुलकर्णी

♦ **संपादक मंडळ** ♦
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

♦ **मुखपृष्ठ व आतील चित्रे** ♦
गिरीश सहस्रबुद्धे

♦ **संपर्क पत्ता** ♦
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org

**ई–मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org



**मासिकाची वर्गणी**
वार्षिक: ₹ १८०, द्वैवार्षिक: ₹ ३४०,
त्रैवार्षिक: ₹ ५००,
दशवार्षिक: ₹ १,५००.
**या अंकाची किंमत : ₹ २०**
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी- ₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा)


**मुखपृष्ठाविषयी –** आता दोन महिने सुट्टी, परीक्षा सुद्धा झाली. मग एवढ्या मोठ्या सुट्टीत काय काय करायचे? त्याच्या याद्याच तयार होतात. त्याचेच प्रतिनिधित्व करणारं हे मुखपृष्ठ.उन्हाळ्याची सुट्टी असल्याने सूर्य आणि पिवळा रंग यांचा भरपूर वापर केला आहे.

**– गिरीश सहस्रबुद्धे**


**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.**


वठलेल्या वृक्षासही ध्यास एक फुलण्याचा। आठवीत सुख-वैभव ऋतु वसंत येण्याचा।।

**अधिक जाणून घ्या : विवेकानंदमेळा –** अंदमान–निकोबार (१२ जानेवारी), स्वामी विवेकानंद जयंतीप्रीत्यर्थ.



**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

संवाद

**स्वयंशिक्षणासाठी पुढाकार घेणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,**

'सुट्टी' म्हटली की तुम्हा सर्वांना विलक्षण आनंद होतो, हो ना! कशाचा हा आनंद असतो बरं? मुक्ततेचा, हवं ते करण्याच्या स्वातंत्र्याचा, हवा तसा दिवस घालवण्याचा, मनसोक्त खेळण्याचा–भटकण्याचा... हवं तेव्हा उठण्याचा अन् हवं तितका वेळ झोपून राहाण्याचा, अभ्यास न करण्याचा अन् अभ्यासापोटी कोणीही रागावणार नाही याचाही! खरं ना!! पण खरं म्हटलं, तर सुट्टी सुरू झाली म्हणजे तुमचं पाठ्यपुस्तकी शिक्षण काही काळ थांबणार आणि अनुभव शिक्षणासाठी तुम्हाला 'तुमचा वेळ' मिळणार! 'तुमचा वेळ' म्हणजे तुम्हाला जे–जे अनुभव घ्यावेसे वाटतात, जे–जे नव्यानं शिकावंसं वाटतं, जे–जे करून पाहावंसं वाटतं ते–ते करण्यासाठी खास तुम्हाला मिळालेला वेळ! एरवी शाळा चालू असताना शाळेचा वेळ, शाळेत शिकण्याचे विषय, त्यांचं वेळापत्रक, गृहपाठ, परीक्षांचं वेळापत्रक हे काहीच तुमच्या हातात नसतं. ते कोणीतरी ठरवतं अन् त्याप्रमाणे तुम्हाला शिकावं, वागावं लागतं. वर्षातले ८ ते ९ महिने त्याच पद्धतीनं तुमचं शिक्षण चालू असतं. त्यामुळे बऱ्याचवेळा तुम्ही काय शिकावं, कोणते अनुभव घ्यावेत, हे सर्व दुसऱ्यांनी तुमच्यासाठी ठरवावं अशीच तुमच्यापैकी बहुतेकांना सवय लागलेली दिसते. मोडता येईल ही सवय? ही सुट्टी त्यासाठी वापरून पाहा.

यावर्षीची सुट्टी तुम्ही तुमच्या मनाप्रमाणे घालवा. म्हणजे फक्त झोप, आळस, टाइमपास, गप्पा, दूरदर्शनवर 'क्रिकेटच्या मॅचेस, सिरियल्स आणि पिक्चर्स' पाहाण्यात वा कॉम्प्युटर–मोबाईलवर गेम्स खेळण्यात तासन्तास वेळ घालवणे नव्हे बरं का! ज्या गोष्टींमुळे तुम्ही थोडे मोठे झालात याचा तुम्हालाच अनुभव येईल, तुमचा आत्मविश्वास, तुमच्या क्षमता वाढतील; तुमच्या ज्ञानात–कौशल्यात भर पडेल; धडपडण्याची, कर्तृत्व गाजवण्याची तुमची प्रेरणा वाढेल; इतरांच्या उपयोगी पडण्याची, गरजुंना मदत करण्याची, अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची इच्छा, ऊर्मी वाढीस लागेल; असं काहीतरी तुमचं तुम्ही ठरवून या सुट्टीत करावं असं मनापासून वाटतं. 'छात्र प्रबोधन' व 'छात्र प्रबोधन'द्वारा सुट्टीत होणारे उपक्रम यासाठी तुम्हाला नक्कीच मदत करतील. सुट्टीचा असा डोळस विचार करायला शिकलात, स्वत: पुढाकार घेऊन अनुभव शिक्षणातलं स्वावलंबन मिळवायचा प्रयत्न केलात, तर **'मोठ्ठं' होण्याची चैत्रपालवी फुटलीच म्हणून समजा!**

उन्हाळ्यात 'गारा' पडल्या की खूप हवंहवंसं वाटतं. गारा वेचता वेचता गारांचं पाणी केव्हा होतं ते कळंतही नाही; पण यावर्षी महाराष्ट्रात झालेली गारपीट मात्र फारच भयानक अन् विद्ध्वंसक होती. हजारो शेतकऱ्यांनी कष्टानं पिकवलेले मळे काही क्षणात जमीनदोस्त झाले. मनानं तर आपण सर्वजण त्यांच्या दु:खात सहभागी होऊच; पण प्रत्यक्ष काही मदतही आपल्याला करता येईल का? या सुट्टीत स्वत:च्या कष्टातून (कोणीतरी भेट दिलेले, आई–वडिलांकडून मागितलेले नाही) तुम्ही १०० रुपये कमवावेत अन् गारपीटग्रस्त भागातील प्रचंड नुकसानीला सामोरं जाव्या लागलेल्या सर्वात जास्त गरजू कुटुंबांना शैक्षणिक मदत करण्यासाठी मेअखेरपर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवावेत. जूनमध्ये आपण गारपीटग्रस्त गरजू मुलामुलींसाठी त्याचा उपयोग करू.

लोकसभा निवडणूकांची रणधुमाळी एप्रिल–मेमध्ये भारतभर चालू असणार आहे. तुम्ही सर्वजण अजून वयानं लहान आहात, त्यामुळे तुम्ही लगेच मतदान नाही करू शकणार; पण त्या निमित्ताने आपल्या शहराच्या/जिल्ह्याच्या/राज्याच्या अन् देशाच्याही विकासाचे, विकासातील अडथळ्यांचे मुद्दे कोणते याचा अभ्यास तर सुरू करा. विविध पक्ष, उमेदवार, त्यांचे जाहिरनामे, त्यांचे कर्तृत्व, त्यांची विचारधारा इ. बाबत समजून घ्यायला, चर्चा करायला अन् मोठ्यांच्या चर्चेमध्ये सामील व्हायला सुरुवात तर करा; म्हणजे जेव्हा तुम्हाला १८ वर्षे पूर्ण होतील तेव्हा खऱ्या अर्थानं डोळसपणे, जागरूकपणे तुम्ही मतदान कराल अन् लोकशाही बळकट करायला मदत कराल.

'छात्र प्रबोधन'तर्फे दिवाळीत जाहीर केलेल्या स्पर्धांचे निर्णय या अंकात दिले आहेत. सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन अन् बक्षीसप्राप्त गटांना विशेष शाबासकी! सुट्टीत पुण्यात येणार असाल तर 'छात्र प्रबोधन'मध्ये आवर्जून येऊन जा. तुम्हाला भेटायला आम्हाला नक्कीच आवडेल. सुट्टीतल्या उपक्रमांमध्ये सहभागी झालात तर अधिक आनंद होईल.

ही सुट्टी धमाल–मस्तीबरोबरच स्वत:ला समृद्ध करणारी होवो, यासाठी शुभेच्छा!

**तुमचा दादा,**

**(महेन्द्र सेठिया)**

**चैत्रामधली चैत्रपालवी, आशेला नव अनुभव दावी। झाले गेले घडून जाई, नवीन वर्षी नव नवलाई ।।**

**अधिक जाणून घ्या : आंतरराष्ट्रीय पतंग महोत्सव –** गुजरात (१४ जानेवारी), विविध प्रकारचे पतंग उडवणे.

**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे** – दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

# सुरुवात

– मंगला गोडबोले

***निहारचा नुकताच वाढदिवस झाला होता. यावर्षी तो वयानं 'हाफतिकिटा'तून 'फुलतिकिटा'त गेला होता. निहारला मोठ्ठं व्हायची घाई होती... एका दिवसात आपण मोठे होतो का?... तुम्हीच विचार करा. खरंतर मोठ्ठं व्हायची ही फक्त 'सुरुवात' असते. आजीनं त्याला मोठ्ठं होण्याचा मंत्र समजावून सांगितला...***



''निहारऽ, निहारऽ आज शाळेतून घरी येताना वाटेत तेवढं ते 'मनीऑर्डर'चं काम करायचंय...''

आजीनं आतून पुकारा केला तेव्हा निहारच्या कपाळावर बारीकशी आठी आली. आधीच त्याला शाळेत जायला उशीर झाला होता... तसा तो रोजच व्हायचा म्हणा. पण आज जरा जास्तच ! दरवाजात उभं राहून एकाच वेळी एका हातानं शाळेचं दप्तर पाठीवर टाकणं, दुसऱ्या हातानं काचेत बघून केस सारखे करणं आणि बुटात पाय सरकवणं अशी तीन-तीन कामं करत होता पठ्ठ्या ! त्यात आजीबाई निघाल्या चौथं काम मागे लावायला ! निहार न बोलता सटकण्याच्या विचारात होता. तेवढ्यात आजी धडपडत स्वयंपाकघरातून दरवाजापर्यंत आली आणि हातातला लिफाफा दाखवत सांगायला लागली,

''यात देवस्थानासाठी दोनशे रुपये ठेवलेत. पत्ता, सेक्रेटरीचं नाव वगैरेंची चिठ्ठी ठेवलीये आणि सुटे तीस रुपयेपण ठेवले आहेत. मनीऑर्डरचा काय आकार असेल तो द्यायला! तेवढी 'मनीऑर्डर' करून टाक हं सोन्या.''

''करीन गं उद्या-परवा !''

''गेला आठवडाभर असंच म्हणतोयंस. आज होऊनच जाऊ दे.''

''मला नाही माहीत 'मनीऑर्डर' कशी करायची ते?'' निहार कुरकुरला.

''एकदा केलीस की होईल माहिती !''

''नाही तिथे पैसे काय पाठवतेस गं आजी?''

''पोस्ट ऑफीस शाळेच्याजवळ आहे अगदी. सहज जाशील.''

''आत गेलं की 'मनीऑर्डर' आपोआप थोडीच होणार आहे?'' निहारचा प्रश्न.

''नाही. 'एम. ओ. फॉर्म' मागावा लागेल. पाठवणाऱ्यांचं, घेणाऱ्यांचं नाव-पत्ता लिहावा लागेल,'' आजी हसत उत्तरली.

''चौथीत पोस्टाची कामं शिकलोय बरं का आम्ही.''

''शिकलायस ना? मग तर आणखीच सोप्पं काम,'' आजी म्हणाली.

''मला वेळ तरी आहे का? शाळेनंतर लगेच क्लास असतो.''

''मध्ये अर्धा तास असतो. मला माहितीये. दुपारी दोन अडीचला पोस्टात गर्दीपण कमी असते. एवढी वर्षं जातच असे की मी. यंदाच मेलं ते न्हाणीघरात पडल्याचं निमित्त झालं आणि हातात ही काठी आली म्हणून...'' आजीचं भलं मोठ्ठं स्पष्टीकरण.

''आईच्या ऑफीसमधल्या शिपायाला सांग ना !''

''माझा एवढा तगडा नातू असताना मी लोकांपुढे कशाला पदर पसरू? वर्षानुवर्षाचा नेमही टिकेल... तुला शिकायलाही मिळेल...''

आजीजवळ प्रत्येक प्रश्नावर तोडगा होता. दरवर्षी दत्तजयंती, रामनवमी, दासनवमी अशा एकेका सणा-उत्सवाला त्या-त्या



कोकिळेच्या कूजनाने, आम्रतरु बहरला। चैत्राची गुढी उभारली, नववर्षाच्या स्वागताला।।



**अधिक जाणून घ्या : सुभाष मेळा –** अंदमान-निकोबार (२३ जानेवारी), नेताजी सुभाषचंद्र बोस जयंतीप्रीत्यर्थ.

**प्रायोजक - श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सस, अमेरिका.**

तीर्थक्षेत्राला छोटी-मोठी भेट पाठवण्याची तिची जुनीच सवय होती. इतकी वर्ष सगळं तिचं तीच करायची. आता तिला डॉक्टरांनी 'शक्यतो जिना चढू नका', असं सांगितलं होतं म्हणून...

निहार हैराण झाला. आजीची छोटी-मोठी कामं तो पुष्कळदा जाता येता करायचा. पण हे पोस्टाचं लचांडं काय? स्वत:ला धड माहीत नाही... दुसऱ्यांना विचारायला आवडत नाही.

''पोस्टाच्या बिल्डिंगमध्ये एकदाही गेलेलो नाहीये मी,'' निहार वैतागून म्हणाला.

''या निमित्तानं जा. माहितीच्या पाट्या असतील त्या वाच. अडलं तर विचार तिथल्या एखाद्या कर्मचाऱ्याला. तोंड दिलंय ना देवानं?''

''तुम्ही सगळे असंच करता. तुम्हाला मीच सापडतो धरायला. दादा 'एन. डी. ए.'त, आईबाबा ऑफिसला; मग निहार आहेच उठसूट पळवायला... चुकलं की बोलायला... मी पण एक दिवस दादासारखा 'हॉस्टेल'वर जातो की नाही बघ...''

''तो जा पुढे मागे; पण आज पोस्टात जाच 'मिस्टर हाफ तिकीट!' हे ठेवा दप्तरात,'' आजी हसू दाबत म्हणाली. नुसती म्हणाली नाही; तिनं हातातला मनीऑर्डरवाला लिफाफा त्याच्या पाठीवरच्या दप्तरात कोंबलासुद्धा. मग मात्र निहारचा पुरता नाईलाजच झाला. सायकल सुरू करून फाटकाबाहेर पडताना तो नेहमीपेक्षा जरा जास्त खेकसला, ''मी 'हाफ तिकीट' राहिलो नाहीये आता. कळलं...?''

त्याचं म्हणणं खरं होतं. आजीला ते नक्कीच माहीत होतं. त्याच्या तेराव्या वाढदिवसाचा केक तिनंच नव्हता का हौसेनं घरी बनवला? पण घरातलं शेंडेफळ म्हणून त्याला घरात सगळे नेहमीच 'हाफतिकीट' असं लाडानं, चेष्टेनं म्हणत आलेले होते. निहार 'धाकटं' असण्याचे फायदेही रीतसर घेत होता. कोणतंही नवं काम स्वत:हून करायला जायचं नाही. छोटीशीही जबाबदारी अंगावर घ्यायची नाही. लाडाकोडाची छोटी, थातुरमातुर कामं केली तर केली; नाहीतर 'लिंबूटिंबू आहे,' असं म्हणून टाळायची. असा खाक्या होता स्वारीचा. आजसुद्धा तो सहजासहजी बधला नसताच. पण काल रात्रीच्या जेवणाच्या वेळी आजीने 'मनीऑर्डर'चा मुद्दा काढला होता. बाबांनी 'मनीऑर्डर' करण्याबद्दल बजावलं होतं; म्हणून त्याचा नाईलाज झाला.

त्याची सायकल दिसेनाशी झाल्यावर आजी घरात आली. त्यानं आपलं एवढं महत्त्वाचं काम केल्याबद्दल त्याच्यासाठी काहीतरी खाऊ करायच्या विचारानं आजी स्वयंपाकघरात शिरली. निहार होताच तिला जीव की प्राण ! जरासा कामचुकार असला म्हणून काय झालं? मनानं मात्र, 'हाफतिकिटातून' 'फुल तिकिटात' जायला तो पटकन् तयार होत नव्हता. एवढी खोड होती ना? आजीनं हसून मान हलवत 'गुलाबजाम मिक्स'चं पाकीट पुढ्यात घेतलं. गुलाबजाम निहारला फार आवडत.

मनासारखे गुलाबजाम करून झाले. आजीचं जेवण, नंतरची वामकुक्षी झाली. अजून निहार घरी आलेला नव्हता. क्लास झाल्यानंतर 'मनीऑर्डर' केली तर निहारला रोजच्यापेक्षा पंधरावीस मिनिटं उशीर होणार, असं आजी धरूनच चालली होती; पण त्याहूनही जास्त उशीर झाला होता. आजी अस्वस्थ झाली. उगाच घरात येरझारा घालू लागली. त्यांची खाण्याची बशी तयार करून ठेव, पाण्याचा पेला भरून ठेव अशी तयारी करत राहिली. पुन्हा पुन्हा खिडकीजवळ जाऊन ती तपासून बघत राहिली.

तेवढ्यात फाटकाजवळ दोन-तीन मुलांचा आवाज आला. आजी धडपडत दरवाजाशी जाऊन बघते तो काय, निहार रडवेल्या चेहऱ्याने मित्राच्या खांद्याला धरून हळूहळू घराकडे खुरडत खुरडत येतोय. त्याची सायकल एकानं धरलीये, त्याचं दप्तर दुसऱ्याच्या खांद्यावर आहे.

काय झालं? कसं? कधी? कोणी? कोणामुळे? आजीनं काळजीभरल्या प्रश्नांचा भडिमार केला. झालं असं होतं, की निहार



गर्द हिरव्या पालवीत, रंग भरून आले। आकाशच उतरून, सोने पेरून गेले ।।



**अधिक जाणून घ्या : लोकरंग उत्सव** - मध्यप्रदेश (२६ जानेवारी), लोकसाहित्य, आदिवासी नृत्यकलांचे सादरीकरण.

**प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लासगो, स्कॉटलंड** (U.K.)



शाळा सुटल्यावर टपाल कचेरीत गेला होता. तेव्हा त्याचे दोन मित्रही त्याच्याबरोबर होते. विचारत विचारत त्यानं आजीचं काम फत्ते केलं आणि तो 'पोस्ट ऑफिस'च्या बाहेर पडत होता. तेवढ्यात त्याच दरवाजातून एक भलंमोठ 'पार्सल' आत घेऊन येणाऱ्या दोघा कर्मचाऱ्यांच्या हातून चूक झाली. 'पार्सल'चा आकार आणि दरवाजातील मोकळी जागा यांचा हिशोब चुकला. 'पार्सल'बरोबर तो जुना भक्कम लोखंडी दरवाजा ढकलला गेला आणि निहारच्या पायाचा अंगठा चिरडून गेला. रक्तबंबाळ झाला. तिथल्या लोकांनी नंतरची सगळी उस्तवारी केली. औषध लावलं, चारदा 'सॉरी', 'चुकलो' वगैरे माफी मागितली. घरापर्यंत पोचवायला यायची तयारी दाखवली. पण वेदनेला ते काय करू शकणार होते? आणि वाहत्या रक्तालासुद्धा? 'आजी गंऽ' निहार कळवळला. निहारला जरा कुठे काही लागलं, की नेहमी आजीलाच जास्त दुखायचं. निहारचं एकूण लक्षण काही आजीला तितकंसं बरं वाटलं नाही. त्याला एकदा डॉक्टरांनी बघायला हवंच होतं. आजीनं तसं सुचवताच निहार टाळू लागला. 'काही नको', 'आता बरंय माझं', 'मग बघू', 'जास्त दुखलं तर संध्याकाळी ठरवू,' वगैरे म्हणायला लागला. पण आजीला ते पटेना. परोपरीने ती निहारला समजावू लागली.

"संध्याकाळी कधी बघणार 'हाफ तिकिट'?"

"बाबा कंपनीतून आल्यावर बघू." निहार

"एकेकदा रात्रीचे नऊ वाजून जातात त्याला घरी यायला."

"वाजले तर वाजू देत."

"तसं कसं? तुला दुपारी साधारण अडीच-पावणेतीनला लागलं असेल. त्यावर पाच तास आपण गप्प थोडंच बसणार?"

"आता बरंय म्हटलं ना!"

"आता वाटत असेल बरं, पण समजा, संध्याकाळपर्यंत तुझं बोट सुजून बसलं, बधीर झालं तर मी एकटी काय करणार राजा?" आता निदान तुझे मित्र आहेत सोबतीला. सगळे मिळून जा रे पोरांनो... याला चांगलं ड्रेसिंगबिसिंग करून आणा, वाटल्यास धनुर्वाताचं इंजेक्शनही.."

इंजेक्शनचं नाव काढताच निहार आणखीच कावराबावरा झाला. एरवी तो चांगलाच शूर होता; पण म्हणून काय उगाचच्या उगाच



चार सहा कोकिळा, पहाटवेळी गातात। किनरवापी स्वरांचा, एक मेणा बांधतात।।

**अधिक जाणून घ्या : लोहरी उत्सव** – पंजाब (जानेवारी), वैशिष्ट्यपूर्ण असे भांगडा नृत्य सादरीकरण.

**प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.**

इंजेक्शन घ्यायला लावायचं एखादयाला? ती टोकदार सुई... तिच्यातून उडवलेलं ते लसीचं कारंजं... ते टोचणारे डॉक्टर...

''आई गंऽ ...'' निहारच्या तोंडून बाहेर पडलंच पण त्यानं आजीचा निश्चय आणखी पक्का झाला. तिनं फतवाच काढला,

''ते काही नाही. तू लगेच डॉक्टरांकडे जाऊन येच बाबा. नाहीतर तुझा बाबा मला रागवेल.''

''आता दुपारी डॉक्टर कोण मिळणार आपल्याला?''

''आपले देवस्थळी डॉक्टर आहेत की कोपऱ्यावरचे,'' आजी.

''ते दोन वाजता दवाखाना बंद करून घरी जातात.''

''मग तू त्यांच्या घरीच चक्कर टाक.''

''ते झोपले असले तर? बाहेर गेले असले तर?'' निहारचे प्रश्न.

''त्यांचा मुलगा बघेल.''

''तो मकरंद दादा? तो थोडाच अजून 'प्रॅक्टीस' करतोय?''

''नसेल करत. पण डॉक्टरी पास झालाय तो. हल्लीच आपण पेढे नाही का खाल्ले त्यांच्या घरून आलेले?''

''तो कसल्यातरी पुढच्या परीक्षेला बसणार आहे ना? करत असेल त्याची तयारी, अभ्यास,'' निहार म्हणाला.

''करू देत. तरी तुझ्याकडे बघेल पाच मिनिटं. मी सांगितलंय म्हणून सांग,'' आजी म्हणाली.

आपली आजी 'डॉन' आहे असं निहारला नेहमी वाटत असेच. पण आज तिनं कमाल केली. प्रेमापोटी, काळजीपोटी त्याला मुळी घरी थांबूच दिलं नाही. देवस्थळी डॉक्टर त्यांचे 'फॅमिली डॉक्टर' होते. त्यांचा मुलगाही डॉक्टर झालेला होता. आजीला तो नातवासारखाच होता. वेळ पडली असती तर तिनं त्याला घरी बोलवायलाही कमी केलं नसतं. त्यापेक्षा पोरांनीच तिकडे जायचं ठरवलं. एकेक दिवसच असा बेक्कार लागतो; त्याला काय करायचं? आधी पोस्टऑफिसचा फेरा. मग डॉक्टरांकडची वारी...

डॉक्टरांकडून निहारला घरी पोहोचवून मित्रमंडळ आपापल्या घरी, क्लासला पळाली तेव्हा आजीनं पुन्हा त्याचा ताबा घेतला. त्याला खायला प्यायला देऊन त्याच्या शेजारी बसली आणि म्हणाली,

''आता जरा झोप काढा 'हाफ तिकीट.' थकला, कंटाळला असाल ना तुम्ही?''

''तुला काय, तुझी 'मनीऑर्डर' गेलीये ! दप्तरात तिची पावती आहे ती घे काढून. या गोंधळात तुला तेवढी पावती दयायचं राहिलं; म्हणून पुन्हा ओरडा नको खायला,'' निहार आजीवर गुरगुरला.

आजी त्याच्या पाठीवर थोपटून हळूच म्हणाली,

''अजून दुखतंय का माझ्या राजाला?''

''नाही. मज्जा वाटत्येय.'' निहार घुश्श्यात म्हणाला.

''गुलाबजाम घे अजून दोन. आणखी मज्जा वाटेल.''

''बरं.''

''पण 'बॅण्डेज' छान बांधलंय नाही डॉक्टरांनी? देवस्थळी डॉक्टर म्हणजे अगदी धन्वंतरी !''

''ते नव्हते बरं का घरी. त्यांनी काही केलं नाहीये आमचं,'' निहार म्हणाला.

''काय सांगतोस? म्हणजे सगळं मकरंदनंच...''

''हो. मकरंददादा एकटाच घरी होता तेव्हा. म्हणाला, मी असं पूर्वी काही फारसं काम केलेलं नाहीये पण तुझं करतो.''

''अरे वा !''

''वा काय? केवढं दुखवलं त्यानं. अंगठा खसाखसा धुतला. झोंबरं औषध लावलं. इंजेक्शन ठोकलं.. डोक्यात गेलं सगळं माझ्या.''

''अरेरेऽ पण उपाय तर झाला ना? पुरी घे अजून एखादी.''

''नको मला. हौस 'पुरी' झालीय माझी पोस्टात जायची!'' निहार पुरीएवढे गाल फुगवत म्हणाला.

''चालायचंच रे. असे छोटेमोठे अपघात व्हायचेच. पण मला एक सांग त्या मकरंदानं लक्ष घातलं ना तुझ्यात?''

''हुं.''

''तो म्हणाला का, मला हे काम येत नाही? मी यापूर्वी असं



चैतन्याच्या चित्रलिपीची, कळी कळी फुलली। सुगंध उधळित वसंत आला, नवलाई घडली।।



**अधिक जाणून घ्या : उंट न्याय उत्सव –** राजस्थान (जानेवारी), उंटाच्या मिरवणूका, गलबत स्पर्धा.

**प्रायोजक – श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे.**



काही केलं नाही; तेव्हा आता कसं करू?'' आजीचे प्रश्न

''म्हणजे काय?''

''म्हणजे हेच, की आपल्याला प्रत्येकाला कधी ना कधी, कोणतं ना कोणतं काम पहिल्यांदा करावंच लागतं. 'येत नाही, येणार नाही,' असं म्हणून चालत नाही. मोठ्या डॉक्टरांनी कधीतरी 'पहिल्यांदाच' ऑपरेशन केलेलं असतं. मोठ्या वकिलाची पण कोणतीतरी पहिली वहिली केस-दावा-खटला असतोच नं.''

''याचा माझ्याशी काय संबंध?''

''तोच तर सांगणार होते पुढे 'मिस्टर हाफतिकीट.' आज आपल्याला 'मोठ्ठं' व्हायचंय ना? मग नव्या-नव्या जबाबदाऱ्या घ्यायची, शिकायची तयारी हवीच. नुसती वर्षं वाढली की माणूस थोडाच ना मोठा होतो? कामाने, अनुभवाने, नव्या-नव्या जबाबदाऱ्या पेलण्याने तो मोठा होतो. प्रत्येक नवं काम ही त्याच्या मोठेपणाची सुरुवात असते. काय समजलं?''

''गुलाबजाम छान झालेत,'' निहार म्हणाला.

''आता त्याची पण एक मजा सांगू?''

''त्यात पण आहेच का तुझी मजा?''

''हो तर ! मला की नाही, असल्या तयार पाकिटातल्या पिठाचे गुलाबजाम अजिबात येत नव्हते. कसे होतील तेही माहीत नव्हतं. आमची जुनी पद्धत वेगळी होती. पण आज वेळ आली, तशी हे नव्या प्रकारचे गुलाबजाम करायची हिंमत केली. जरा बिचकले सुरुवातीला पण पुढे गेलं सारं जमून. असंच होतं रे. तू नाही का आज पटकन 'मनीऑर्डर' केलीस?''

''ह्याऽऽ, तिच्यात काहीच नसतं एवढं कठीण...,'' निहार उद्‌गारला.

''आपण सुरुवात केली ना एकदा, की पुढे कशातच काही कठीण नसतं, अशक्य तर नसतंच नसतं. फक्त आपण निर्धाराने त्यात पडावं लागतं. आता यापुढे माझी पोस्टाची कामं मी तुलाच देत जाईन... आणि तूही ती सहज करशील. बरोबर ना?''

निहारने मान हलवली. त्याला बोलता आलं नाही; कारण त्याच्या तोंडात आधीच एक गुलाबजाम होता आणि दुसरा गुलाबजाम चमच्यात घेऊन आजी समोर तयारच होती; आपल्या 'हाफतिकीट'ला अलगदपणे गोडी गुलाबीनं 'मोठ्ठं' करण्यासाठी !

•••

– मंगला गोडबोले
७, गीताली, पीवायसी, पुणे 411004



आम्रमंजिरी फुलता, दरवळे आसमंत। श्वास घेता भरभरून ,वेडं मन मोहरतं।


**अधिक जाणून घ्या : पोंगल उत्सव –** तामिळनाडू (जानेवारी), नवीन आलेल्या धान्याच्या स्वागतासाठी, बैल व गायींची पूजा.

प्रायोजक - श्री. नचिकेत खरे, पुणे.

कविता सुचते म्हणजे नेमके काय होते?कविता सुचण्यामागे एक प्रक्रिया निश्चित असते. परंतु गणिताप्रमाणे कविता सुचण्याचे तयार समीकरण नसते. कवितेच्या ओळी कित्येकवेळा मनात शब्दांशिवाय रुणझुणत असतात. आपल्या नकळत त्या आपल्याला हाका घालत असतात. धुक्यात लपलेल्या आभाळातून चमकणाऱ्या चांदणीप्रमाणे, स्वप्नात ऐकू येणाऱ्या लाटांच्या आवाजाप्रमाणे किंवा बालपणातील एखाद्या आठवणीप्रमाणे कवितेच्या ओळी आपल्याला बोलावीत असतात. त्या मनातल्या सुचलेल्या ओळीकडे लक्ष देऊन त्यांना जपायचे असते. कवितेच्या निर्मितीची ही हळुवार कहाणी या कवितेत अनुभवायला मिळेल...

## कवितेची ओळ

ही कुठली आहे ओळ
जी, ओठांवर येता येता थबकते...
हे कुठले आहे गाणे
जे अदृष्टातून हाका घालते... ।।ध्रु. ।।
धुक्यात लपले आहे
मनरंगी निळे आभाळ
ही कुठली निखिल चांदणी
त्यावर एकलीच लुकलुकते ।।१ ।।
आसमंतात विखरून आहे
ओलाकच्च मनगन्ध
ही कुठली हिरवी मखमल
आत आत उलगडते ।।२ ।।
उसळतो आहे दरिया
स्वप्नांच्या स्वप्नांमधला
ही कुठली आहे लाट
फुटून किनाऱ्यावर विरघळते ।।३ ।।
सागरगोटे खेळताहेत
बालपणीच्या आठवणी
ही कुठली गर्द अंगाई
आजही मज जोजवते ।।४।।



**– अंजली कुलकर्णी**
३ विघ्नहर अपार्टमेंट, जयवर्धमान सोसायटी,
बिबवेवाडी रस्ता, पुणे 411037




झाडे राने उंच उडविती, पर्णांतून पताका। शाखाशाखांतून टाकिती, सुखसंतोष शलाका।।



**अधिक जाणून घ्या : कलिंगा महोत्सव –** ओरिसा (जानेवारी), मार्शल आर्टस् तसेच काठ्यांच्या विविध कसरती.

**प्रायोजक – श्री. संदीप जगधने, पुणे.**



# पहाट

– डॉ. यशवंत पाठक

लहानपणापासून मला पहाट आवडे. पहाटेला उठलो की मी खिडकी उघडे. समोर खडकातून गोदावरी झुळूझुळू वाहताना दिसे. तिच्या पाण्याच्या ताजेपणाला सुगंध येई. गोदेचा प्रवाह अनुभवण्यात, सकाळचे ऊन कधी खिडकीत येई; ते कळेनासे होई. चैतन्य महाप्रभूंच्या पीठाच्या मंदिरातून होणारा घंटानाद गोदेच्या लहरींशी खेळत खेळत माझ्या मनात उतरे. हळूहळू आरतीतला प्रकाश खिडकीतून दिसे. औदुंबराच्या बनात पक्षी किलबिल करीत. चिंचबनातले मोर आसपास फिरता फिरता नाचत. वडाच्या पारंब्याशी कितीतरी वेगवेगळे पक्षी खेळ खेळत. त्यातून एक कळले, पक्षी नियमाने पहाटे उठतात. पक्ष्यांचा आवाज कधी बसत नाही. त्यांना कधीही शिंक येत नाही.

पहाटेतला आसमंत नेहमी आपल्या मनाला ताजी फुले देऊन जातो. मनातून काहीतरी नवे करावेसे वाटते. माझ्या एका मित्राला पहाटे चित्र काढावेसे वाटे. दुसऱ्या मित्राला पहाटे तंबोऱ्यावर बसून गावेसे वाटे. मला पहाटे, काही वेळ वाचावे, थोडा वेळ तबला वाजवावा, काही वेळ फिरायला जावे असे वाटे. माझे कौलारू घर गोदावरीच्या काठी होते. घरातील कोणतीही खिडकी उघडली की, गोदावरी दिसे. सुंदर नारायण मंदिराचा कळस दिसे.

***गोदाकाठच्या निसर्गरम्य, पवित्र परिसरात डॉ. यशवंत पाठक यांचे बालपण गेले. घरातील संस्कारक्षम वातावरणात पहाटे अभ्यास करताना मनाला नकळतच अभ्यासाची गोडी लागली. त्या आठवणी अतिशय तरल शब्दांत लेखकाने येथे मांडल्या आहेत.***



उपवनी ऋतुराज येता, ये तरूंना पालवी। रंग गंधांची अशी, जादू मनाला मोहवी ।।



**अधिक जाणून घ्या : लोहरी उत्सव –** काश्मीर (जानेवारी), छज्जा नृत्य सादरीकरण.

**प्रायोजक – सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई.**

औदुंबरांची रांग दिसे. कपालेश्वर मंदिराचा मागचा सुवर्णपिंपळ मला बोलावी. गायत्री मंदिरामागचे वडाचे झाड वाऱ्याच्या साथीत डोले. अनेक भाविक, काही संन्यासी खडावांचा चटचट आवाज करीत गोदास्नानाला जात.

खडकातली गोदावरी केव्हाही बघा; ती सतत काही नवीन, चांगले करायला सुचविते. अशा गोदावरीला आपण मनापासून जपावे, म्हणून आम्ही मुले तासभर गोदावरीचा घाट स्वच्छ करीत असू. 'लक्ष्मणकुंडात कपडे धुवायचे नाहीत,' असे आम्ही लोकांना सांगत असू. 'नदी ही आपले वैभव आहे. तिच्या काठी नांदत आलेली भारतीय संस्कृती आपण जपली पाहिजे,' असे आमचे सर आम्हांला नेहमी सांगत. गोदावरी ही आमची आई असे. तिला आम्ही सारे 'गोदामाय' म्हणायचो. तिच्या काठी असलेल्या पटांगणात खेळायला मौज येई.

रोज सकाळी पांजरपोळातून मी गाईचे दूध आणी. पितळीचा फिरकीचा तांब्या दुधाला नेई. दात घासून झाले की आई आम्हां भावंडाना दूध देई. त्या दुधात साखर घालायची गरज नसे. यातून 'गोडी' या शब्दाचा भावार्थ कळला. 'माणसाने फार साखर खाऊ नये,' असे वडील आम्हां भावंडांना नेहमी सांगत. 'अती गोड खाल्ल्याने बुद्धी जड होते. अभ्यासाला हुरूप येत नाही,' हे वडिलांचे सांगणे आज उपयोगी पडते. सगळे काही मर्यादित केले, की आपण छान राहतो. हे पहाटेने शिकविले.

पहाटेचे आकाश माझ्याशी मनसोक्त गप्पा मारी. न कंटाळता ते रोज खुले. आश्चर्य म्हणजे त्याने एकही दिवस सुट्टी घेतलेली नाही. प्रत्येक ऋतूत नवे झालेले आकाश पहाटेचा आपला जिवलग मित्र होते. आकाशाने सूर्याला आपले मित्र मानले. सूर्य नमस्कारात 'ओम मित्राय नम:' असे म्हणून जगत्‌मित्र सूर्याला मी नमस्कार करतो. मनात पहाट फुलते. ती आपल्या अभ्यासाला मदत करते. आपले मन प्रसन्न ठेवते.

कौलारू घरांवर कोवळे ऊन पसरले की शाळेची वेळ होई. मी सारे आवरून दप्तर घेऊन शाळेला निघे. शाळा घराजवळ होती. सकाळच्या वेळी वाड्यांचे दरवाजे लवकर उघडत. पाणी भरण्याची लगबग सुरू होई. काहीजण वाड्यातल्या विहिरींचे पाणी भरत. तर काही नळाचे पाणी घेत. त्यावेळी आमच्या गावात नुकतेच नळ आले होते. काही आडांचे पाणी चवीला गोड व हलके होते. गोदावरीच्या पाण्याची सवय झाली होती. त्यामुळे नळाचे पाणी चांगले की आडाचे पाणी चांगले यावर वाद होत.

माझे बाबा रोज पहाटे एक संस्कृत सुभाषित मला शिकवत. त्याचा अर्थ समजावून सांगत. शिकवता शिकवता ते सुभाषित मला दहा वेळा म्हणायला लावत. थोड्या वेळाने सुभाषित पाठ होई. सुभाषिताचा गाभा आपण कसे जगावे हा असायचा. आपण जसे-जसे वयाने वाढत जातो, तसे-तसे आपले छंद, आपल्या आवडी भिन्न भिन्न होत जातात. त्या आपण जोपासल्याच पाहिजेत. आपली विचार करण्याची शक्ती किंवा एखादी कला आपण वाढविली पाहिजे. जसे आपण नवे कपडे घेतो तसे बुद्धीने नवे तल्लख होण्यासाठी उत्तम ग्रंथ किंवा पुस्तके विकत घेऊन वाचली पाहिजेत. चांगल्या संगतीत राहिले पाहिजे. सरांना सतत प्रश्न विचारले पाहिजेत.

पहाटेनेच मला जीवनाचे व्यवस्थापन कसे करावे ते शिकविले. जीवनाचे भान दिले. जीवनात 'जिवंत संवाद' अतिशय मोलाचा आहे; याची जाणीव पहाटेने करून दिली. आजच्या मोबाईलच्या काळात आपण खूप बोलतो. याला 'संवाद' म्हणत नाहीत. आपल्या बोलण्याला जेव्हा विशिष्ट ध्यासाची डूब मिळते, तेव्हा संवाद जन्माला येतो. 'संवाद' ही मनाची संजीवनी आहे. संवादातून माणसाला बऱ्याच चांगल्या रीती समजतात. यातून त्याचे मन त्याच्याशी बोलू लागते. याला 'मनन' म्हणतात. 'मनना'तून आपण निर्भय होतो. सार्थ आत्मविश्वास निर्माण होतो.

कोणत्याही झाडावरचे पान कधी दुबळे झाले आहे काय?

**निळे स्वप्न कुजबुजे, हळू पाखरांच्या कानी। ऊन कोवळे दाटले, केशराच्या रानोरानी॥**



**अधिक जाणून घ्या : डेक्कन फेस्टिव्हल** – आंध्रप्रदेश (जानेवारी), गझल, मुशायरा कव्वाली व शास्त्रीय नृत्य सादरीकरण.
**प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५**

कोणत्याही फुलाने दुसऱ्या फुलाला नावे ठेवली आहेत काय? नदी कधीतरी समुद्रावर संतापली आहे काय? पक्षी आनंदाने उडतात. दिवस ऋतूंचा असतो. रात्र चांदणी असते. या निरीक्षणातून आपल्या लक्षात येईल, निसर्गाकडून आपण हेच सारे तर शिकून घ्यावे. चिमणीच्या चिवचिवाटात पहाटेचे सामर्थ्य असते.

समईच्या प्रकाशात आजही पहाट वाचताना मन टवटवीत होते. खिडकीतून वाहणारी गोदावरी आजही तरल वाटते. गोदावरीत आता खडक नाहीत. गोदावरी सिमेंटच्या जंगलात अडकली आहे. तरीही वाहत आहे. आहे त्या परिस्थितीत वाहते आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत अभ्यास, खेळ, व्यायाम, कला यांची साधना केल्याशिवाय आपला दिवस दवडू नये, असे आजही वाटते. हे पहाटेचे देणे आहे. ते अनुभवण्यासाठी आपण स्वच्छ डोळ्यांनी पहाटेला उठावे आणि अभ्यासासी व व्यायामासी सादर व्हावे.

आपणहून उडून तर पाहा ! सूर्य तुमच्या डोळ्यांत खेळेल. अभ्यास बोलू लागेल. शब्द आपले होतील. शरीर रेखीव राहील. हा उपदेश नाही. हा अनुभव आहे. तो तुम्हाला सांगितला इतकंच.

•••

**– डॉ. यशवंत पाठक**
संत ज्ञानदेव अध्यासन प्रमुख,
पुणे विद्यापीठ

## अनुभवसंपन्न आणि अर्थपूर्ण सुट्टीसाठी... व्यक्तिकार्ये (५ वी ते ८ वीच्या मुला-मुलींसाठी)

मित्रांनो, आता सुट्टीचे वेध लागलेत हो नं ! ही सुट्टी अधिक अनुभवसंपन्न व अर्थपूर्ण कशी करता येईल? चला तर मग **या सुट्टीत घरच्या घरी आणि आपल्या घरच्यांसाठी काम करण्याचा संकल्प कराल?** म्हणजे काय करायचं? खाली दिलेली कामांची यादी वाचा आणि लागा कामाला. काही कामे काही तासांची आहेत, तर काही कामे ८-१० दिवस रोज थोडा थोडा वेळ करत जाण्याची आहेत. काम पूर्ण झाले, की वहीत दिनांक घालून त्यापुढे ते नोंदवून ठेवा. काम करताना आलेली मजा, झालेली फजिती, मिळालेला नवीन अनुभव इ. गोष्टीही थोडक्यात लिहा. शक्य झाल्यास आपल्या आई-बाबांची त्यापुढे स्वाक्षरी घ्या. आवडली ना कल्पना? नवीन अनुभव घेण्यासाठी या **'व्यक्तिकार्यांचा'** तुम्हाला नक्कीच उपयोग होईल. सुट्टीत तुम्ही एकूण २० कामे पूर्ण करायची आहेत. त्यातली १० कामे खाली दिली आहेत. पुढची १० कामे पुढच्या महिन्याच्या अंकात! ही सर्व कामे पूर्ण केलीत तर घरच्यांच्या शाबासकीबरोबरच तुम्हाला 'छात्र प्रबोधन'तर्फे बक्षीसही मिळेल.

**१.** तुमच्या कुटुंबातल्या आणि जवळच्या नातेवाईकांपैकी ज्या व्यक्तीचे वाढदिवस येत्या ३-४ महिन्यात असतील त्यांची वेगवेगळ्या प्रसंगांमधील प्रकाशचित्रे संकलित करून त्याचे संगणकावर स्लाईड शो तयार करा आणि त्यांच्या वाढदिवशी त्यांना ते पाठवा/दाखवा. **२.** आपल्या नातेवाईकांच्या आणि परिचितांच्या (किमान ५०) वाढदिवसांची महिनावार दिनदर्शिका (कॅलेंडर) तयार करा. **३.** आई व वडिलांच्या तीन-तीन पिढ्या मागे जाऊन तेव्हापासून तुमच्यापर्यंतचा तुमच्या कुटुंबाचा एक कुटुंबवृक्ष तयार करा. **४.** घर सजावटीसाठी एक कलाकृती स्वत: तयार करा. उदा. तोरण, सिरॅमिक पॉट, वॉल हँगिंग वगैरे. **५.** घरच्यांसाठी ओली भेळ तयार करा. (ओली भेळ तयार करण्यासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंच्या खरेदीपासून बनवण्यापर्यंत, सर्व काही तुम्हीच करायचे आहे.) **६.** घरातील प्रथमोपचाराची पेटी तयार करा. घरात असणाऱ्या औषधांची यादी करा. औषधाचे नाव, त्याचा उपयोग, त्याची एक्सपायरी डेट इ. **७.** नारळ फोडणे, लसूण सोलणे, पालेभाजी निवडणे, ताक घुसळणे यांसारख्या किमान ५ कामात आईला नेमाने मदत करा. **८.** पुदिना, कढीपत्ता यांची रोपे लावून ती वाढवा. धने, मेथी यांचे बी पेरून त्यांच्याही वाढीचे निरीक्षण करा. **९.** फर्निचर पुसणे, फ्रिज साफ करणे, तुमच्या पुस्तकांचे-कपड्यांचे कप्पे आवरणे, पंखे पुसणे, आपले वाहन पुसणे, जेवणाचे टेबल आवरणे यांसारखी कामे सुट्टीत आवर्जून करा. **१०.** कलिंगड/फणस ही फळे स्वत: कापून घरातल्यांसमवेत तुम्हीही खा.

**निळ्याभोर रानामधी, मोर निळे उतरले। अंगणात मोगऱ्याला, चंद्रतारे लगडले।।**

**अधिक जाणून घ्या : गंगासागर मेळा –** तामिळनाडू (जानेवारी), मकरसंक्रांतीनिमित्त महामेळा.

**प्रायोजक -डॉ. संदीप श्रोत्री, सातारा.**

# दोस्ती भाषेशी...

## विशेषणांच्या मदतीने व्यक्तिचित्रण

पुढे काही विशेषणे दिली आहेत. त्यातील आवश्यक त्या विशेषणांची मदत घेऊन तुमच्या **एखाद्या मित्राचे व्यक्तिचित्र लिहा.** त्यात त्याचे नाव, रूप, स्वभाव, कौटुंबिक-सामाजिक परिस्थिती, त्याचा मित्रपरिवार इ. गोष्टींचा समावेश करता येईल. **दिलेल्या विशेषणांव्यतिरिक्त वेगळ्या विशेषणांची भरही तुम्ही घालू शकता.**

१. काळा, सावळा, गोरा, गव्हाळ, उंच, बुटका, हडकुळा, जाड, गब्दुल, नकटा, नीटस, नाकेला, सामान्य.
२. आनंदी, प्रसन्न, खुशालचेंडू, मिष्किल, खोडकर, घुम्या, बडबड्या, रागीट, चिडचिडा, हसतमुख
३. चौकस, विचारी, उद्योगी, आळशी, दिलदार, कंजूष
४. भाबडा, प्रेमळ, समजूतदार, हट्टी, आग्रही, स्पष्टवक्ता, संधिसाधू, गोडबोल्या
५. कलावंत, खेळाडू, हरहुन्नरी, अभ्यासू, मनमिळाऊ, प्रामाणिक, हेकट
६. गरीब, श्रीमंत, निगर्वी, गर्विष्ठ, जबाबदार, बेजबाबदार, संवेदनशील, मदतीस तत्पर इ.

## गटात खेळ खेळूया

घटना क्रमाने सांगण्यासाठी उपयोगी पडणारी काही क्रियाविशेषणे पुढे दिली आहेत. त्यांचा क्रमाने उपयोग करून सर्वांनी गटात मिळून एक छोटासा प्रसंग किंवा गोष्ट तयार करा.

पहिल्या खेळाडूने पहिल्या क्रियाविशेषणाने सुरू होणारे वाक्य आपल्या कल्पनेने लिहावे व कागद पुढल्या खेळाडूकडे द्यावा. दुसऱ्याने दुसरे क्रियाविशेषण वापरून वाक्य तयार करावे व कागद तिसऱ्या खेळाडूकडे द्यावा. याप्रमाणे क्रमाने ८ क्रियाविशेषणांचा वापर करून प्रत्येक खेळाडूने एक-एक वाक्य लिहून अर्थपूर्ण परिच्छेद लिहिता येतो का, ते पाहा. अर्थपूर्ण परिच्छेद लिहिण्यासाठी दिलेली क्रियाविशेषणे -

**एकदा, तेव्हा, सुरुवातीला, मग, त्यानंतर, त्याआधी, मध्येच, शेवटी.**

## परकीय पाहुणा ओळखा

पुढे दिलेल्या वाक्यांमधील इंग्रजी शब्द शोधा. त्याला मराठी प्रतिशब्द वापरून ती वाक्ये पुन्हा लिहा.
अमितने आपल्या डायरीत उद्यासाठी पुढील कामे नोंदवून ठेवली.

१) सकाळी लवकर उठून होमवर्क करणे.
२) इंटरनेटवरून बाबांचे डेक्कन क्वीनचे रिझर्वेशन करणे.
३) बाथरूममधील बल्ब बदलणे.
४) संध्याकाळी मावशीला फोन करणे.
५) ग्राउंडवरून येताना इलेक्ट्रिसिटीचे बिल भरणे.

## अर्थ एक छटा अनेक

खाली एकाच अर्थाच्या विविध (निरनिराळ्या) छटा दाखविणारी काही क्रियापदे दिली आहेत. त्यातील योग्य छटेचा वापर करून, अर्थपूर्ण वाक्ये तयार करा व त्यातून एक चटपटीत संवाद लिहा.

**उद्गारणे, म्हणणे, सांगणे, पुटपुटणे, बोलणे, बडबडणे, ततपप करणे, कुजबुजणे, कळविणे, तोंड उचकटणे, वटवट करणे.**



निसर्गाचा बहर, पेलेना पिकांना भार। सूरभरल्या गळ्यांनी, फुटे शेतांना स्वर।।



**अधिक जाणून घ्या : वाळवंट उत्सव –** राजस्थान (जानेवारी/फेब्रुवारी), उंट सफारी आणि शेकोटी नृत्य.

**प्रायोजक - प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे.**

# कॅरममधील विज्ञान


– डॉ. वर्षा जोशी

कोणत्याही ऋतूत खुर्चीत किंवा जमिनीवर बसून ज्याला फारशी जागा लागत नाही असा, घरातल्या घरात खेळता येण्यासारखा खेळ म्हणजे कॅरम. आपल्या देशात कॅरम १८ व्या शतकापासून खेळला जातो. नक्की पुरावे उपलब्ध नाहीत; पण या खेळाचा उगम भारतात आहे असं बरेच लोक मानतात. पूर्वी राजे महाराजे हा खेळ खेळत असत. पतियाळामधील एका राजवाड्यात काचेचा पृष्ठभाग असलेला कॅरम बोर्ड ठेवण्यात आला आहे. कॅरमचा खेळ पहिल्या महायुद्धानंतर सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय झाला. फावल्या वेळी करमणूक म्हणून खेळला जाणारा हा खेळ आता स्पर्धांमध्ये खेळला जातो. या खेळासाठी आता 'इंटरनॅशनल कॅरम फेडरेशन'ने नियम बनविले आहेत. भारतात 'इंटरनॅशनल कॅरम फेडरेशन'ची स्थापना चेन्नई येथे १९८८ साली झाली. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांची मान्यता या खेळाला मिळाली आहे. बैठ्या घरगुती खेळामध्ये कॅरम हा अत्यंत लोकप्रिय असा खेळ आहे.

कॅरम हा वैज्ञानिक तत्त्वावर खेळला जाणारा खेळ आहे. त्यामध्ये भौतिकशास्त्र आणि भूमिती यांची तत्त्वे अधिक वापरली जातात. कॅरममध्ये खेळण्यासाठी जो पृष्ठभाग उपलब्ध असतो त्याची **लांबी आणि रूंदी साधारण ७४ से.मी.** असते. लाखेचे लिंपण केलेल्या प्लायवुडने कॅरम बोर्ड बनविलेला असतो. ९ पांढऱ्या, ९ काळ्या व १तांबडी, जिला 'क्वीन' असं म्हणतात अशा **१९ सोंगट्या** कॅरमबोर्डच्या मधल्या वर्तुळात विशिष्ट प्रकारे लावलेल्या असतात. प्रत्येक सोंगटीचं वजन साधारण सव्वापाच ते साडेपाच ग्रॅम असतं. स्ट्रायकरचा व्यास सोंगटीच्या व्यासापेक्षा जास्त असतो आणि त्याचं वजन जास्तीत जास्त १५ ग्रॅम असतं. स्ट्रायकर हा बोर्डच्या कडांना असलेल्या दोन रेषांमध्ये ठेवून सोंगटीला मारायचा असतो आणि सोंगटी चार दिशांना कोपऱ्यात असलेल्या कप्प्यांपैकी (पॉकेट) एका कप्प्यात घालायची असते. सर्वसाधारण चार-पाच मूलभूत प्रकारांचा वापर करून हे साध्य करता येतं; पण सरावानं आणखी वेगवेगळ्या प्रकारेही ते साध्य करता येऊ शकतं. या लेखात आपण या मूलभूत प्रकारांचा विचार करणार आहोत.

कॅरममध्ये न्यूटनचे गतिविषयक नियम, संवेग अक्षय्यतेचा सिद्धांत *(लॉ ऑफ कॉन्झर्वेशन ऑफ मोमेंटम)* गतिज ऊर्जा, घर्षणाचे परिणाम अशा अनेक भौतिकशास्त्रीय तत्त्वांचा वापर केलेला आहे. संवेग *(मोमेंटम)* हा सदिश *(व्हेक्टर)* असल्याने दिशेचाही विचार करावा लागतो. म्हणजेच स्ट्रायकर मारताना त्याचा आडव्या रेषेशी किती कोन होतो, हे महत्त्वाचं ठरतं. इथे भूमितीचाही समावेश होतो.

सर्वात प्रथम **'सरळ नेमा'**चा विचार करू. (आकृती १ पाहा.) **A** हा स्ट्रायकर आहे आणि **B** ही सोंगटी आहे. ज्यावेळी स्ट्रायकरने सोंगटीला मारलं जातं; त्यावेळी




**आकृती १**

स्ट्रायकरचा वेग आणि तो आडव्या रेषेशी करीत असलेला कोन या गोष्टी फार महत्त्वाच्या असतात. स्ट्रायकरचं वजन $m_A$ आहे असं धरलं आणि $\overrightarrow{V_A}$ हा त्याचा वेग असेल तर $m_A \times \overrightarrow{V_A}$ हा त्याचा संवेग असतो. स्ट्रायकरला जे बल लावलं जातं त्यामुळे त्याला वेग मिळतो. हे न्यूटनच्या नियमाप्रमाणे घडतं. स्ट्रायकर **B** या सोंगटीवर आपटला की संवेगाचं एकदिशीय रूपांतरण *(लीनियर ट्रान्सफॉर्मेशन)* होऊन **B** ला वेग मिळतो. हेसुद्धा न्यूटनच्या नियमाप्रमाणेच घडतं. आता **B** ला $m_B \times \overrightarrow{v_B}$ हा संवेग मिळतो. सोंगटी कप्प्याच्या दिशेने प्रवास करू लागते. स्ट्रायकर त्याच दिशेने प्रवास करतो. समजा, स्ट्रायकरचा वेग आता $V_{A1}$ आहे



नाजुक जाईची ही बाळे, गुलाब ताजा छान। छोटी छोटी रानफुलेही, रंगे हरिती अपुले भान।।



**अधिक जाणून घ्या : मदाई उत्सव –** मध्यप्रदेश (फेब्रुवारी), आदिवासी, गोंड जमातीची लोककला.

**प्रायोजक - श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली.**


तर संवेग अक्षय्यतेच्या सिद्धांताप्रमाणे,

$$m_A \vec{v}_A = m_B \vec{v}_B + m_A \vec{v}_{A1}$$

इथे बोर्डवर घर्षण किती आहे ते महत्त्वाचं ठरतं. स्ट्रायकरला गतिज ऊर्जा असते. घर्षण जास्त असेल तर त्यातील काही ऊर्जा घर्षणासाठी खर्च होते. त्यामुळे स्ट्रायकर सोंगटीवर आपटतो तेव्हा त्याचा संवेग कमी होतो. सोंगटीला कमी वेग मिळतो आणि ती कप्प्यापर्यंत पोचू शकत नाही. घर्षण कमी व्हावं यासाठी कॅरमबोर्डवर बोरिक पावडर टाकण्यात येते. या पावडरमुळे पृष्ठभाग काहीसा गुळगुळीत होतो व घर्षणासाठी ऊर्जा खर्च होत नाही. अशा वेळी स्ट्रायकरचा वेग जास्त असेल तर तो सोंगटी बरोबर स्ट्रायकरही कप्प्यात जाऊन पडतो आणि 'डबलड्यू' होऊन दोन सोंगट्या आपल्याला बोर्डावर काढून ठेवाव्या लागतात. संवेग सदिश असल्यानं व त्याचं रूपांतरण एकदिशीय असल्यानं स्ट्रायकरची दिशा महत्त्वाची असते. ती जरा जरी चुकली तरी सोंगटी कप्प्यात जात नाही.


दुसरा नेम असतो 'परावर्तना'चा. म्हणजेच ***रीबाउन्डचा.*** कॅरमबोर्डला चारही बाजूला छोटे कठडे असतात. कठड्यांचा उपयोग या तंत्रासाठी केला जातो. स्ट्रायकर **A, B** या सोंगटीला आपटला, की संवेगाचं एकदिशीय रूपांतरण होऊन सोंगटीला वेग मिळतो आणि सोंगटी कठड्याला **C** या बिंदूशी जाऊन आपटते. (आकृति २ पाहा.) **BC** चा **CD** या लंबाशी जेवढा कोन होतो तेवढ्याच कोनातून सोंगटी परावर्तित होते आणि CE या दिशेने कप्प्यात जाऊन पडते. इथे खेळाडूची कसोटी योग्य तो कोन साधण्यामध्ये असते.

परावर्तनाचा उपयोग आणखी एक प्रकारे करता येतो. **आकृती ३ पाहा.** यामध्ये स्ट्रायकर **C** बिंदूशी मारला, की तेवढ्याच कोनातून परावर्तित होतो आणि **B** या सोंगटीवर आपटतो. **B** ला वेग मिळून ती कप्प्यात जाऊन पडते.





आकृती ३

**आकृती** ४ मध्ये एक वेगळाच नेम दाखवला आहे. त्यामध्ये **B** या सोंगटीच्या परीघाला स्पर्श करील अशाप्रकारे **A** हा स्ट्रायकर स्पर्शरेषेवरून मारला जातो. त्यामुळे स्ट्रायकर एका दिशेला, तर सोंगटी दुसऱ्या दिशेला जाते. घालवण्यास अवघड सोंगट्यांच्या (म्हणजे स्ट्रायकर, सोंगटी व कप्पा हे एका रेषेत येत नसतील तर) बाबतीत या तंत्राचा उपयोग जास्त केला जातो. इथे स्ट्रायकरचा संवेग, हा सोंगटीचा संवेग आणि सोंगटीला आपटल्यानंतर असणारा स्ट्रायकरचा संवेग या दोन्ही संवेगांचा एकत्रित परिणाम असतो. त्यामुळे समांतरभुज चौकोनाच्या नियमाप्रमाणे सोंगटीच्या संवेगाची आणि




आकृती २




आकृती ४



पाचुंची हिरवी राने, झुलव गडे झुळझुळ गाणे। वसंत मंडप वनराई, आंब्याची पुढती येई।।

**अधिक जाणून घ्या : ब्रिज उत्सव –** राजस्थान (मार्च, होळीच्या आधी), वसंतोत्सव.

**प्रायोजक – संतुल, (श्री. मिलिंद संत), पुणे.**

सोंगटीला आपटल्यानंतर असणाऱ्या स्ट्रायकरच्या संवेगाची दिशा असते. 'स्ट्रायकर सोंगटीला बरोबर कुठे स्पर्श करणार हे ओळखणं' हे खेळाडूचं कौशल्य असतं.

खेळाचा सराव केला, की एका सोंगटीवरून दुसरी सोंगटी घेणं, दोन सोंगट्यांच्यामध्ये स्ट्रायकर मारून त्या दोन सोंगट्या दोन कप्प्यात घालवणं अशा करामती खेळाडू करू शकतात. नवनवे नेम शोधून काढू शकतात. पण या सगळ्याच्या मागे भौतिकशास्त्र आणि भूमितीचीच तत्त्वे असतात.

कॅरम खेळण्याचे अनेक फायदे आहेत. या खेळामुळे कोनांचं अचूक ज्ञान, उत्तम निरीक्षण शक्ती, डोळे आणि हात यांच्या हालचालीतला समन्वय, अचूक नेम साधण्याचं कौशल्य इत्यादी गोष्टींचा लाभ होतो. कुटुंबातली मंडळी एकत्र बसून हा खेळ खेळू शकतात; ज्यामुळे त्यांच्यामधला संवाद वाढतो. संपूर्णपणे वैज्ञानिक तत्वांवर आधारलेला हा खेळ नुसती फावल्या वेळातली करमणूक नाही तर त्यापेक्षा खूप काही आपल्याला देऊन जातो.

●●●

– **डॉ. वर्षा जोशी**
फ्लॅट नं. २०१, 'रुणवाल सान्निध्य',
५० प्रशांत सोसायटी, पौड रस्ता,
कोथरूड, पुणे-३८

## विज्ञान प्रयोग – रंगांची न्यारी दुनिया

दोस्तांनो, गेल्याच महिन्यात तुम्ही पर्यावरणपूरक रंगपंचमी खेळला असाल. अजूनही तुम्हाला रंग खेळायला आवडेलच. या प्रयोगातले रंग तुम्ही एकमेकांवर न उडवता तुमच्या सवंगड्यांना तुम्ही घरच्या घरी दाखवा आणि बघा रंगांची दुनिया.

**प्रयोगासाठी लागणारे साहित्य –**

**१.** एक सपाट ट्रे **२.** तीन वेगवेगळ्या रंगाचे खाण्याचे रंग **३.** दूध (ज्यादा 'फॅट' असलेलंच घ्या, कमी 'फॅट' असलेलं दूध या प्रयोगात उपयोगी पडत नाही **४.** काचेच्या डिश धुण्यासाठी वापरला जाणारा 'लिक्वीड सोप'

**प्रयोग कसा कराल?**

**१.** 'ट्रे' चा तळ भरेल एवढेच दूध हळू हळू ओता. दोन तीन मिनिटे थांबा. **२.** 'ट्रे' च्या दुधात प्रत्येक कोपऱ्यात वेगवेगळे खाण्याच्या रंगाचे सहा ते सात थेंब टाका. **३.** ते सर्व स्थिर होऊ दे. नंतर त्या प्रत्येक रंगावर 'लिक्वीड सोप' चे पाच-सहा थेंब टाका. मग पाहा रंगांची न्यारी दुनिया!

**हे असं कां होतं?**

'लिक्वीड सोप' चं मुख्य काम असं की 'फॅट' वर 'हल्ला' करून त्याचा 'बिमोड' करायचा!

दुधामधल्या 'फॅट' आणि 'लिक्वीड सोप' मध्ये रासायनिक क्रिया घडते. 'फॅट' चं विघटन होतं, आपण 'फॅट' वर जे रंग टाकलेले असतात ते ह्या प्रक्रियेत विखुरले/पसरले जातात आणि वेगळीच 'रंगीत दुनिया' अनुभवायला मिळते. तुम्हाला या प्रयोगावरून 'फॅट' आणि 'लिक्वीड सोप' चं काय नातं आहे ते कळलं !

**पुढील प्रश्नांची उत्तरं शोधा –**

१. सर्व रंग दुधात एकाच ठिकाणी टाकून त्यावर 'लिक्वीड सोप' टाकला तर काय होईल? त्याचे कारण काय असेल?
२. 'ट्रे' चा आकार बदलला तर रासायनिक प्रक्रियेत काही फरक पडतो का?
३. 'लिक्वीड सोप' मुळे पदार्थ खाल्लेल्या 'डिश' स्वच्छ का निघतात?
४. कोणते पदार्थ 'डिश' वर राहिले/चिकटले तर किती वेळाने 'लिक्वीड सोप' चा उपयोग होतो?

– **डॉ. कांचनगंगा गंधे**, ४१/६६७, लोकमान्य नगर, पुणे 411030



**या सृष्टिची लयलूट करू या, दोन नेत्रांनी। हा आनंदोत्सव कोरून ठेवू, आपल्या मनोमनी।।**



**अधिक जाणून घ्या : कार्निवल उत्सव –** गोवा (मार्च), पोर्तुगीज लोकांची संस्कृती, वैविध्यपूर्ण सादरीकरण.

**प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.**

# भाज्यांपासून आकर्षक कलाकृती (सॅलड डेकोरेशन)

**गाजर, मुळा, बीट, काकडी, कोबी, वांगं या भाज्यांचे रूचकर पदार्थ आपण नेहमी खातो. या लेखात या भाज्यांचा वापर करून आपण त्यापासून आकर्षक कलाकृती कशा करायच्या ते पाहू. खाली दिलेल्या काही कलाकृतींव्यतिरिक्त तुमची कल्पकता वापरून, वेगवेगळ्या भाज्या वापरून अशाच नवनवीन कलाकृती करून पाहा आणि छात्र प्रबोधनला कळवा. मग तय्यार नं, सॅलड डेकोरेशन करायला...**



## बाहुली

**साहित्य :** कोबीचा गड्डा, वांगं, काकडी, बीट, गाजर, मटार, मुळा, टूथपिक

**कृती : १.** सर्व प्रथम मटार दोऱ्यात ओवून त्याची माळ तयार करावी.

२. गाजर-मुळ्याची ८-१० फुलं बनवून घ्यावीत. (शेजारी कृती दिल्याप्रमाणे)

३. बीटाची मोठ्या आकाराची चकती कापावी. उरलेले बीट गोलाकार कापून बिटाच्याच कापलेल्या चकतीवर ठेवावे. त्याचा टोपीचा आकार तयार होईल. (फोटो पाहा.)

४. देठाचा भाग खाली करून कोबीचा गड्डा उभा करावा. त्यावर देठ काढलेले वांगे टूथपिकने टोचून घ्यावे.


५. बाहुलीचा चेहरा बनवण्यासाठी छोटी काकडी अर्धी कापून घ्यावी व ती वांग्यावर टूथपिकने टोचून घ्यावी. काकडीला दोन लवंगा टोचून बाहुलीचे डोळे बनवून घ्यावेत. गाजराच्या तुकड्याला त्रिकोणी आकारात कापून तोंडाच्या जागी टूथपिकच्या साहाय्याने लावावे. अशाप्रकारे काकडीचा वापर करून बाहुलीचा चेहरा बनवावा.

६. बाहुलीच्या हातासाठी बारीक गाजर वापरावे. हाताच्याजागी वांग्याला टूथपिकने गाजर टोचावे. कोबीच्या पानांची पट्टी कापून खांद्यावरून लपेटावी व बाहुलीच्या पोटावर त्याची दोन्ही टोके मुळ्याच्या फुलाने टाचावी.

७. बाहुलीच्या गळ्यात मटारची माळ घालून तिला सजवावं.

८. बाहुलीचा कोबीचा झगा गाजर-मुळ्याच्या फुलांनी प्रकाशचित्रात दाखवल्याप्रमाणे सजवावा.

## गाजर - मुळ्याच्या फुलांचा गुच्छ



**साहित्य :** मुळा, गाजर, बटाटा, टूथपिक

**कृती : १.** प्रथम मुळा सोलून त्याच्या गोल चकत्या कापाव्यात. २. प्रत्येक चकतीला समान पाच अंतरावर इंग्रजी 'V' आकारात सुरीने छेद द्यावा. ३. मुळ्याच्या चकतीच्या वर छोट्या गोलाकार आकाराच्या गाजराच्या चकत्या ठेवाव्यात. ४. दोन्ही चकत्यांच्या मधोमध टूथपिक टोचून घ्यावी. अशाप्रकारे २५-३० फुले तयार करून घ्यावीत. गुच्छातील आपली सर्व फुले तयार झाली. ५. फुलांच्या गुच्छांची रचना करण्यासाठी बटाटा अर्धा कापावा. त्या कापलेल्या बटाट्यावर तयार केलेली सर्व फुले टूथपिकच्या मदतीने गोलाकार आकारात खोचावीत. (चित्रात दाखवल्याप्रमाणे)

**- अपर्णा म्हात्रे,** १/७, विठाबाई निवास, शास्त्रीनगर, सखाराम कॉम्प्लेक्सजवळ, डोंबिवली (पश्चिम), 421202

**रम्य पर्णाच्या पताका, चैत्र लावी सजलेला। अमृताने नाहलेली, आज आली सांजवेळा।।**



**अधिक जाणून घ्या : हत्ती उत्सव -** राजस्थान (मार्च), हत्तींच्या विविध स्पर्धा व खेळ.

**प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, नागपूर.**

# गारपीट

– किशोर पाटील

***नुकत्याच महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गारपिटीमुळे झालेल्या हाहा:काराच्या बातम्या तुम्ही वाचल्या असतील. शेतीवर अवघे जीवन अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचं हातातोंडाशी आलेलं पीक उद्‌ध्वस्त झालं, तर होणाऱ्या दुरवस्थेचं आणि परिणामांचं दाहक आणि वास्तववादी चित्रण या कथेत तुम्हाला वाचायला मिळेल. अशी शोकांतिका कुठल्याही शेतकऱ्याच्या वाट्याला येऊ नये.***



सांज होण्याची वेळ आली होती. चार-पाच वाजले असावे. ज्ञानबा आपल्या शेतावर फिरत असताना मनात आनंदी होऊन पुढील आडाखे बांधत होता. पंचेचाळीस वर्षांच्या ज्ञानबाने आयुष्यात खूप कष्ट सोसले होते. खूप हालअपेष्टा सहन केल्या होत्या. त्या हिरव्या, पिवळ्या पिकांकडे पाहून त्याला मनस्वी खूप आनंद वाटत होता. या धान्यरूपी हिऱ्या, मोत्यांचे मालक आपणच आहोत आणि आता आपले चांगले दिवस सुरू झाले; असंच त्याला वाटत होतं. 'माणसाचं जीवन कसं ऊन सावलीसारखं असतं', असं तो मनातल्या मनात पुटपुटत होता.

या सर्व गोष्टींचा मनात विचार करत असताना त्याच्या भूतकाळातील काही कष्टमय व दु:खद घटनांचा चित्रपट झरझर त्याच्या डोळ्यांपुढे येऊ लागला. पूर्वी चक्रीवादळात झाडं अंगावर पडून त्याचे आई-वडील दगावले होते. त्यावेळी ज्ञानबा खूपच लहान होता. ज्ञानबाला कधी मामा तर कधी काकांनी वाढवलं. लहानपणापासून काम करून त्याचं शरीर जणू दगडासारखं झालं होतं. काम त्याच्या अंगात इतकं भिनलं होतं, की कामच त्याला घाबरत होतं. ज्ञानबाला कसलाच शौक नव्हता. होता तो फक्त पोटभर खाण्याचा! या खाण्यापिण्यापायी लहानपणापासूनच त्याला सर्वांची टोचून बोलणीही खावी लागली होती. गावात लहान-थोरांचे सर्वांचे काम तो ऐकी. जणू कामच त्याच्या आयुष्याला जुंपले होते. सर्वात मिळून मिसळून राहणाऱ्या ज्ञानबाचा



रंगाची उधळण करत, वसंत हा आला नाचत। हासत खेळत आनंदाने, नव्या ऋतुचे करूया स्वागत।।



**अधिक जाणून घ्या : भगोडिया उत्सव –** मध्यप्रदेश (मार्च), झाबुआ, निमर, भिल्ल जमातींमधली वैशिष्ट्यपूर्ण स्वयंवरे.

प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटेक्ट प्रा. लि., पुणे.

स्वभावही खूप मायाळू होता.

...आता त्याचं एक कुटुंब होतं. खूप मेहनत करून संसाराचा गाडा तो ओढत होता. त्याच्या काकांनी एका गरीब मजुराच्या मुलीबरोबर त्याचं लग्न लावून दिलं होतं. त्याच्याकडे शेती-वाडी नव्हती. चार एक खणांचं घर फक्त होतं. ज्ञानबाची बायको थोडी शिकली होती व हुशारही होती. ज्ञानबा मात्र शिक्षणापासून वंचित होता. तिनं ज्ञानबाचा स्वभाव ओळखला होता. त्यांना दोन मुली व एक मुलगा. दोघं नवरा-बायको कामाला जात. सुट्टीच्या दिवशी मुलंही त्यांना मदत करी. मुलांनी भरपूर शिकावं असं त्या दोघांनाही वाटे. मोठी मुलगी बारावीला होती. तिच्या लग्नाचा विचारही ते करत होते. त्यासाठी दोन पैसे शिल्लक राहावे अशीच ज्ञानबाची धडपड होती.

यंदा पावसाळा चांगला झाल्याने नदी-नाले वाहून निघाले. विहिरी तुडुंब भरल्या होत्या. त्यामुळे रब्बीचा हंगाम चांगला होईल अशी सर्वांना आशा होती. गावातील मोठमोठ्या शेतकऱ्यांच्या जमिनी पडून होत्या. ते शेतकरी कसाने किंवा निम्माने कसण्यासाठी दुसऱ्यांना जमिनी देत होते. ज्ञानबाही आपल्याला कुणाचीतरी जमीन कसायला मिळेल यासाठी प्रयत्न करत होता. पण त्यांच्याकडे पैसे नव्हते. मग 'करायचे कसे' या विचारात नेहमी तो असे. गावात तसे सावकारीचे व्यवसाय करणारे बरेच, पण ज्ञानबाला पैसे कशाच्या आधारावर देणार? एके दिवशी ज्ञानबाच्या कानावर एक बातमी आली. गावातील एक मोठे जमीनदार त्यांची दहा बिघे जमीन पंच्चात्तर हजारात कसवर देत आहे. ज्ञानबाची धडपड अधिक वाढली. कारण त्या शेतीत ज्ञानबा पूर्वी खूप राबला होता. शेती कसदार होती. उत्पन्नही खूप मिळणार होतं; पण प्रश्न होता पैशाचा.

काम करण्याची धमक असलेल्या ज्ञानबाच्या जीवाची सारखी तगमग होत होती. त्या जमीनदाराच्या शेतावर ज्ञानबा चकरा मारत होता. त्याला आशा होती आपण शेतातून खूप कमाई काढू आणि मुलीचे लग्न करू. ज्ञानबानं आपले विचार गावातील दोन-तीन सावकारांजवळही मांडले; पण कुणीही त्याला दाद देत नव्हतं. ज्ञानबाला मात्र रात्र-रात्र झोप येत नव्हती. शेवटी एका सावकारानं त्याच्यात असलेली कामाची धमक पाहून पैसे देण्याचं मान्य केलं. आणि ज्ञानबाच्या आशा पल्लवीत झाल्या.

जमीनदाराला पैसे देऊन ज्ञानबानं जमीन ताब्यात घेतली. रेड्याचं बळ असलेल्या ज्ञानबानं आठ दिवसात जमिनीचा कायापालट केला. आता पेरणीसाठी घरातील पुंजी खर्चून ज्ञानबा व मंडळी उमेदीनं त्या शेतात खपू लागली. दिवसामागून दिवस जाऊ लागले. ज्ञानबानं सर्वच वाण त्या शेतीत लावलं होतं. रात्रंदिवस तो शेतात राबत होता. मुलंही वेळ मिळेल तेव्हा ज्ञानबाला मदत करत. आता पिकाला बहर आला होता. सर्व पीक डौलाने उभे होते. गावकरी मंडळीही ज्ञानबाच्या कष्टांचं तोंडभरून कौतुक करत होते. तोही खुशीत होता. अंधार पडू लागला त्या सरशी ज्ञानबा भानावर आला. एकवार पुन्हा त्यानं भरलेल्या पिकावर नजर फिरवली. आपल्या डोळ्यांत आलेले आनंदाचे अश्रू पुसत तो घराकडे निघाला.

सर्वच पिके हुर्ड्यावर आली होती. ज्ञानबा खुशीत होता. ज्ञानबा मनोमन त्या सावकाराचे आभार मानत होता. गावाच्या शिवेजवळ ज्ञानबा पोहोचला. आणि त्याचे पाय जमिनीवरच थबकले. त्याच्या हृदयाची धडधड वाढली, चेहरा उतरला. आकाशातून काळेकुट्ट ढग विद्युत वेगाने त्याच्याकडे येत होते. हळूहळू वारा सुटला आणि त्याचं रूपांतर वादळात झालं. गावात एकच गोंधळ उडाला. 'धावा, पळा, आवरा' असा ओरडा कानावर येऊ लागला. वादळाचा जोर एवढा प्रचंड होता की, झाडे-झुडपे उन्मळून जमीनदोस्त झाली. थोड्यावेळानं टपोऱ्या थेंबाचा पावसाचा मारा सुरू झाला. पक्ष्यांचा पत्ता नव्हता. ज्ञानबा सुन्न अवस्थेत चालत होता. त्याला काहीच सुचत नव्हतं. तो बधीर झाला होता. काही क्षणातच त्या टपोऱ्या थेंबांची जागा गारांनी

पुष्प पल्लवांची, आरास करीत। हासत वसंत येतो, रंग उधळीत।।

**अधिक जाणून घ्या : वसंत पंचमी उत्सव –** पं. बंगाल (मार्च), सरस्वतीची उपासना.

**नागरीवस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम -** नागरीवस्ती अभ्यासगट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - हर्षाताई ☎ ९३२५२७२३३७

घेतली. मोठमोठ्या गारांचा वर्षाव सुरू झाला. गल्लीबोळात गारांचा खच तयार झाला. विजांचा कडकडाट आणि ढगाच्या आवाजानं सर्वांची बोलती बंद केली. निसर्गाचं हे रौद्ररूप पाहून प्रत्येकजण हतबल झाला होता. या सर्व परिस्थितीचा ज्ञानबाच्या मनावर मात्र, कुठलाच परिणाम होत नव्हता. तो शांतपणे चालतच होता.

या अस्मानी संकटानं सर्वांच्या हृदयात धडकी भरली होती. ज्ञानबाला गारांचा मार बसत होता. डोक्याला ठिकठिकाणी जखमा झाल्या होत्या; पण ज्ञानबाला काहीच फरक पडत नव्हता. तो चालतच होता. त्याचं भान हरपलं होतं. आणि अशा अवस्थेत तो घरी पोहोचला. बायको मुले ज्ञानबाची अवस्था पाहून भेदरली. बाहेर निसर्गाचं तांडव सुरू होतं तर ज्ञानबाच्या घरात दुःख, आक्रोश, चिंता होती.

रात्र बरीच झाली होती. ज्ञानबाच्या घरची चूल पेटली नव्हती. तो पायात डोकं खुपसून बसला होता. मुले हुंदके देत उपाशीच जमिनीवर झोपून गेली होती. ज्ञानबाची बाई भिंतीला डोकं लावून भविष्याचा विचार करत अश्रू गाळत होती. रात्रभर दोघंही तसेच बसून होते. सकाळ झाली. आकाश पांढरं शुभ्र दिसत होतं. पक्ष्यांची पुन्हा किलबिल सुरू झाली. निसर्गाच्या त्या रौद्ररूपाची करामत पाहून माणसाचे डोळे पांढरे झाले होते. गावातील सर्व शेतकरी, मजूर शेताकडे धाव घेत होती. ज्ञानबाही झपाझप शेताकडे निघाला. वादळानं झाडंझुडपं, काटे, चिखल यांचा पार काला केला होता.

ज्ञानबाची नजर त्याचं शेत शोधत होती. सर्वच पिके जमिनीशी केविलवाण्या गप्पा करत होते. तो कसातरी शेतात पोहोचला आणि त्याच्या काळजाचं पाणी-पाणी झालं. काल संध्याकाळी डोळेभरून बघितलेली डोलणारी पिकं आणि त्यांची आजची अवस्था पाहून ज्ञानबा ढसा-ढसा रडू लागला. जमिनीवर गुडघे टेकून तो आकाशाकडे पाहू लागला, ‘अरे देवा काय केलं रे तू? काय होतं नि काय झालं. मी बरबाद झालो रे परमेश्वरा. काय करू मी?’ तो धाय धाय रडत होता. विविध विचारांनी त्याच्या मनात गोंधळ घातला. त्या कोलमडलेल्या पिकावर हात फिरवत नशीबला दोष देत तो आकांत करत होता. त्याला धीर देण्यासाठी त्याच्याजवळ कुणीही नव्हतं.

ज्ञानबा डोळे पुसत उठला आणि विहिरीजवळच्या झाडाला डोकं लावून बसला. बसल्याजागी सर्व शेतावर नजर फिरवत असताना भूतकाळात घडलेल्या गप्पा-गोष्टी, विनोद हे त्याच्या नजरेसमोर झरझर येत होतं. तो अधिक हुंदके देत मोठमोठ्यानं रडू लागला. ज्ञानबा अधिक भयाण झाला.





अवतीभवती फुटला मोहोर, श्वास मातीच्या ओंजळीतला। ओळ सुगंधी ओठावरती, अंगणी चाफा मुक्त बहरला ।।

**अधिक जाणून घ्या : उगडी उत्सव –** आंध्रप्रदेश (मार्च/एप्रिल), तेलगू नववर्षदिन.

**प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे.**

त्याच्या मनात पैशाबद्दल कालवाकालव सुरू झाली. त्याचा चेहरा गंभीर झाला. तो कावरा-बावरा होऊन पाहू लागला. तोच त्याला विहिरीपासच्या एका कोपऱ्यात फवारणीच्या औषधाची बाटली दिसली. तो आवेशानं उठून बाटलीजवळ पोहोचला.

आता त्याला सर्व प्रश्नांची उत्तरं सापडली होती. बाटली हातात घेऊन त्यानं तोंडाला लावली; तोच डोळ्यांपुढे त्याची केविलवाणी मुले त्याला दिसू लागली. मोठी मुलगी नववधूच्या रूपात दिसत होती. दोन्ही मुलं पाटी पुस्तक घेऊन अभ्यास करताना दिसत होती. बायको आनंदी चेहरा करून कामाला जात होती. हे सारं दृश्य आठवून ज्ञानबा थोडा भावूक झाला. त्याच्या हातातून बाटली खाली सुटली; पण या क्षणिक आनंदावर मात्र विरजण पडलं. त्याच्या डोळ्यांपुढे लख्ख प्रकाश चमकला आणि त्या प्रकाशातून एक काळी माणूसरूपी छाया त्याच्याकडे येताना दिसली. ज्ञानबा डोळे मोठ्ठे करून पाहू लागला. तो होता सावकार !! क्षणाचाही विचार न करता ज्ञानबा खाली वाकला, बाटली हातात घेतली आणि घटाघटा संपवून टाकली. क्षणार्धात ज्ञानबा खाली कोसळला. पाय झटकत त्यानं या जगाचा निरोप घेतला.

साऱ्या गावात वाऱ्यासारखी बातमी पसरली. अख्खं गाव शेताकडे धावलं. त्याची बायको, मुलं भेदरली. त्याला घरी आणलं. गावातील प्रत्येकाचे डोळे पाणावले. सारं गाव ज्ञानबाच्या कुटुंबाचं सांत्वन करत होतं. काहीजण त्यांच्या भविष्याची चिंता व्यक्त करत होते. सारा गाव सुन्न झाला होता. ज्ञानबा शांत झोपला होता. त्याला आता कोणतीच चिंता नव्हती. मुले धाय-धाय रडत होती. आक्रोश करत होती.

ज्ञानबाला जाऊन तीन दिवस झाले. येणाऱ्यांचा ओघ कमी झाला. घरातील पैसा, धान्य संपत आलं. चौथ्या दिवशी सावकार सांत्वनासाठी ज्ञानबाच्या घरी आला. जणू काही तो ज्ञानबाच्या बायकोला पैशाची आठवण करून देण्यासाठी आला होता. सावकार तिला दोन शब्द समजावून सांगू लागला... पाचव्या दिवसापासून ज्ञानबाची बायको, मुलं 'गारपीटीत' नुकसान झालेल्या शेतावर मजुरीनं कामाला जाऊ लागले.

●●●

**- किशोर पाटील**
माध्यमिक विद्यालय साकरे,
ता. धरणगाव, जि. जळगाव 425105

**✻ विशेष कौतुक ✻**

**सौर फाल्गुन/मार्च २०१४** च्या अंकातील मलपृष्ठावरील प्रकाशचित्राला समर्पक ओळी पाठवण्याच्या आवाहनास **चि. अथर्व सोमण,** दापोली, याने प्रतिसाद म्हणून खालील कवितेच्या ओळी पाठविल्या त्याबद्दल त्याचे विशेष कौतुक!

**रुतुनिया चिखलात जेव्हा,**
**स्वप्न लागे बुडाया!**
**आस धरूनी कमलदलांची,**
**जीवन लागे उमलाया!**

**ऐकाऽ होऽ ऐकाऽ**

**छात्र प्रबोधनतर्फे 'अभिवाचन कार्यशाळा'**

**तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन**

**(इ. ७ वी ते १० वीच्या मुला-मुलींसाठी, अनिवासी)**

कार्यशाळा:
- सुप्त नाट्यगुणांना वाव देणारी
- वाचिक अभिनयाला खतपाणी घालणारी
- साहित्याची गोडी वाढविणारी

सहभागी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने समारोप

**कालावधी :** दि. ३०, ३१ मे व १ जून २०१४
**नावनोंदणी : ३० एप्रिल २०१४ पर्यंत**
**वेळ :** सकाळी ११ ते ४, **शुल्क : ₹** ४००/-
अधिक माहितीसाठी **छात्र प्रबोधन** कार्यालयात संपर्क करा.
**दूरभाष :** ०२० - २४०७१७४/१७९

गंध भरल्या शेतात, कोण वाजवितो पावा। हिरवाईच्या कुशीत, मन झाले जसे रावा।।

**अधिक जाणून घ्या : बैसाखी उत्सव -** हिमाचल प्रदेश (एप्रिल), नवीन धान्यांच्या पेरणीप्रीत्यर्थ, तिरंदाजी नृत्य सादरीकरण.
**प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिन्स्टन, अमेरिका.**

## कल्पकता
लेखांक – ९

# सक्तीची जोडणी (Forced Relationship)

– डॉ. नलिनी गुजराथी

गेल्यावेळी ‘सिनेक्टिक्स’ या तंत्राची माहिती घेताना सिनेक्टिक्स या शब्दाचा अर्थच मुळी दोन परस्परसंबंध नसलेल्या घटकांची जोडणी करणे असा आहे, हे समजावून घेतले होते. जे दोन घटक जोडायचे, त्यांच्यामध्ये साम्य शोधून त्यावर आधारित उपमा आणि रूपके यांचा वापर करून नवीन कल्पना कशा काढायच्या तेही पाहिलं. या लेखात **परस्परसंबंध नसलेल्या शब्दांचा, घटकांचा काहीही करून, ओढून ताणून संबंध जोडायचा आणि त्यातून नवीन कल्पनांची निर्मिती करण्याचा प्रयत्न करायचा आहे**. म्हणजेच इथे तुम्हाला ‘काय वाट्टेल ते’ करायला मुभा आहे.

सुरुवात एका खेळानं करूया. तुमच्या भोवताली दिसणाऱ्या काही घन पदार्थांची नावं लिहा बरं ! इ. आठवीच्या वर्गातील मुलांनी ही काही नावं काढली : १) काच २) रबर ३) दगड ४) प्लॅस्टिक ५) लोखंड ६) लाकूड इ. हे सर्व घन पदार्थ आहेत. तरी ते इतके वेगवेगळे आहेत की दर्शनी तरी त्यात काही संबंध दिसत नाही. आता यातील कोणत्याही दोन वस्तू एकत्र करून किंवा त्यांचे गुणधर्म एकत्रित करून, जोडून काही नवीन कल्पना सुचते का ते बघा! उदा. जसे काच आणि रबर एकत्र जोडून ‘काचेसारखे रबर’ बनवणे. काच ही पारदर्शक आहे तेव्हा पारदर्शकता या गुणधर्माचे आरोपण करून ‘पारदर्शक रबर’ तयार करता येईल का? अशी कल्पना सुचते. कल्पना सुचली म्हणजे ती लगेच प्रत्यक्षात आणता येईल असे नव्हे. मात्र त्यादृष्टीने विचार करणं, प्रयोग करणं सुरू होतं. ‘रबरासारखी काच’ बनवूया म्हणजे रबर जसं लवचिक आहे त्याप्रमाणे ‘लवचिक काच’ तयार करता येईल का? काचेची एखादी नळी कमी जास्त ताणता येईल का? अशीही कल्पना सुचू शकते! आता यांसारखे इतर शब्द एकत्रित करून काय काय कल्पना सुचताहेत ते पाहा!

एखादी समस्या सोडविण्यासाठी आपल्याला या तंत्राचा उपयोग करता येतो. समस्या काय आहे ते आधी मी तुम्हाला सांगणार नाही. तुम्ही प्रथम स्वयंपाकघरातील विविध उपकरणांची व वापरात येणाऱ्या पदार्थांची नोंद करा. उदा. स्वयंपाकघरात खालील उपकरणे व पदार्थ वापरले जातात. १) फ्रीज २) कपाट ३) दिवा ४) कडाप्प्याचा ओटा ५) मायक्रोवेव्ह ओव्हन ६) अन्न ७) पाणी ८) गॅस शेगडी इ.

आता तुम्हाला समस्या सांगते. स्वयंपाकघरात खूप झुरळं झाली आहेत. ती मारण्यासाठी झटपट उपाय शोधा. आता या तंत्रानुसार झुरळं मारण्यासाठी वरील वस्तूंचा, पदार्थांचा उपयोग कसा–कसा करता येईल हे तुम्ही ‘सक्तीची जोडणी’ हे तंत्र वापरून शोधायचं आहे. इ. आठवीच्या मुलांनी काय काय कल्पना काढल्या त्या पाहू.

१. **फ्रीज –** फ्रीजमध्ये – $10^0$C ला झुरळं ठेवली तर ती मरतील.

२. **कपाट –** कपाटातील सर्व फटी सिमेंटने बुजवा म्हणजे तिथं झुरळं शिरू शकणार नाहीत.

३. **दिवा –** *Infra red Lamp* चा उपयोग करून झुरळं मारा.

४. **ओटा –** ओट्यावर डिंक पसरा म्हणजे झुरळं चिकटतील व मारता येतील.

५. **मायक्रोवेव्ह ओव्हन –** ओव्हनचे तापमान $200^0$C एवढे वाढवून त्यात झुरळं टाकली, तर ती मरतील.

६. **अन्न –** झुरळांना आवडणारे अन्न पसरून ठेवा. ते खायला झुरळं जमली की मारा.

७. **पाणी –** बेसीनमध्ये उकळते पाणी टाका म्हणजे पाईपातील झुरळं मरतील.

८. **गॅस शेगडी –** शेगडीतील गॅसवर झुरळं जाळून मारा!

या कल्पना वाचल्यावर तुम्ही नक्की म्हणाल, ‘काय वाट्टेल ते करायला सांगताय राव, झुरळं मारण्यासाठी!’



ग्रीष्माची लाही लाही, शिशिराची थंडी सोसायची असते। परी वसंतातल्या मोहोराप्रमाणे, सतत बहरायचेच असते ।।

**अधिक जाणून घ्या : सुईमाता उत्सव –** हिमाचल प्रदेश (एप्रिल), रानी चंपावती (राजा साहिल वर्माची पत्नी) हिची उपासना.



प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे.

**कृतिपाठ –** प्रयोगशाळेशी संबंधित असलेल्या काही वस्तू खाली दिल्या आहेत. त्या वस्तूंची वेगवेगळ्या प्रकारे 'सक्तीची जोडणी' करून नवीन कल्पना सुचवा आणि 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा.
**१) परीक्षानळी २) चुंबक ३) इलेक्ट्रिक मोटर ४) लोलक** (prism) **५) बॅटरी ६) ब्युरेट.**

यातील काही कल्पना तुम्हाला अगदीच निरर्थक वाटतील तर काही विचार करण्याजोग्या! तुम्हीच त्यातील कल्पनांचे मूल्यमापन करून व्यवहार्य कल्पना कोणत्या, ते निवडा! उदा. 'बेसीनमध्ये उकळतं पाणी टाकणं', ही मला तरी वापरण्यासारखी कल्पना वाटतेय! *Forced Relationship* मध्ये अशा तंत्राला **सूचितंत्र** म्हणजेच *Listing technique* असं नाव आहे.

थोडा फार फरक करून या तंत्राचे आणखी काही प्रकार आहेत. शब्द शोधण्यासाठी जर तुम्ही एखाद्या कॅटलॉगचा, मासिकाचा उपयोग केलात तर त्याला *Catalogue Technique* म्हणतात. ज्यावेळी समस्या आधीच माहीत आहे आणि तिच्याशी संबंधित घटकांचीच जोडणी करायची आहे; त्यावेळी त्या तंत्राला *Forced Relationship* म्हणतात. तर अगदी काय वाट्टेल ते शब्द एकमेकांशी जोडण्याला *Arbitrary forced Relationship* म्हणतात. अर्थात या प्रकारांमध्ये मूळ तत्त्व समानच आहे. ते म्हणजे भिन्न घटकांची सक्तीची जोडणी करणे. कधी कधी नवीन कल्पना स्फुरत नाहीत; त्यावेळी प्रतिभाशक्तीला पण असं ताणावं लागतं, जबरदस्तीनं घोड्यावर बसवावं लागतं!

•••

**– डॉ. नलिनी गुजराथी**
१२७७ शुक्रवार पेठ, सुभाषनगर, रस्ता क्र. ५, पुणे – २

## हाऽ हाऽ हाऽ



**अशीही ओळख??**

एका ट्रॅफिक सिग्नलवर एका भिकाऱ्याला पाहून माणूस बोलला, ''तुला कुठेतरी पाहिलंआहे...''
भिकारी हसला आणि म्हणाला, ''साहेब... आपण फेसबुकवर फ्रेंड आहोत.''





**शंका...**



एक इसम ऑफिसमध्ये जात असताना रस्त्यावर उभा असलेला भिकारी हात पसरून म्हणाला, ''आंधळ्याला पैसा द्या साहेब.''

तो इसम आंधळ्याकडे पाहात म्हणाला, ''अरे, पण तू काही आंधळा दिसत नाहीस.'' भिकारी शांतपणे म्हणाला, ''तुम्हीही साहेब दिसत नाही. पण मी त्याबद्दल शंका घेतलीय का?''

**मूड !!!**



**सिंह** : ठहर जाओ मैं तुम्हारा खून पिऊंगा।
**बुढा आदमी** : अरे, मेरा खून ठंडा पड गया है, किसी नौजवान का गरम खून पिओ।
**सिंह** : चुप !! आज मेरा कोल्ड्रिंक पीने का मूड है !!



**रान हसे हे पिकातुनी, हिरवी शेते झुलती। वसंत गाणे मंजुळ स्वराने, कुहूकुहू कोकिळ गाती।।**



**अधिक जाणून घ्या : समर फेस्टिवल –** तामिळनाडू, (एप्रिल), बोटींच्या शर्यती, फुला–फळांचे शो.

**प्रायोजक – श्री. अजित भिडे** (डायरेक्टर, अ‍ॅसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. ☎ २५३८०४०६) **पुणे.**



# गारेगारवाला

**– कृष्णात खोत**

***आपण आज तऱ्हेतऱ्हेच्या स्वादाची आइस्क्रीम कुठल्याही मोसमात खात असतो. ...तरीही बर्फ किसून त्यावर लाल, हिरवे सरबत ओतून तयार केलेल्या बर्फाच्या गोळ्याचे आकर्षण काही औरच! लहानपणी गावी येणाऱ्या अशाच एका 'गारेगारवाल्याची' आठवण लेखकाच्या मनात आजही ताजी आहे. त्यातून साकारलंय 'गारेगारवाला' हे अफलातून व्यक्तिचित्रण!***

गावाकडं गेलो होतो. गावाची यात्रा होती. खेळण्या-पाळण्याची. खाण्या-पिण्याची दुकानं आली होती. घरात पाहुणे जमले होते. पाहुण्यांची आणि घरातल्या पोरांची एकच घाई. ''मला अमूक खेळणं, मला तमूक खेळणं. मला हे खायाला, मला ते खायाला...'' मोठ्यांना काहीएक ती सुचू देत नव्हती. मारामारी, रडणं, रुसणं, फुगणं, उधळणं चालू होतं.

आई म्हणाली, ''या पोरास्नी जरा न्ये जा नि कायतरी खायाला दे. तेवढीच नादावतील घटकाभर. घरात कोन काय बोलतंय त्ये कळंना हेंच्या दंग्यात.''

आईचं बोलणं पोरांनी ऐकलं. एक होऊन पोरांनी मला घोळकाच घातला. एकच दंगा घर भरून गेला, 'चला द्या आमाला खायाला.'

मी निघालो. सगळ्यांनी मला धरता येईल तिथं धरला होता. मी विचारलं त्यांना, ''काय खाणार?''

प्रत्येकाची वेगळी मागणी. वेगळी मागणी भांडणाला कारण! मी विचार केला; म्हणालो, ''तुम्ही नंतर भांडता. त्यापेक्षा सगळ्यांना एकच काय ते खायला घेऊ.''

स्वराली लगेच पुढे झाली म्हणाली, ''आम्हाला आईस्क्रिमच



रंगुनी जात वसंत शोभा, वनदेवी हो पाहती। वासंतिक हे उटणे लेवुनी, पक्षी नभी विहरती।।



**अधिक जाणून घ्या : बैशागू उत्सव –** आसाम (एप्रिल), गायी तसेच शंकराची उपासना, बगरुंबा नृत्य सादरीकरण.

**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.**

द्या,' पाच रुपयावालं.''

मग सगळ्यांचंच 'द्या-द्या' सुरू झालं.

मी विचारलं, ''पाच रुपयावालंच का?''

स्वराली म्हणाली, ''चांगलं तेच हाय, दोन रुपयावालं चांगलं नाई. लाल बरं आहे पाचाचं. घेवूया.''


मग सगळीच स्वरालीचा सूर धरून बोलू लागली. पाच रुपयावालं आईस्क्रिम सगळ्यांना दिलं. मी पोरांना म्हणालो, ''आमच्या वेळी गावात आसलं आईस्क्रिम येत नव्हतं.''

स्वराली लगेच पुढे म्हणाली, ''मग कसलं ?''

''लाल-पिवळंच; पण आता दोन रुपयावाली लाल कांडी आहे, तसलं नव्हतं. बर्फाचा खिसलेला गोळा लाल-पिवळा, थंडगार गोळा'' ...आणि माझ्या बालपणचे दिवस डोळ्यांसमोर उभे राहिले.

घंटी वाजली, की आमचे कान टवकारत. गावात त्यावेळी सायकल एखादीच आसंल. मग सायकल दिसली तरी आम्ही तिच्या मागं असे. आता ही घंटी गारेगारवाल्याची हे सगळ्यांना लक्षात येई. घंटीनं टवकारलेल्या कानात 'आराराराराऽ, थंडगार, जीवाला आधार, गारेगार!' असा आवाज घुमत राही. सगळी पोरं आवाजाच्या दिशेनं पळत जात. 'लाल-पिवळा, लाल-पिवळा थंडगार गोळा.' आणि 'आराराराराऽ या, या, घेता का फेकू' तो एकसारखा ओरडत असे. जुनी पुराणी सायकल. तिच्या *कॅरेजवर* बांधलेलं लाकडी खोकं. त्या खोक्यात बर्फाची कोंड्यात घातलेली आणि गोणपाटानं झाकलेली लादी. एका कोपऱ्यात लाल पिवळ्या रंगाचं गोड पाणी ठेवलेल्या दोन काचेच्या बाटल्या; *हँडलला* लावलेल्या जाड बंदाच्या दोन पिशव्या. त्याच खोक्याला बर्फ खिसायची तासणी लावलेली. गारेगारवाला भर उन्हाचा गावात येई. दमून घामानं गळत. सायकल वळचणीला भिंतीला चिकटून लावी. मग त्याच घरातलं तांब्याभर पाणी घेई. उलट्या केसाचा भांग त्यावरनं, तोंडावरनं ओला हात फिरवी. हाप हातुब्याच्या शर्टातला गारेगारवाला दंडावरचं हाप हातुबाही मागे दुमडून असे. दुमडलेल्या हातुब्यातून त्याच्या दंडाची बेडकी दिसे. खाकी चड्डी आणि पायात स्लिपर. त्याचा टाचेखालचा चकांदा निघालेला. तो तांब्यातलं पाणी घटाघटा पित. नंतर त्या स्लिपरावर नि पायावर राहिलेलं पाणी ओते. आणि म्हणे, ''आर्धा तांब्या आणतोस आनि पानी?'' ज्ञानू पळतच घरात जाई. तांब्या भरूनच पळत घेऊन घेई. गारेगारवाला कॅरेजवर ठेवलेल्या खोक्याला नमस्कार करी आणि '**आराराराऽ, थंडगार, गारेगार, घेता का टाकू**' म्हणत खिसलेला गोळा रंग न मारता समोरच्या भिंतीवर काय तो फेकी. मग पोरांची झुंबड; फेकलेल्या बर्फाच्या तुकड्यांना वेचण्याची ! हातात घेण्याअगोदरच खिसलेल्या बर्फाचं पाणी होई. आम्हा पोरांना याचं अप्रूप वाटे. फेकलेल्या गोळ्याकडं, चमकणाऱ्या बर्फाच्या लहान कणांकडे आम्ही बघत बसू. तोपर्यंत पोरं भातानं भरलेली भांडी, वाट्या घेऊन आलेली असंत.

आणलेल्या भांड्यातलं भात गारेगारवाला पिशवीत ओतून घेई.





लाल मातीचा गुलाल उधळीत, पवन करी संचार। पहिल्या हिरव्या तृणपात्याचा, आज असे सत्कार।।



**अधिक जाणून घ्या : राष्ट्रीय रामलीला मेळा –** मध्यप्रदेश (एप्रिल), रामलीलेवर आधारित सादरीकरण.

**प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.**

त्याच भांड्यात बर्फ खिसून त्यावर अलगद दाबी. मग बाटलीतला लाल रंग भांड्यातल्या अर्ध्या बर्फावर. आणि पिवळा उरलेल्या बर्फावर शिंपत. चित्रकारानं रंग दिल्यागत मला त्यावेळी वाटे.

हे बघून 'आम्हाला खूळ लावायला येतोय', असं काही बायका त्याला म्हणत.

''मावशे ह्यानं खूळ लागत नाई. खुळ्यालाबी जिवाला आराम मिळतोय'', तो खिसतच बोलत राही. समोरची बाईही हसायला लागे.

आमच्याकडं भाताचंच पीक. त्यामुळे प्रत्येकाच्या घरात भाताशिवाय त्याला द्यायला काहीच असायचं नाही. ज्ञानूच्या भिंतीला सायकल. त्याच्यातला पाण्याचा तांब्या म्हणून त्याला भात न घालताही गारेगार! कधीमधी गावातली एखादी बाई त्याला भाकरी द्याची. तो तसाच उभा राहून हातावर धरूनच भाकरी खात असे. पाणी पित असे. मग भाकरी दिलेल्या बाईच्या पोराला 'गारेगार' मिळे.

घरात असेल तर टोपल्यातलं वाटीभर भात आई देत असे. पण बऱ्याच जणांच्या घरात कोणच नसे. दिवसभर कामाला शेतावर सगळी. मग आम्ही मोठ्या टोपल्यात भात तळाला गेला असेल तर दोघं तिघं मिळून घर उघडीत असे. एकामेकांच्या आधारानं टोपल्यात उतरत असे. वाटीभर भात घेऊन वाटी वर देई; पण टोपल्यातनं वर निघताना टोपल्याची बारी मोडली तर शिव्या बसतील याचीही भीती. आणि नंतर गारेगारच मिळणार नाही, त्याची जास्त भीती. कसरत करूनच





गंधोत्सव अन् रंगोत्सव हा सवेच आला। मोद भरूनिया या भूमीवर, वसंत अवतरला।।



**अधिक जाणून घ्या : रविंद्र जयंती –** प. बंगाल (७ मे) रविंद्रनाथ टागोर जयंतीप्रीत्यर्थ

**प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.**

टोपल्यातनं वर निघावे लागत असे.

एकदा असाच गारेगारवाला आला. मी नेहमीप्रमाणं पळतच घरात आलो. लिपाण काढलेलं टोपलं पूर्ण रिकामं. मग दुसरं टोपलं बघितलं. दोन्ही टोपली दहा -दहा मणाची. आई लांबच्या शेतात गेलेली. लिपाण कोणत्या टोपल्याचं काढायचं? आई कोणतं टोपलं फोडणार हेही माहीत नव्हतं. आणि लिपाण काढून परत लावायला मला येणार नव्हतं. आणि ती घरात असती तरी दहा मणाचं टोपलं गारेगारच्या एका वाटीसाठी फोडलं नसतंच. मी घेतलेली वाटी तशीच टोपल्यावर ठेवली. आईला कळावं म्हणून, 'गारेगारवाला आला आणि ह्याला घेता आलं नाही गारेगार...'

मी ठरवलं होतं; 'आमची आई घरात नाही. नंतर तू आलास की मी आजचंही भात घालतो. मला आज गारेगार दे.' असं म्हणायचं म्हणून!

सगळी पोरं खात होती. मी त्याच्याकडं बघत होतो. ठरवूनही माझं सांगायचं धाडस झालं नाही.

आता कोणंच नव्हतं. तो थोडा थांबला. मग बर्फ खिसू लागला. त्याच्या हातातनं कळा येत नाहीत. त्यानं गोळा बांधला त्यावर रंग मारले. आणि मला म्हणाला, 'धर-'

मी गोळा घेतला. मला गलबलून आलं. एवढ्यात गावातल्या मोठ्या घरातला एक पोरगा. तालमीत खेळणारा पैलवान आला. तो त्याला म्हणाला, ''यक मोठा गोळा दे.''

गारेगारवाला गोळा बांधू लागला. मला कळेना 'बऱ्याचदा हा पैलवान येतो आणि दम देवून ह्याच्याकडून गारेगार फुकट घेऊन का खातो?'

मी संध्याकाळी आईला गारेगारवाल्यानं गारेगार दिल्याचं सांगितलं. नंतर त्याला आईनं मापटंभर भात घातलं, तो नको म्हणताना !!

गावातनं मुख्य रस्त्याला यायला खूप मोठा चढ होता. या चढानं मोकळं चढायलादेखील त्रास होत असे. मग या चढानं तो भातानं भरलेल्या पिशव्या, राहिलेली बर्फाची लादी अशी सायकल ढकलायला कोणालातरी 'चला' म्हणत असे. ह्यानं 'चला' म्हणायचा अवकाश; पोरांची सायकल ढकलायला झुंबड उडे. मुख्य रस्त्यावर गेल्यावर तो गारेगार देई. म्हणून पोरांच्यात भांडण. यात थोराड पोरं लहानखुऱ्यांना पुढं जावूच द्यायची नाहीत.

मग मी आणि राजा त्याला म्हणालो, ''तू आमची पाळीच लाव दोघादोघांची.' नंतर त्यानं तसं केलं. कधी तो पायवाटेनं सायकल ढकलीत आणी तर कधी वाघबिळावरनं रस्त्यानं येई. पायवाटेनं येताना वाट धड नव्हती. तो कसा आणि कोठून सायकल आणतो याचं मलाच नाहीतर गावातल्या सगळ्या मोठ्या माणसांनाही आश्चर्य वाटे. बरं सायकल मोकळी उचलून खांद्यावरनं आणता येईल, वाट नसल्या ठिकाणावरनं; पण याची सायकल भरलेली. ओझ्यानं वाकलेली. तो पायवाटेनं गावच्या माळावरून आणि मग शिवारात येई आणि शिवारातल्या माणसांना गारेगार देत देत गावात येई. शिवारात गारेगार घेतलेली माणसं त्याला न चुकता भात नंतर घालीत. त्यानं न मागताही.

आमच्यातली काहीजणं अधीरपणे पायवाटेवर जाऊन त्याची वाट बघत असत. रविवार, सुट्टीच्या वारी तो ठरल्यासारखा येईच. मी आणि ज्ञानू एकदा सकाळी दहा वाजल्यापासून वाट बघत बसलो होतो. तो आला. म्हणाला, ''मी आज तुमच्या गावाला येणार नाई. माझ्याकडचा बर्फ आधीच संपलाय. यकाचं लगीन हुतं.''

आम्ही निराश झालो, उठलो, निगालो. तो हसला नि म्हणाला, ''आरं, पन तुम्ही गारेगार घेवून जावा. तुमच्या दोघांच्या गोळ्याचा बर्फ मी घेवून आलोय.'' त्यानं बर्फ खिसला. गोळा बांधून आम्हाला दिला. म्हणाला, ''पुढच्या वारी येतोच, जावा.''

आजच्यासारखीच आमच्या गावची यात्रा भरली होती. गावात कुस्त्यांचा फड मोठा. शेतातच मैदान होतं. तिथं गारेगारवाल्याची सायकल होती. माणसं गारेगार घेत होती. मैदान चांगलंच रंगलेलं. गावच्या पैलवानाची कुस्ती लागलेली. गारेगारवाला, गारेगार द्यायचं सोडून कुस्ती बघू लागला. गावचा पैलवान खाली गेला. सगळी बसलेली माणसं उठलेली. मैदानभर सगळी शांतता पसरली. मी गारेगारवाल्याकडं बघत होतो. त्याला दम देवून गारेगार फुकट खाणारा पैलवान मातीत होता. आणखी झटापट झाली. माणसं परत उठली. मात्र प्रतिस्पर्ध्याने लगेच गावच्या



शिशिरात झाले, साऱ्या झाडांचे खराटे। वसंताच्या आगमनी, कोवळिक ती फुटे !।।



**अधिक जाणून घ्या : सागा उत्सव –** सिक्कीम (मे/जून), भगवान बुद्धांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक.

**सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल -** युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

पैलवानाला उलटा केला. कुस्ती झाली. गावच्या पैलवानाला माती चारली नि परगावचा पैलवान मैदानात उडी मारून म्हणाला,

''गारेगारवाल्याचा पोर हाय ह्योऽ''

सगळी गारेगारवाल्याकडं बघू लागली. त्याच्या डोळ्यांत पाणी तरळून गेलं. गारेगारवाल्याचं पोरगं पैलवान, त्यानं फड जिंकला. हे सगळ्या गावात झालं. तो बर्फ खिसून गारेगार वाटू लागला. फुकट. त्यानं गारेगार विकून पोराला पैलवान केला.

मला एका गोष्टीचं बरं वाटलं; गावातला पैलवान तितून पुढं फुकट गारेगार मागायला कधीच आलेला मला दिसला नाही. नंतर कधीतरी त्याची सायकल ढकलत मी गेलो. त्याला त्याच्या पैलवान पोरग्याबद्दल विचारलं. तो फक्त हसला.

सायकल मुख्य रस्त्यावर आली. त्यानं दम टाकला. मग काय मनात आलं आणि तो बोलू लागला,

''आमचं घराणं मोठ्ठं. पण चुलत्यानं माझ्या 'बा'ला मारला. जमीन बळकावली. मलाबी मारायची तयारी केली. मग मला आईनं मामाकडं ठेवला. तिथं मामीनं मला शिकू दिलं नाई. मग पोटासाठी हा धंदा सुरू केला. सगळी जमीन चुलत्याकडं; पण ठरवलं पोराला पैलवानच करायचा. पोरानं नाव केलं. चुलत्याच्या पोराची पोरं माझ्या पोराकडं मान वरू करून बगीत नाईत.'' त्यानं खिसलेल्या गोळ्यावर रंग मारला. लाल, पिवळा. सायकलीवर टांग टाकली. बिनब्रेकची ओझ्यानं वाकलेली सायकल चालवणारा गारेगारवाला गेला.

मी पोरांना घेवून घरात आलो. आईला विचारलं, ''आई गारेगावाला येतो का कधी?''

''न्हाई, आता आसली 'दूदाची'च घेऊन येत्यात. आनि पैशाबिगार दित न्हाईत. त्येची सर ह्यास्नी कुठली आलीया. आनि त्येचं वयबी झालं आसंल. सायकल रेटाय नगो आता?''

''व्होय, बिनब्रेकची सायकल आताच्या डांबरी रस्त्यावर त्याला आवरायचीही नाही!'' मी म्हणालो...

•••

**– कृष्णात खोत**

द्वारा प्रा. एकनाथ आळवीकर
बाळासाहेब इंगवले पार्क, फुलेवाडी,
कोल्हापूर ४१६०१०

**ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्र**

ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्र

**प्रशासकीय /सामाजिक /औद्योगिक क्षेत्रात**
**नेतृत्व करायची इच्छा असणाऱ्या युवक-युवतींसाठी**

**Leadership Orientation Camps/नेतृत्व संवर्धन शिबिरे**

**१२ वी व F.Y. (परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी)**

**सुट्टीत दरमहा ५ दिवसांची निवासी शिबिरे** (पुणे परिसरात, मराठी-इंग्रजी मिश्र माध्यमात)

**♦ २५ ते २९ एप्रिल ♦ २३ ते २७ मे ♦ १३ ते १७ जून**

**नेतृत्वाच्या विविध पैलूंना स्पर्श करणारी कृतिसत्रे**

- कौशल्य प्रशिक्षण
- प्रेरणादायी अनुभवकथने
- अनोखी जोडीकार्ये
- साहस सहल
- स्पर्धा परीक्षांची ओळख
- अर्थपूर्ण मोजकी व्याख्याने
- आव्हानात्मक गटकार्ये
- अनोख्या स्पर्धा, गटचर्चा

**Know Yourself ...Explore Yourself ...Challenge Yourself**

**शुल्क रु. ३,४००/-** (सेवाकर व प्रशिक्षण-निवास-प्रवास-भोजनासह)

*निव्वळ टाईमपास, आळस, सर्वसाधारण शिबिरे यांमध्ये वेळ घालवण्यापेक्षा स्वत:मध्ये असलेल्या नेतृत्वाच्या क्षमता विकसित करण्यासाठी कोणत्याही एका शिबिरात सहभागी व्हा!*

**प्रत्येक शिबिरासाठी मर्यादित प्रवेश ! लवकरात लवकर शुल्क भरून नावनिश्चित करा.**

संपर्क : ज्ञान प्रबोधिनी, नेतृत्व संवर्धन केंद्र, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०
दूरभाष - ०२० २४२०७१७९, नचिकेत - ९४०४२२५३७८

**ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्र व नेतृत्व संवर्धन केंद्राद्वारा**

**प्रिपरेटरी व फाऊंडेशन-बेसिक कोर्स**

एकाच वेळी स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी व नेतृत्वाची पायाभरणी
(पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी वीकएण्ड बॅचेस)
जुलै ते ऑक्टोबर २०१४ च्या बॅचेससाठी प्रवेश परीक्षा एप्रिल पासून सुरू !



कसे पानात खेळती, किती खट्याळ हे वारे। झाड ओथंबुन आले, बाळकैऱ्यांच्या गं भारे।।



**अधिक जाणून घ्या : हेमिस उत्सव** – लडाख (जुलै), थंगका देवीची मिरवणूक व प्रदर्शन.

**७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार** - संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२



# चला पत्ते खेळूया !

– शशिकांत काळे

मुलांनो, सुट्टीमध्ये काय खेळायचे हा प्रश्न तुम्हाला पडतो का? दुपारची वेळ. आई बाहेर उन्हात जाऊ नको सांगत असते. पत्त्यातील तेच तेच खेळ खेळून कंटाळा पण आलेला असतो. मग पत्त्याचा खाली दिलेला मजेदार खेळ खेळून पाहा. हे खेळ अगदी १०० टक्के नवीन आहेत. मग उशीर कशाला? काढा पत्ते आणि करा खेळायला सुरुवात.

**१) दस नंबरी** – प्रकार १

**साहित्य** – पत्त्यांचा जोड

**खेळाडू** – किमान दोन, जास्तीत जास्त कितीही

**कसा खेळायचा?**– पत्त्यांमध्ये २ प्रकार असतात. चित्रे १२ आणि ठिपक्यांचे पत्ते ४०. प्रत्येक पानावर किती ठिपके आहेत ते डावीकडच्या वरच्या कोपऱ्यांत आकड्यातही लिहिलेले असते. चित्रांच्या पत्त्यांवर असा आकडा नसतो म्हणून त्यांचे गुण 'शून्य' समजायचे. अर्थातच लाल–काळा असा भेद नाही फक्त त्या पत्त्याचे मूल्य तेवढेच या खेळात महत्त्वाचे आहे.

१. प्रथम जोडातील सर्व पत्ते वाटा, कमीजास्त झाले तरी हरकत नाही. फक्त शेवटचे एकच पान मध्ये उताणे टाका.

२. समजा, ते पान ३ म्हणजे 'तिर्री' आहे.
आता जो खेळाडू प्रथम खेळणार असेल, त्याने एक गोष्ट करायची ती म्हणजे मध्ये असलेला पत्ता (३) धरून एकूण १० गुण होतील अशा तऱ्हेने पाने खाली टाकायची. इथे १० – ३ = ७ इतकी गुणसंख्या होईल असा संच टाकायचा. तो संच ४+२+१ किंवा ५+२ किंवा फक्त ७ या किंवा कोणत्याही प्रकाराने बनवता येईल.

३. समजा, त्याने ४+२+१ हा संच निवडला. ही सर्व पाने त्याला एकावर एक ठेवायची आहेत. ती पाने टाकताना त्याच्याकडे ३ पर्याय आहेत. ४, २ किंवा १ यांपैकी कोणतेही एक पान तो सर्वात वर ठेवू शकेल. समजा, त्याने ४ व १ खाली ठेवून २ वर ठेवले आहेत.

४. आता पुढच्या खेळाडूला १० गुण पुरे करण्यासाठी ८ गुणसंख्येचा संच टाकावा लागेल. त्यानंतर पुढील खेळाडू खेळेल.

५. काही कारणामुळे तो खेळाडू निर्धारित गुण संख्येचा संच टाकू शकला नाही तर त्याने 'पुढे चाल' म्हणायचे. त्यानंतर पुढील खेळाडूची पाळी येईल.

६. जेव्हा सर्वच खेळाडू 'पुढे चाल' म्हणतील तेव्हा डाव संपला. मग प्रत्येकाच्या हातातील शिल्लक पानांचे ठिपके (गुण) मोजायचे. ज्याचे सर्वात जास्त गुण राहातील. त्याने पुढच्या डावासाठी पत्ते पिसायचे.
हे सगळे झाले पण तुम्ही म्हणाल, की या चित्रांचे काय करायचे? सांगतो ना!

सुरुवातीलाच सांगितले आहे की चित्राची किंमत शून्य आहे. मग **५+२+०+०....= ७** असा संच पण बनवता नाही का येणार? आणि वरती चित्र किंवा '०' गुण पडल्यावर पुढच्याला १० गुण टाकावेच लागतील आणि जर त्याने दश्शीच टाकली तर? त्याच्या पुढच्याला '०' गुणच टाकावे लागतील. इथे एक मात्र करायचे की शिल्लक पानांचे गुण मोजताना 'चित्रा'ची किंमत मात्र, ५ धरा. नाहीतर सगळेजण चित्रेच जमवून ठेवतील.

**२) दस नंबरी प्रकार २ रा**

जर तुम्ही दोघेच खेळ खेळणार असाल तर प्रत्येकाला २६–२६ पाने हातात घेऊन खेळणे अवघड होईल. त्यापेक्षा रमीप्रमाणे सुरुवातीला फक्त ७–७ पानेच वाटा. १ पान उताणे ठेवा. बाकी खेळ तसाच खेळायचा. फक्त 'पुढे चाल' देण्याऐवजी खालच्या गठ्ठ्यातील १–१ पान घेत राहायचे. जेव्हा अपेक्षित संच हातात येईल तेव्हा तो संच खाली टाकायचा. खालचा गठ्ठा संपला की डाव पण संपला.

•••

– शशिकांत काळे
५–डी, रामजी पार्क, इंटिग्रेटेड रस्ता, डहाणू (पू.) 401602



हा मोहोराचा वास, करी सुगंधित मन। गोड गंधित जाहले, हिरवेकंच सारे रान।।



**अधिक जाणून घ्या : रथउत्सव** – ओरिसा (जून/जुलै), जगन्नाथाच्या मूर्तीची भव्य मिरवणूक.

**NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण** - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

चित्रपट रसास्वाद

## उत्कंठावर्धक, वजनदार ग्रॅव्हिटी

– शिल्पा कुलकर्णी

नुकत्याच घोषित झालेल्या २०१३ सालच्या ऑस्कर पुरस्कारांमध्ये *'ग्रॅव्हिटी'* या *३डी सायन्स फिक्शन* चित्रपटाने घसघशीत सात ऑस्कर पुरस्कार पटकावले. या निमित्ताने, 'यापूर्वी प्रदर्शित झालेल्या विज्ञान काल्पनिका आणि *'ग्रॅव्हिटी'* या चित्रपटामध्ये नेमका काय फरक आढळतो?' असा विचार केला असता असे लक्षात येते की, विज्ञान काल्पनिकेच्या काही सांकेतिक कल्पना आपल्या डोक्यात पक्क्या असतात. खूप दूरच्या भविष्यकाळातील, फँटसीच्या आधाराने पुढे जाणारे कथानक, अशी बहुतांश विज्ञान काल्पनिकांची मांडणी केलेली आपण पाहतो. आपल्या या कल्पनांना छेद देऊन *'ग्रॅव्हिटी'तील* कथा ही अवकाश संशोधनाच्या घडामोडींच्या संदर्भात 'आज' कोणत्याही क्षणी घडू शकते. त्यामुळेच प्रेक्षकांना ही कथा खूप जवळची वाटते. चित्रपटात, अवकाश मोहिमेत घडलेल्या एका अपघाताच्यावेळी त्यातून बाहेर पडण्यासाठी वापरलेल्या तंत्रज्ञानाबरोबरच मोहिमेतील सदस्यांची मानसिक-भावनिक आंदोलने, आपत्कालीन संकटांना तोंड देण्यासाठीचे मनोधैर्य, जिद्द या सर्वांचे चित्तथरारक दर्शन प्रेक्षकांना ९० मिनिटे संपूर्णपणे खिळवून ठेवते.

डॉ. रायन स्टोन तिच्या पहिल्या अंतराळयान *एक्सप्लोअररच्या STS-157* मोहिमेमध्ये 'वैद्यकीय अभियंता' म्हणून रूजू झाली आहे. तिच्याबरोबर बुजुर्ग व अनुभवी अंतराळवीर लेफ्ट. मॅट कॉवल्स्की आहेत. ते या मोहिमेचे नेतृत्व करत असतात. त्यांची ही अखेरची मोहीम असणार आहे...

अवकाशात 'हबल' दुर्बिणीची दुरुस्ती करत असताना 'ह्युस्टन' येथील नियंत्रण कक्षातून त्यांना महत्त्वाचा संदेश येतो. अवकाशात एक अपघात झालेला असतो. रशियाचे एक मिसाईल अवकाशातील नादुरुस्त उपग्रहावर (अवकाशातील इ-कचरा) धडकल्यामुळे त्या उपग्रहाच्या ठिकऱ्या उडाल्यात. त्यामुळे *STS-157* ही मोहीम स्थगित करायला सांगणारा व ताबडतोब पृथ्वीवर




परतण्याचा आदेश ह्युस्टन नियंत्रण कक्षाने मोहिमेच्या सदस्यांसाठी पाठवला होता. हा संदेश पोहोचताच नियंत्रण कक्षाचा *एक्सप्लोअरर* यानाशी संपर्क तुटतो.

थोड्याच वेळात अतिजलद गतीने अवकाशात फिरत असलेल्या त्या अपघातग्रस्त उपग्रहाचे तुकडे *एक्सप्लोअरर* यानावर व पर्यायानं दुर्बिणीवर जोरात येऊन आदळतात. त्याबरोबर डॉ. रायन यानापासून बाजूला फेकली जाते. अवकाशात गटांगळ्या खात ती भरकटत जाते. कसेबसे मॅट तिच्या संपर्कात येतात. मॅट व डॉ. रायन जाड कापडाच्या साखळीने एकमेकांना जोडून घेतात. ते दोघे परत यानाच्या कक्षेत येईपर्यंत यानाची बरीच हानी झालेली असते आणि इतर सदस्यांचा दुर्दैवी मृत्यूदेखील!! आता त्या दोघांपाशी 'आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानका'वर (ISS-International Space Station) जाण्याखेरीज पर्याय नसतो. त्यांच्या यानाच्या कक्षेपासून ते स्थानक ९०० मैल दूर असते. तिथे पोहोचण्यासाठी त्यांच्या हातात फक्त ९०मि. इतकाच कालावधी असतो. कारण एक *orbit* पूर्ण करायला त्या अपघातग्रस्त उपग्रहाच्या तुकड्यांना ९० मि. इतका अवधी लागणार असतो.

अतिशय तणावपूर्ण असे वातावरण असूनसुद्धा मॅट घरगुती गप्पा, हास्य-विनोद करून डॉ. रायनचा ताण हलका करण्याचा प्रयत्न करतात. जेव्हा ते आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकापर्यंत पोहोचतात, तोपर्यंत त्याचीही बरीच



आली वसंताची स्वारी, पान पान हिरवळे। मोहोराच्या सौरभाने, आसमंत परिमळे।।

**अधिक जाणून घ्या : तीज उत्सव** – राजस्थान (जुलै/ऑगस्ट), शिव-पार्वतीच्या विवाहाप्रीत्यर्थ उत्सव



**एप्रिल-मे-जूनमध्ये - बारावीसाठी निवासी नेतृत्व शिबिरे** - नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४२०७१७४



हानी झालेली असते. तेथील सदस्यांनी ते स्थानक केव्हाच रिकामे केलेले असते. त्या स्थानकावर असलेल्या मॉड्यूलमध्ये असणारी पॅरेशूटस् पृथ्वीवर परतण्यासाठी निकामी झालेली असतात. त्या स्थानकापर्यंत पोहोचण्याची त्या दोघांची धडपड फोल ठरते. पृथ्वीपर्यंत पोहोचण्यासाठी जरी *मॉड्यूल* निकामी झाले तरी तिथूनच १०० मैलांवर असणाऱ्या 'चिनी अवकाश स्थानक – लिऑनगाँग'पर्यंत जाण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो, असे मॅट सुचवतात. पण डॉ. रायनचा पाय *मॉड्यूलमधील* पॅरेशूटच्या जाड दोरांच्या गुंत्यात अडकतो. मॅटच्या कपड्याच्या पट्ट्याला डॉ. रायन धरून ठेवण्याचा प्रयत्न करते. पण त्यामुळे ते दोघेही अधिकच अडचणीत येतात. अखेर मॅट, तिला जगण्याची संधी देण्यासाठी तिच्यापासून स्वत:ला सोडवून घेतात. क्षणार्धात अवकाशात ते भरकटत जातात. आता डॉ. रायन त्या स्थानकात एकटीच उरते. मॅटशी संपर्क साधण्याचा प्रयत्न ती वारंवार करते. पण ती मॅटशी संवाद साधू शकत नाही. त्या मोहिमेतील ती एकमेव जीवित सदस्य आहे, हे डॉ. रायन महत्प्रयासाने स्वीकारते.

पुढे येणाऱ्या अनेक अडचणींना डॉ. रायनला आता एकटीनेच तोंड द्यायचे असते. अवकाशस्थानकाला लागलेली आग, मॉड्यूलमधलं संपलेलं इंधन, कमी-कमी होत जाणारी आक्सिजनची पातळी या घटनांमुळे तिला जगणं नकोसं होतं. एकवेळ आत्महत्या करण्यासाठी ऑक्सिजनचा पुरवठा बंद करून ती डोळे मिटून घेते. आणि मॅट परत तिथे अवतरतात... ते संकटांशी सामना करण्याचे प्रोत्साहन तिला देतात. तिच्या मनात जगण्याची उमेद जागवतात. तिच्या मनात परत जगण्याविषयी 'असोशी' निर्माण करतात. अतिशय निग्रहपूर्वक ती डोळे उघडते. पाहते; तर तिच्या आजूबाजूला 'मॅट' नसतातच!! पण त्यांचे शब्द डॉ. रायनच्या कानात घुमत राहतात...

तिथून सुरू होतो पृथ्वीवर, गुरुत्वाकर्षण कक्षेत येण्यासाठी केलेल्या धडपडीचा, जिद्दीचा, विजिगीषू वृत्तीचा नितांत सुंदर प्रवास!! येणाऱ्या प्रत्येक संकटाचे आव्हान स्वीकारून डॉ. रायन पृथ्वीवर पोहोचते! तिच्या 'जगण्याच्या असोशीचे बल'(force) हे गुरुत्वाकर्षणाच्या बलाइतकेच महत्त्वाचे ठरते!! जणू 'आपले पाय जमिनीवर घट्ट रोवून आपल्याला उभे राहता येण्याचे महत्त्व' हा चित्रपट अधोरेखित करतो.

**ऑक्टोबर २०१३** साली प्रदर्शित झालेल्या *'ग्रॅव्हिटी'* या *सायन्स फिक्शन* चित्रपटाचे हे कथानक. क्षणोक्षणी प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचवणारे!! चित्रपट जरी ९०मिनिटांचा असला तरी त्याच्या निर्मितीचा काळ तब्बल साडेचार वर्षांचा होता. चित्रपटाचा उत्तम तांत्रिक दर्जा, आखीव रेखीव दिग्दर्शन (अल्फान्सो कुरियन) सँड्रा बुलक (डॉ. रायन स्टोन) व जॉर्ज क्लूनी (मॅट कॉवल्स्की) यांचा अभिनय ही चित्रपटाची बलस्थानं आहेत. संपूर्ण चित्रपटात जरी ही दोनच पात्रं असली तरी त्यांना बघताना कुठेही कंटाळा येत नाही. अवकाशातील त्यांचे चालणे असू दे, अवकाशातील जडशीळ पोषाख अंगावर बाळगणं असू दे, दोघांनी हे आव्हान सहज पेलले आहे. कमरेभोवती जाड दोरांचे रिंगण अडकवून लोंबकाळलेल्या स्थितीत *शॉट* देणे सोपे खचितच नव्हते. भूमिकेची लांबी कमी असूनही जॉर्ज क्लूनी यांनी मोहिमेचं नेतृत्व करणारा मिश्किल तरीही जबाबदार नेता बारकाव्यासहित सादर केला. सँड्रा बुलकचाही अभिनय अप्रतिम ! 'नासा'च्या मदतीने सांभाळलेली चित्रपटाची तांत्रिक बाजू अफलातूनच! प्रेक्षकांना दिलेला अवकाशाचा, अवकाशस्थानकांचा व उपग्रहांचा ३डी परिणाम प्रत्यक्ष चित्रपट पाहून अनुभवावा, असाच!! म्हणूनच वास्तव व काल्पनिकाचं अपूर्व संगम साधलेला हा चित्रपट मनात दीर्घकाळ रेंगाळत राहतो.

•••

**– शिल्पा कुलकर्णी**
सी-२०४ , पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे 411009



**पारिजात माझ्या दारी, फुले सुखाची सांडतो। अमृताचा कोंब माझ्या, अंगणात अंकुरतो।।**



**अधिक जाणून घ्या : झपन उत्सव** – प. बंगाल (ऑगस्ट), विविध प्रकारच्या सर्पांचे प्रदर्शन.

**दहावी-बारावी कलचाचणी, पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन** – प्र. मा. संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

# मचाण



रानामधल्या पिंपळावरी
उंच बांधले मचाण भक्कम
चढून त्यावर न्याहळले मी
सभोवतीचे दृश्य विहंगम...

फांद्यांवरती फांद्या आणिक
झाडांभवती वेली सुंदर
हिरव्या–पिवळ्या–निळ्या–केशरी
रंगांमधले रंगित अंतर...

तऱ्हेतऱ्हेचे गंधित वारे
नाचनाचती सळसळ पाने
किती किती हे रंग देखणे
आणि मनोरम किलबिल–गाणे..!

गवतामधुनी खेळत येई
हिरवी हिरवी लहर कोवळी
गायींसंगे, हरणांसंगे
शुभ्र सश्यांची लगबग इवली..!

इथेच बसुनी मस्त गायिली
बालकवींची कविता भोळी
पुन्हा पुन्हा वर चढणारा तो
गोष्टीमधला जिद्दी कोळी...

कळले नाही, कधी पोचला
मावळतीला मित्र केशरी
आणि पश्चिमेकडे पांगले
आकाशावर रंग भरजरी

मचाण माझे शांतिनिकेतन
साप्ताहिक सुट्टीचा मेळा
निसर्गप्रेमी जो जो त्याला–
प्रवेश येथे मुक्त–मोकळा...

– **आश्लेषा महाजन,** 'मंजिरी', २३० चित्ररेखा सोसायटी, सहकारनगर क्र. १, पुणे 411009

**पानगवत्या भुईने, वसंताचे दान घ्यावे। पतझडींची सावली, कोंब सावलीस यावे।।**

**अधिक जाणून घ्या : गुगा उत्सव –** हिमाचल प्रदेश (ऑगस्ट), नागदेवाची उपासना.



# ध्येयासक्ती महान टेनिसपटूची

प्रत्येक विद्यार्थ्याला परिश्रमाशिवाय पर्याय नसतो. ज्या विद्यार्थ्याला आपले ध्येय सापडले, तो त्याच्या आयुष्यातील आनंदाचा आणि आव्हान स्वीकारण्याचा क्षण ! यानंतर सुरू होते ध्येयपूर्तीची लढाई. अथक परिश्रम, साधना, एकाग्रतेने केलेला पाठपुरावा, शिस्त, ज्येष्ठांचे मार्गदर्शन व अनुभव अशा अनेक गोष्टींचा उपयोग करीत ही ध्येयासक्ती यशाकडे वाटचाल करीत असते. याबरोबरच यशाचे शिखर गाठलेल्या साधकाचे अनुभव, त्यांची वृत्ती या विषयीची माहिती आपणास एक नवीन जाणीव किंवा दृष्टी देवू शकते. **बिली जीन किंग** या प्रसिद्ध महिला टेनिसपटूने लिहिलेल्या **Pressure is a priviledge** या पुस्तकात टेनिस जगतातील काही अव्वल दिग्गजांची जी उदाहरणे दिली आहेत ती सर्वच विद्यार्थ्यांना त्यांच्या ध्येयप्राप्तीकडे मार्गक्रमण करताना नक्कीच उद्‌बोधक ठरतील.

...ही गोष्ट आहे १९८९ सालची. मार्टिना नवरातिलोव्हा ही शिकागो शहरात पुढच्या १९९० सालातील मोसमाच्या स्पर्धांच्या सरावासाठी आली होती. या वर्षांत कुठल्या स्पर्धांमध्ये भाग घ्यावयाचा हे तिने आधीच ठरविले होते. तिच्याबरोबर तिचे प्रशिक्षक क्रेग कार्डनही होते. याव्यतिरिक्त बिली जीन किंग या जुन्या जाणत्या खेळाडूलाही तिने अतिरिक्त प्रशिक्षक म्हणून घेतले होते.

बिली जीन ने तिला विचारले, ''पुढच्या सालचे, १९९० चे तुझे एकमेव उद्‌दिष्ट काय आहे?''

मार्टिनाने सांगितले, ''विम्बल्डनचे महिला एकेरी स्पर्धेचे अजिंक्यपद मला जिंकायचे आहे.'' बिलीने तिला विचारले, ''एवढे एकच ध्येय तुला पुरेसे आहे का?''

मार्टिनाने उत्तर दिले, ''होय.'' यानंतर प्रत्येक दिवशी मार्टिना आपल्या मानसिक, भावनिक, आध्यात्मिक आणि शारीरिक क्षमतेबद्‌दल नोंदी ठेवत होती. तिच्या दोन्ही प्रशिक्षकांनी ही वही दररोज मैदानावर आणण्यास सांगितले होते आणि प्रत्येक महत्त्वाची वाटलेली गोष्ट नोंद करण्यास सांगितले होते. उदाहरणार्थ तिला एखादा नवीन शैलीचा फटका मारण्याचा प्रयत्न करायचा आहे तर त्याची ती वहीत नोंद करीत असे आणि त्याप्रमाणे तिचे प्रशिक्षक तिला त्यासाठी मदत करीत असत. बिली जीन किंगने तिला तिचे विम्बल्डन स्पर्धा जिंकण्याच्या ध्येयाविषयीची बळकट धारणा व्यक्त करणारे वाक्यही दररोज लिहिण्यास सांगितले होते. सकाळी आणि संध्याकाळी सरावानंतर दररोज मार्टिना, 'मी १९९० सालची विम्बल्डन स्पर्धा जिंकली आहे.' हे वाक्य सलग सहा महिने आपल्या वहीत लिहित होती. एका जुन्या आठवणीसारखे भविष्यातील हे स्वप्न जणू सत्यात उतरत आहे या दृढ भावनेने तिच्या मनात घर केले होते. अशा रितीने सहा महिन्यांच्या निष्ठेने केलेल्या प्रयत्नांनंतर खरोखरच १९९० सालची स्पर्धा तिने जिंकली. तिचे हे विम्बल्डन स्पर्धेतील नववे अजिंक्यपद होते आणि हा विक्रम आजही अबाधित आहे. तिने स्वत:वर विश्वास ठेवला आणि शेवटी तो इतका दृढ झाला, की तिने तो सार्थही ठरविला.

•••

– श्रीकृष्ण रानडे
एच ३०३, सप्तसूर, डी. एस. के. विश्व, धायरी, पुणे – ४१

**ज्ञान प्रबोधिनी विस्तार केंद्र, बोरिवली**
**विद्यार्थ्यांसाठी कलचाचणी व समुपदेशन**

| | |
|---|---|
| **कल चाचणी** | : रविवार, दि. ६ एप्रिल २०१४ |
| **समुपदेशन** | : रविवार, दि. २० एप्रिल २०१४ |
| **वेळ** | : सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० |
| **स्थळ** | : सेंट ड्रॉप्स हायस्कूल, गोराई, बोरीवली (प), मुंबई |
| **शुल्क** | : ₹ ५६२/– |
| **संपर्क** | : **सुमिता पांढरे – ९९६९०५१५७३** |


**लवलवते तरुवरती पालवी, ही नवथर ती। सण मंगल जन करती, नटलेली जणू धरती ॥**

**अधिक जाणून घ्या : फांग ल्हाबसोल उत्सव -** सिक्कीम (ऑगस्ट), जगप्रसिद्ध कांचनजुंगा शिखराची पूजा.

# ओळख गावाची

– हरिहर आठलेकर

***त्या महाकाय खडकाच्या माथ्यावर सपाटी थोडीच होती. भणभण वारा आणि ऊन मात्र होतं. त्या खडकाला माणसाचा स्पर्श क्वचितच होत असेल असं वाटलं. नाम्या आणि त्याचे मित्र तिथे पोहोचले होते...***



नाव नामदेव असलं तरी त्या गावात सगळेच त्याला 'नाम्या' या नावानंच ओळखत. नाही तरी कोकणात ठेवलेलं नाव सरळपणानं घेण्याची रीत नाहीच आहे. प्रकाशचा पक्या, धोंडूचा धोंड्या, सुमनची सुमी वगैरे. पाळण्यातली नावं फक्त शाळेत राहतात आणि कधीतरी तिसरीच नावं पुढं येतात. ती रूढही होतात. तरी बरं, की नामदेवाचा 'नाम्या' तरी झाला. मूळ नाव अगदीच सांडलं नव्हतं. नाम्या तसा दोन वेळ जेवायला, रात्री झोपायला तेवढाच घरात असे. मात्र, शाळेत नाम्या कधीच गैरहजर नसे. त्यासाठी नववीत की दहावीत असताना शाळेनं त्याचा खास गौरवही केला होता. नाम्या अभ्यास कधी करी, कसा करी त्याचं त्यालाच माहीत. हां, कधीतरी गुण कमी पडले एखाद्या विषयात तर काणे सर म्हणत, ''नामदेवराव सांभाळा ! या विषयाचं लक्षण काही ठीक दिसत नाहीये. बघा. लक्ष द्या जरा.'' नामदेव मनापासून त्या विषयाचा अभ्यास करी. उणीव दूर होई.

हा नामदेव करमळीच्या रावजी बिड्याचा मुलगा. करमळी गावच्या कुपीचा डोंगर ऐस-पैस पसरला होता. डोंगराचं एक शिखर मासेमारीसाठी खोल समुद्रात गेलेल्या होड्यांना नेमकी दिशा दाखवी. लांबून ते गणपतीसारखं भासे म्हणून त्याला 'गणेशगुंडा' म्हणत. रावजींचं घर कुपीच्या डोंगराच्या पायथ्याला सौम्य उताराची जी सपाटी होती त्या सपाटीवरच होतं. सपाटीची तशी आणखीही सहा घरं बिड्यांचीच होती. त्या सपाटीच्या खाली खाडी काठाची मळे जमीन होती. त्या

मळ्यांत उन्हाळी, पावसाळी भातं पिकतच. शिवाय चवळी, मूग, उडीद, पावटा अशी पिकं मधल्या हंगामात घेता येत. रावजीच्या वाट्याला त्या मळ्यात पाऊण एकराची एक फाळी आलेली होती. रावजी चार यत्ताच शिकला होता. त्याचा मोठा मुलगा सातवी पास होऊन मुंबईला गेला; तेव्हा गावातली शाळा सात यत्तांची झाली होती. नाम्याची सातवी झाली त्याचवर्षी गावात पुढचं शिक्षण देणारं विद्यालय सुरू झालं. तो दहावी झाला त्यावर्षी गावातल्या त्या विद्यालयाला अकरावीची मंजुरी मिळाली. आता नाम्या अकरावी शिकत होता.

रावजी विठ्ठलभक्त होता. मोठा ज्ञानू, दोन मुली, मुक्ता आणि मीरा. ही सगळी मुलं सातवीपर्यंत शिकली. मुलींची लग्नंही झाली. मुली लग्न होऊन गेल्यानंतर रावजीची बरीच ओढाताण होऊ लागली. एकदा रावजीला वाटलंसुद्धा की, नामदेवाला आता 'शाळा पुरे झाली', असं म्हणावं; पण त्यानं विचार केला, की दिवसेंदिवस शिक्षणाला महत्त्व येतंय. नव्या नव्या गोष्टी उजेडात येतायंत. जिथं रावजीला सायकल पाहायला मिळणं कठीण होतं तिथं तोच नाम्या सायकलनं शाळेत जाई. ज्या कच्च्या रस्त्यानं बैलगाडीदेखील केव्हातरीच जाई, तिथं दिवसातून दहा-बारा एस. टी. धावत होत्या. असं असलं, तरी नाम्यानं शेतीच्या कामांशी आणि श्रमांशी फारकत घेतली नव्हती. नांगरणीपासून शेतीची सगळी कामं तो करी. शिवाय गुरांविषयी त्याला आणि गुरांनाही त्याच्याविषयी विशेष माया होती.

नाम्या सुट्टीच्या दिवशी स्वत:चीच नव्हे तर ब्राह्मण आळीतल्या राधेभटणीचीही गुरंवासरं चरायला घेऊन जाई. जाताना शबनममध्ये दोन पुस्तकं टाकायला तो विसरत नसे. शरद टेंगशे हे गावचेच शिक्षक त्या उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक होते.

टेंगशे सर हे स्वत: अभ्यासू आणि चिकित्सक होते. त्यांनी शाळेतल्या मुलांना अनेक चांगल्या सवयी लावल्या होत्या. त्यातली एक सवय होती, अवांतर वाचन. मुलांचा कल आणि आवड पाहून मुलांसाठी सर स्पर्धा भरवत. काही प्रकल्प मुलांकडून ते राबवून घेत. टेंगशे सर शाळेच्याच नव्हे, तर त्या तालुक्यातल्या सर्व माध्यमिक विद्यालयांना अशा स्पर्धेत उतरवीत. खेळांच्या तर स्पर्धा होत्याच; पण भात कापणीची स्पर्धा, होडी वल्हवण्याची स्पर्धा, अशा वैविध्यपूर्ण स्पर्धाही ते भरवत.

यावर्षी त्यांनी अकरावीच्या मुलांनाही वेगवेगळे प्रकल्प करायला दिले होते. एक दिवस त्यांनी अकरावीच्या सगळ्या विद्यार्थ्यांना शाळेच्या सभागृहात बोलावलं. प्रथम टेंगशे सरांनी प्रकल्पाची कल्पना विद्यार्थ्यांना दिली. म्हणाले, ''प्रत्येकाचा प्रकल्प चाळीस ते पन्नास पानांचा होईल किंवा व्हावा, असं मला वाटतं. तिथे टबात चिठ्ठ्या ठेवलेल्या आहेत. प्रत्येकानं तीन चिठ्ठ्या उचलायच्या. या तीन चिठ्ठीतल्या तीन नावांपैकी एक नाव, विद्यार्थ्यांनी प्रकल्पासाठी निश्चित करायचे. त्या नावाची चिठ्ठी स्वत:कडे ठेवून उरलेल्या चिठ्ठ्या परत टबात टाकायच्या.''

नाम्याची पाळी आली तशा त्यानं तीन चिठ्ठ्या उचलल्या. पहिलीच चिठ्ठी उघडली ती 'गणेशगुंडा' होती. मग दुसरी होती 'निवळ व्हाळ.' तिसरी होती 'करमळीतला खाडीकाठ'. नाम्यानं पुन्हा थोडा विचार केला आणि त्यानं 'गणेशगुंडा'च पक्का केला. सगळ्यांच्या प्रकल्पाची निवड निश्चित झाली तशी टेंगशे सरांनी यादी केली आणि म्हटलं, ''यातले जे प्रकल्प चांगले उतरतील त्यांच्या पुस्तिका आम्ही तयार करणार आहोत. डिसेंबर महिन्याच्या मध्याला आपल्या शाळेचं स्नेहसंमेलन होईल. निवडक प्रकल्पांना स्नेहसंमेलनात पारितोषिक मिळेल. तेव्हा वीस नोव्हेंबरपर्यंत तुमचे प्रकल्प तयार व्हावेत. लागा कामाला!''

मुलांनी स्वत: काही धुंडाळावं, शोधावं, त्यावर विचार करावा आणि आपल्या मतानं निर्णय घ्यावा, असा उद्देश हे प्रकल्प मुलांना देण्यामागे



**निळी जांभळी इवली नाजुक, फुलली केशर फुले। मंदधुंद तो परिमळ त्यांचा, आसमंति दरवळे।।**



**अधिक जाणून घ्या : अदि पेरुक्कू उत्सव –** तामिळनाडू (ऑगस्ट/सप्टेंबर), नद्यांचे पूजन.

मन वज्र हवे अन् मनगट ते पोलाद, **'छात्र प्रबोधन'** वाचून द्यावा कृतिरूप प्रतिसाद.

तर होताच; पण अधिक महत्त्वाची गोष्ट होती आपल्या गावाची, निसर्गाची, माणसांची नीट ओळख व्हावी, त्यांच्या विषयी प्रेम वाटावं. तसंच मुलांना त्याचा रास्त अभिमानही वाटावा.

सर्वांच्या परीक्षा आटोपल्या की, शाळेत ग्रंथ प्रदर्शन मांडलं जाई. ते सकाळी आठ वाजल्यापासून रात्री आठपर्यंत खुलं असे. त्या ग्रंथांमध्ये मुलांनी यशस्वी केलेल्या प्रकल्पांच्या पुस्तिकाही मांडल्या जात. पहिल्या वर्षी कमी पण दुसऱ्या वर्षापासून बरेच ग्रामस्थही हे ग्रंथ प्रदर्शन पाहायला येऊ लागले. गाववाले टेंगशेसरांवर खुश होते.

अकरावीच्या सर्वच मुलांमध्ये प्रकल्पांविषयी जोरदार चर्चा सुरू होत्या. प्रकल्पाचा विषय नाम्याच्या डोक्यात घोळत होता. तेवढ्यात कबीर खान आणि पास्कू डिसोजा हे त्याचे मित्र त्याच्याकडे आले.

''आठवण आहे ना तू निवडलेल्या प्रकल्पाची ?'' पास्कूनं विचारलं.

''माझ्या विषयाची मला आठवण आहे रे; पण तू निवडलेला विषय आता मला आठवत नाही.''

''मी निवडला 'करमळीतला खाडी किनारा.' पण मला कशी सुरुवात करावी, ते कळत नाहीये.'' पास्कू म्हणाला.

''त्यात काय मोठं? मी तुला काही प्रश्न देतो. मग त्याबरोबर काही प्रश्न तुलाही सुचत जातील. मात्र ते प्रश्न लक्षात राहावे आणि आपल्या प्रकल्पाची सुसंगत मांडणी व्हावी म्हणून लिहून ठेवायचे. मग त्यांना क्रम दद्यायचे आणि ते समोर ठेवून लिहायला बसायचं. त्या प्रश्नांची उत्तरं म्हणजेच आपले प्रकल्प. चल आपण गणेशगुंड्याकडे जाऊ. मलाही असेच प्रश्न काढायचे आहेत.'' नाम्या म्हणाला. ''भलताच हुषार आहेस रे नाम्या!'' कबीर म्हणाला.

मी काही हुशार वगैरे नाही हं. अरे, दहावीत मला ८१% च मिळालेत,'' नाम्या म्हणाला.

''पण पारितोषिकं किती घेतलीस? दोन भाषांची पहिली पारितोषिकं तुलाच. पुन्हा इतिहास, भूगोल दोन्ही विषयांची तुलाच! तू एकट्यानं नऊ हजार रुपये मिळवलेस. ह्या कबीराला फक्त गणित विषयाचं एकच पारितोषिक...'' पास्कू म्हणाला.

''तुला विज्ञान आणि गणिताचं. दुसरं मिळालं, ते नाही सांगत? चला लवकर निघूया. सूर्य माथ्यावर यायच्यापूर्वी परतायला हवं.''

''शिवाय त्या जंगलात वाघाची कायम वस्ती असते म्हणे,'' कबीर म्हणाला.

''असतेच ! त्यात काय मोठंसं? आपल्या गावचं ते भूषण नव्हे?'' ''हो रे बाबा, ठरल्याप्रमाणे आम्ही घरी सांगून तुला भीमातल्या जांभळीकडे गाठतो.''

''या ऽ! पण एक करा. कबीर, तू फरशी आणि पास्कू, तू पाळ कोयता घेऊन ये,'' नाम्या म्हणाला.

''खंय जातात तुम्ही? डोंगरतल्यान भोवांक (फिरायला)? राती राधे भटणीची गाभणी गाय घरा येऊंक नाय. जाग घेया वांयच!''

नाम्या दारासमोरची घाटी चढू लागला. कबीर, पास्कू दोघे घराच्या दिशेनं निघाले. ते नाम्याला जांभळीत गाठणार होते.

नुकताच सूर्य उगवला होता. हवा बऱ्यापैकी थंड होती. नाम्या भीमातल्या जांभळीकडे पोचला. तोवर कबीर आणि पास्कूदेखील पोचले. तेवढ्यात पायवाटेवरून जाताना मागं जवळच कोणत्यातरी प्राण्याची जाग लागली म्हणून तिघे तिकडे डोकावले. नाम्याला पाहून गाय हंबरली. ती गोजिरवाण्या पाडसाला चाटत होती. पास्कू म्हणाला, ''भटणीची गाय व्याली वाटतं. आता !''

''तिला घरी पोचवायची. उचल वासराला ! मी गायीला घेऊन येतो. नुकतीच व्यालीय वाटतं. नाळ, गेळ सारखं करणं, गाईला धुऊन वासराला आचळाला लावायला हवं,'' म्हणत नाम्यानं गायीला 'चल' म्हटलं. वासरू उचलल्याबरोबर गाय त्यांच्यामागून हुंकारत चालू लागली. सगळीच मुलं गुरात वावरणारी होती. गुरांनाही माणसांची पारख असते. गुरांची निगा करणारी माणसं ती बरोबर ओळखतात. गाईला गोठ्यात पोचवून कुपीच्या रानात



पानापानात डोलते, एक हासरी लकेर। फुलाफुलात वसते, धुंद सुगंधाचे माहेर।।

**अधिक जाणून घ्या : फुलेच उत्सव –** हिमाचल प्रदेश (सप्टेंबर), वेगवेगळ्या रंगाच्या, प्रकारांच्या फुलांचे प्रदर्शन.



स्वावलंबनातून आत्मविश्वास, धडपडीतून आनंद, **'छात्र प्रबोधन'** वाचून लागतो या साऱ्याचा छंद.

गणेशगुंड्याजवळ ते तिघं पोचले तेव्हा नऊचा सुमार झाला होता.

तिथं पोचायला उशीर झाला होता खरं; पण हवेत बऱ्यापैकी गारवा होता. जिज्ञासा आणि नवीन जाणून घेण्याची उमेद यामुळे मुलांना त्याचं काही वाटत नव्हतं. तिथेही गणेशगुंड्याकडे जाण्यासाठी मुलं वाट हेरू लागली. एका ठिकाणी जनावरांची होळ (रानटी जनावरांचा जाण्या-येण्याचा मार्ग) दिसली. तिथून झाडी तोडत गुंड्याकडे पोचणं सोपं होतं. काटेरी झाळी तोडून गुंड्याच्या पायथ्याशी जायला तरी त्यांना अर्धा तास लागला. पन्नासेक फुटांची तात्पुरती वाट झाली. पुढं लहान-मोठी खडकंच होती. समोर गणेशगुंड्याचे दर्शन होत होते. तो पांढऱ्या खडकांच्या भराने बनला होता. पण शेवूळ दाटून तो काळा दिसत होता. आत खांचा कपारी खूप होत्या. त्यात बहुधा भेकरं निवाऱ्याला येत असावीत. दुरून तो सुळका गोलाकार आहेसं वाटे.तो मुख्य खडक तिथून पन्नासहून अधिक फूट उंच होता आणि ओबडधोबडही होता. खरं म्हणजे एका बाजूनं खडक आणि कपारींचा आधार घेत तिघेही खडकावर पोचले आणि चकित झाले. मधून मधून खाडी किनारा आणि फिरत्या बत्तीचं समुद्रातलं जुवा बेट आणि त्या पलीकडचा समुद्र नजरेत भरत होता. मासेमारीसाठी गेलेल्या शिंडांच्या मोठ्या होड्याही दिसत होत्या.

त्या महाकाय खडकाच्या माथ्यावर सपाटी थोडीच होती. भणभण वारा आणि ऊन मात्र होतं. त्या खडकाला माणसाचा स्पर्श क्वचितच होत असेल असं वाटलं. पूर्वेच्या बाजूनंही थेट रांगणागडापर्यंत टापू नजरेत येत होता. त्या नदीमुळं सुपीक झालेलं माणगावचं खोरं नजरेत भरत होतं. वालावल-नेरूर गावांतून जाणारं नदीचं पात्र दिसत होतं. जरा वेळानं उन्हाच्या झळा जाणवू लागल्या तसे तिघंही खाली उतरले. पश्चिमेच्या बाजूनं त्या खडकाचीच सावली होती आणि त्या खडकाला टेकून बसायला आसनंही भरपूर होती. खरं तर त्यांना भुकेची जाणीव व्हायची; पण जिज्ञासा आणि न पाहिलेल्या गोष्टी पाहाण्यात कसली आठवणच त्या तिघांना नव्हती.

‘‘आपणच ह्या गणेशगुंड्याकडे पहिल्यानं आलो असू नाही?’’ कबीर म्हणाला. तो जरा वरच्या अंगानं त्या महाकाय खडकाला पाठ टेकून बसला होता. त्याच्याकडे पाहात खाली बसलेला नाम्या म्हणाला,

‘‘असं का म्हणतोस? बापल्या धनगराची बोकडं येत असतील ना इथं चरत!’’ एवढं बोलता बोलता त्याची नजर एका खडकाच्या भागावर स्थिर झाली. नाम्या टक लावून पाहातच राहिला. मग उठून आणखी पुढं पुढं होऊन त्या खडकाचं नाम्या निरीक्षण करू लागला.

‘‘एवढं बारकाईनं काय बघतोयस त्या खडकात?’’ पास्कूनं विचारलं.

‘‘नाम्यानं निवडलेला ‘गणेशगुंडा’ हाच त्याच्या प्रकल्पाचा विषय आहे ना? मग त्यासाठी तो निरखून पाहतोय,’’ कबीर म्हणाला.

कबीर म्हणाला तेच खरं असावं. आपणच या खडकाला पाहणारी आणि स्पर्श करणारी पहिलीच माणसं असणार. जरा बारीक बघ हे काय दिसतंय? हा आकार बघ... आणि मग जरा पुढं तितं बघ,’’ नाम्या उत्सुकतेनं म्हणाला.

ते दोघंही तसंच निरखू लागले.

‘‘अरे होय !’’ पास्कू म्हणाला, ‘‘आम्ही संध्याकाळी अंगणात क्रूसाकडे मेणबत्ती पेटवतो. वितळलेलं मेण हवेनं गोठतं तसाच या खडकाचा हा भाग दिसतोय. मग जिज्ञासेनं तिघेही चारी बाजूंनी त्या खडकाचं निरीक्षण करू लागले. त्यांना असे गोठलेले थेंब पडावेत तसे बरेच ओघळ दिसले.’’

‘‘असं कसं रे हे? विशाल मेणबत्ती वितळावी आणि असे हे ओघळ उमटावेत...?’’ पास्कूनं विचारलं.

‘‘अरे सोपं आहे उत्तर! आपण तिघांनी एक पुस्तक वाचलं होतं मागं, आठवतं का बघ..’’ नाम्या म्हणाला.

‘‘एक ग्रह. त्याचं नाव पृथ्वी!’’ कबीर म्हणाला.



**मंजुळ कुहु कुहु, स्वरलयींनी मोहरली। आम्रवनातुनी मधुगंधाची, उधळण ही झाली।।**



**अधिक जाणून घ्या : नंदादेवी रज्जत यात्रा उत्सव –** उत्तराखंड (ऑगस्ट/सप्टेंबर), नंदादेवी यात्रा व शिखराची उपासना.

जिद्द, साहस, रंजकता यांचा मेळ भारी, **‘छात्र प्रबोधन’** सवे घेऊ उंच भरारी.



''बरोबर ! पृथ्वीच्या प्राचीन घडणीत ज्वालामुखींचं मोठंच कार्य आहे. हा आपला कुपीचा डोंगर ज्वालामुखीच्या उद्रेकातून निर्माण झाला आहे. त्याचा हा बिनतोड पुरावा आहे. मात्र काळाचा पुरावा नाही.''

''हा बघ आणखी एक चमत्कार!'' सौम्य उतार असलेल्या एका पांढऱ्या खडकाच्या पृष्ठभागाकडे बोट करीत कबीर म्हणाला, ''प्राचीन काळातल्या ज्वालामुखीच्या उद्रेकातून बाहेर पडलेला लाव्हा रस वाहात असतानाच गोठला. वाहाणाऱ्या पाटातल्या पाण्याची एक साखळी दिसते तशीच ही दिसतेय.'' वाहात्या पाण्याच्या आकारातच तो खडक बनला होता.

''अरे होय. मलाही आठवलं आता. आपण तिघांनीही ते पुस्तक वाचलं होतं. थांबा जरा, मी एक काम करतो..'' म्हणत पास्कूनं आपल्या पँटीच्या खिशातून मोबाईल काढला त्या खडकाचे, गोठलेल्या थेंबांचे, ओघळांचे असे बरेच फोटो घेत म्हणाला, ''तुझ्या प्रकल्पातून या फोटोंचा तू वापर कर. तुला जमतील तेवढे फोटो मी देईन. तुझ्या निबंधाला पारितोषिक मिळायलाच हवं.'' पास्कूच्या मुंबईच्या काकांनी तो मोबाईल त्याला दिला होता.

''पारितोषिकांचं सोड; पण तुमचे विषयही तेवढेच महत्त्वाचे आहेत. आपल्या तिघांच्या निबंधांतून आपल्या गावाचं सुंदर आणि माहितीपूर्ण चित्र तयार होणार, हे महत्त्वाचं. खरंच आपले टेंगशे सर खूप विचारी, दूरदर्शी आहेत.''

झालंही तसंच. तिघांचेही ते दीर्घ प्रकल्प पारितोषिक प्राप्त तर ठरलेच आणि त्या तालुक्यातील सर्व विद्यालयांना एक वेगळा आदर्श मिळाला. तेच महत्त्वाचं होतं. त्या तिघांनी गावाच्या विकासासाठी त्या करमळी गावाची बारीकसारीक तपशिलांसह पूर्ण ओळख त्या प्रकल्पात करून दिली होती. त्यांचं प्रेरणास्थान होतं टेंगशेसर!

●●●

**– हरिहर आठलेकर**
२९३ सी., भटवाडी, सावंतवाडी



**गुलाब, जाई, जुई, मोगरा, चाफा, शेवंती। बागेमाजी एकसुराने, फुलूनिया झुलती।।**

**अधिक जाणून घ्या : खटौरा उत्सव –** उत्तराखंड (सप्टेंबर), शेकोटीत काकड्या अर्पण करत रंगीत झेंडे घेऊन पारंपरिक नृत्य.



सर्व दिशांनी विकसित होवो, हाच आहे ध्यास, **'छात्र प्रबोधन'**च्या वाचनाने लाभो सद्गुणांचा सहवास.

विद्यार्थी विशेषांक

## लिहिते व्हा...

**छात्र प्रबोधनच्या विद्यार्थी विशेषांकासाठी (सौर आषाढ, जुलै २०१४) खालील साहित्य प्रकारातील वैविध्यपूर्ण, सकस साहित्य मागवण्यात येत आहे.**

- **कथा, कविता, ललित**
- **मुलाखत** - तुमच्या गावातील पाणी पुरवठा, कचरा, सांडपाण्याचे व्यवस्थापन यांसारख्या कोणत्याही एका समस्येचा अभ्यास करा. त्याच्याशी संबंधित प्रशासकीय अधिकारी/त्या संदर्भात काम करणारा सामाजिक कार्यकर्ता यांची मुलाखत घ्या. त्या समस्येचे व मुलाखतीचे तुम्ही शब्दांकन करा.
- **अनुभवपर** - 'त्यावेळी मी बोलायला हवं होतं...' अनेकदा आपण भीती, संकोच, चूक दडवण्याची धडपड यांमुळे स्पष्ट बोलत नाही. त्याची परिणती काही वेळेला गैरसमज होणं, मैत्री-माणसं तुटणं, क्वचित प्रसंगी न केलेल्या चुकीला आपल्याला जबाबदार धरलं जाणं; अशाप्रकारे होते. ...वेळीच बोललो असतो/बोलले असते तर... असं त्यावेळी अगदी मनापासून वाटतं. असाच तुमचा एखादा अनुभव शब्दबद्ध करा. शब्द मर्यादा ३०० ते ५०० शब्द.
- नावीन्यपूर्ण, मौजमजेचे, पटकन खेळता येणारे सामूहिक खेळ
- मुखपृष्ठासाठी चित्र

**साहित्य व चित्रे पाठवण्याचा अंतिम दिनांक १० मे २०१४**

***याशिवाय मासिकाच्या संपादनात ज्यांना रस असेल, शिवाय सुट्टीत रोज येऊन अंकासाठी जे वेळ देऊ शकतील अशांनी आपली नावं 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात २५ एप्रिल २०१४ पर्यंत जरूर नोंदवावीत. काही शंका असल्यास 'छात्र प्रबोधन'च्या संपादक विभागात संपर्क साधावा.***

## *होताय नं सहभागी...?* (इयत्ता ८ वी ते १२ वीच्या मुला-मुलींसाठी)

**मागील अंकात केलेल्या आवाहनानुसार तुमची सुट्टी अर्थपूर्ण व आनंददायी करण्यासाठी छात्र प्रबोधनच्या उपक्रमांत सहभागी व्हा.**

१. **छात्र प्रबोधन - जोडीकार्य उपक्रमात सहभागी व्हा !** तुमच्याच गावात विविध प्रकारचे अनुभव तुमच्या गतीनुसार, वेळेनुसार घेण्याची विशेष संधी ! साहस, संवाद व बुद्धिच्या विविध पैलूंना खाद्य देणाऱ्या ७ अनुभवांची साखळी तुम्ही पूर्ण करायची आहे. यात भाग घेणाऱ्या प्रत्येकाने 'छात्र प्रबोधन'चे सभासद असणे आवश्यक आहे. या उपक्रमासाठी तुमच्या वयाची किंवा थोडी छोटी-मोठी जोडी ठरवा. ती जोडी मुलामुलांची अन् मुलीमुलींची अशी असावी. जोडी ठरली की खालील क्रमांकावर दूरभाष करा. प्रत्येकवेळी तुम्हाला एक काम सांगितले जाईल. ते पूर्ण झाल्याचे दूरभाष करून सांगितले की पुढचे काम मिळेल. अशी एप्रिल-मे मिळून ७ कामे पूर्ण केली की मे अखेरीला/जूनमध्ये ३ दिवसांची साहस सहल असेल. त्याबाबतचे तपशील पुढील अंकात कळतील. तेव्हा होताय ना सहभागी? मागील वर्षी वेगवेगळ्या गावातील सुमारे ४६ मुलामुलींनी या उपक्रमाचा लाभ घेतला व दिलेली कामे यशस्वीरित्या पूर्ण करून सुट्टी खरोखरच अर्थपूर्ण केली.

२. **'कार्यानुभव' घ्या... समृद्ध व्हा... 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात या आणि कामातील 'मजा' अनुभवा!** **दि. ५ ते १५ मे २०१४ च्या दरम्यान ११ ते ४** या वेळात नवीन शिकण्याचा अनुभव घेण्यासाठी जरूर या.

**वरील उपक्रमांसाठी आपली नावं 'छात्र प्रबोधन' कार्यालयात २५ एप्रिल २०१४ पर्यंत नोंदवावीत.**

**संपर्क - शुभांगी सोलापूरकर, सुलभा कुलकर्णी - ०२०- २४२०७१७४/१७९, सकाळी १२.०० ते ४.००**



भरभरणारा अल्लड वारा, भुरेबावरे वर आभाळ। पागल मोहरले गुलमोहर, दुरांत भरतो पंचम कोकीळ ।।



**अधिक जाणून घ्या : मारवाड उत्सव** - राजस्थान (सप्टेंबर, ऑक्टोबर), उंटाचे चित्र हातावर गोंदणे, लोककला व लोकनृत्य.

**'छात्र प्रबोधन'**च्या रूपाने मंत्र आम्हा लाभला, यशस्वी होण्याचा चंग आम्ही बांधला.

# संवाद कौशल्य

लेखांक – १०

## मुलाखत–एक संवाद !

–.विजय जोशी

मित्रांनो, आपण अनेकदा वर्तमानपत्रात किंवा एखाद्या मासिकात काही व्यक्तींच्या मुलाखती वाचतो, कधी–कधी दूरदर्शन किंवा रेडिओवर मुलाखत पाहतो/ऐकतो! काही मुलाखती आपल्याला आवडतात, आपल्यावर प्रभाव पाडतात ! मुलाखत देणाऱ्या व घेणाऱ्या व्यक्तीची तारीफ करावीशी वाटते! खरंतर 'मुलाखत' हा एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी प्रकटपणे साधलेला औपचारिक संवादच असतो. मात्र तो संवाद सहज, अनौपचारिक वाटावा, आशयाच्यादृष्टीने प्रभावी ठरावा यासाठी काही गोष्टी आत्मसात करायला हव्यात. म्हणूनच मुलाखतीची काही तंत्रे, बारकावे या लेखात आपण जाणून घेऊयात.

प्रथम, मुलाखत म्हणजे काय ते समजून घेऊ. **जेव्हा आपण एखाद्या विशिष्ट क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीला प्रश्न विचारून तिच्या जीवनाबद्दल, विशेष कार्याबद्दल माहिती घेतो, हे कार्य करण्यामागच्या त्या व्यक्तीच्या प्रेरणा, भावना, श्रद्धा जाणून घेतो, वेळप्रसंगी त्याच्या कामाची चिकित्सा करतो, स्पष्टीकरण मागतो. त्या एकूण प्रक्रियेला मुलाखत म्हणता येईल.** एकूण मुलाखत १) लिखित स्वरूपात लोकांसमोर ठेवता येते किंवा २) प्रत्यक्ष लोकांसमोर सादर करता येते. अर्थात दोन्हीकडे प्रक्रिया तीच असली, तरी मुलाखत देणारा व घेणारा, यांच्या क्षमतांचा भिन्न कस लागतो ! आपण या लेखात मुख्यत: मुलाखतीच्या लिखित स्वरूपाबद्दल अधिक विचार करणार आहोत.

थोडक्यात, **या प्रक्रियेत मुलाखत देणारा व घेणारा असे दोन प्रत्यक्ष महत्त्वाचे घटक आहेत**. या शिवाय ज्या विषयांसंबंधी (त्या व्यक्तीचे कार्यक्षेत्र–खेळ, राजकारण, साहित्य वगैरे) चर्चा होणार आहे त्या विषयाचे मुलाखत घेणाऱ्याचे ज्ञान, संवाद साधण्याची पद्धत इ. पूरक घटक आहेत हे ध्यानात येईल. याशिवाय महत्त्वाचा तिसरा घटक म्हणजे या मुलाखतीचा लाभ ज्यांना होणार आहे, त्या लोकांच्या काय अपेक्षा आहेत, त्यांचे या विषयाचे ज्ञान, कोणते तपशील मुलाखतीद्वारा जाणून घेण्याची त्यांना इच्छा आहे. मुलाखत उत्तम होण्यासाठी या घटकांचा विचार होणे आवश्यक आहे. मुलाखत या प्रक्रियेचे ३ महत्त्वाचे टप्पे आहेत–अ) मुलाखतीची पूर्वतयारी आ) प्रत्यक्ष मुलाखत इ) मुलाखतीनंतर..

**अ) मुलाखतीची पूर्वतयारी :** या टप्प्यात आपण पुढील माहिती/प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे असते.

१. **मुलाखत –** आपल्याला कशा प्रकारची मुलाखत हवी आहे. लिखित स्वरुपात, प्रत्यक्ष सर्वांसमक्ष, प्रकट सादरीकरण

२. **मुलाखतीचा उद्देश काय? –** व्यक्तीची माहिती–स्वभाव, त्याच्या कार्याविषयी माहिती, कार्याचे महत्त्व काय ? इ.ची. माहिती मिळवणे, मनोरंजन, चिकित्सा करणे.

३. **मुलाखतीचा लाभ घेणारा गट –** वयोगट, त्यांच्या गरजा व अपेक्षा यांनुसार प्रश्नांची निवड करणे.

*आपण एक उदाहरण घेऊन या. राजेशच्या शिक्षकांनी आपल्याला विविध सेवा पुरवणाऱ्या व्यक्तींपैकी एकाची मुलाखत घेण्यास सांगितली आहे. राजेशने पोस्टमनकाकांची मुलाखत घ्यायचे ठरवले आहे. मुलाखत शालेय नियतकालिकात प्रसिद्ध होणार आहे. अर्थातच मुलाखत लिखित या प्रकारातील आहे.*

राजेशच्या माहितीनुसार, पोस्टमन काका सर्वांशी नीट वागणारे, हसतमुख व बोलके आहेत. वयाने साधारण ४५–५० वर्षांचे आहेत. राजेशच्या शाळेतल्या मित्रांना पोस्टमन काकांच्या जीवनाबद्दल, त्यांच्या कामाबद्दल माहिती करून देणे हा मुलाखतीचा उद्देश होता. त्याचबरोबर काम करताना काकांना येणाऱ्या अडचणींबद्दल, पोस्टमन काकांच्या लोकांकडून काय अपेक्षा आहेत? याबाबत माहिती मिळवायची होती. राजेशने त्यानुसार काही मित्रांशी, शिक्षकांशी बोलून प्रश्न तयार केले. कागदावर क्रमवार लिहून



घमघमला सुगंध, आला परंतु कुठून। अहा ! केवढी ही झाडे, पूर्ण गेली मोहरून ।।

**अधिक जाणून घ्या : दसरा उत्सव –** हिमाचल प्रदेश (ऑक्टोबर), भगवान रघुनाथजी उपासना.

काढले. प्रत्येक प्रश्नाखाली लिहायला मोकळी जागा सोडली. प्रत्यक्ष बोलताना उपयोगी पडेल म्हणून त्यांची मुलाखत ध्वनिमुद्रित करण्यासाठी बाबांचा भ्रमणध्वनी बरोबर घ्यायचे ठरवले. मुलाखत वाचनीय व आकर्षक झाली पाहिजे, असे राजेशच्या बाबांनी सुचवले होते.ते लक्षात ठेवून, पोस्टमन काकांना त्यांच्या कामातील काही गमतीदार प्रसंग विचारायचे, असे राजेशने ठरवून ठेवले होते.

**आ) प्रत्यक्ष मुलाखत:** यामध्ये प्रस्तावना, प्रत्यक्ष प्रश्नोत्तरे व समारोप असे तीन छोटे टप्पे असतात.त्यानुसार राजेशने प्रस्तावना करताना आपला परिचय व भेटीचा उद्देश्य सांगणे अपेक्षित होते. शिक्षकांशी झालेल्या चर्चेतून लक्षात ठेवण्याच्या गोष्टी व सूचनांची राजेशने नोंद करून ठेवली.

१. नैसर्गिक असा सहज संवाद साधणे.
२ स्वत: कमी बोलून, मुलाखत देणाऱ्याला बोलते करणे
३. विषयांतर होऊ न देता थोडक्यात बोलणे.
४. प्रश्नांची योग्य योजना/मांडणी करणे.
५. मुलाखत देणाऱ्याला मध्येमध्ये 'हो', 'बरोबर!' असे प्रतिसादात्मक बोलणे.
६. मुलाखतीचे शक्यतो ध्वनिमुद्रण करणे.
७. प्रसंगानुसार प्रश्नांमध्ये योग्य ते बदल करण्याची तयारी ठेवणे, थोडा विनोदाचा वापर यामुळे मुलाखत रुक्ष होणार नाही.
८. त्या व्यक्तीचे म्हणणे थोडक्यात टिपून ठेवणे इ.

राजेश या दृष्टीने तयारी करत होता. आता मुलाखतीचा दिवस जवळ येत होता. मुलाखतीच्या एक दिवस आधी आई म्हणाली, ''राजेश, वाटलं तर मी पोस्टमनकाका आहे असं समजून एक मुलाखत घेऊन पाहा. म्हणजे तुला थोडा सराव होईल.'' राजेशला पण ती कल्पना आवडली व त्याने आईची मुलाखत घेतली. मुलाखत घेऊन झाल्यावर; **बोलण्याचा वेग फार संथ नको आणि फार भरभरही नको, स्पष्ट शब्दोच्चार आणि बोलण्याची लय याचे भान मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीने ठेवावे,** अशी आईने त्याला सूचना केली. हे ऐकून राजेशला खूप बरे वाटले त्याचा आत्मविश्वास दुणावला !

मुलाखत पोस्ट ऑफिसच्या मागील एका खोलीत होती. सुदैवानं राजेश पोचला तेव्हा पोस्टमनकाका एकटेच होते. ५-१० मिनिटात हातातलं काम संपवून त्यांच्या मुलाखतीला सुरुवात झाली. राजेशने व्यवस्थित तयारी केल्यामुळे १५ ते २० मिनिटात मुलाखत पार पडली. मुलाखत रंजक होण्यासाठी राजेशने प्रश्नांचा योग्य तो विचार करून ठेवला होता. पोस्टमन काकांनी नोकरीच्या सुरुवातीस आडनावांच्या गोंधळामुळे झालेल्या गमती जमती सांगितल्या. आता प्रत्येकाची पत्रपेटी असल्याने प्रत्यक्ष लोकांची भेट होत नाही ह्याबद्दल पोस्टमनकाकांनी थोडी खंत व्यक्त केली. मुलाखत संपवून राजेश आनंदाने परत आला. मुलाखत घेणे केवढे आव्हानात्मक काम आहे असे त्याला वाटले.

**इ) मुलाखतीनंतर :** मुलाखत तर चांगली झाली होती. आता राजेशच्या पुढे १) ध्वनिमुद्रण व लिहिलेल्या मुद्द्यांचा वापर करून मुलाखत लिहून काढणे २) काही मुद्दे स्पष्ट झाले नसल्यास किंवा एखादा महत्त्वाचा प्रश्न विचारायचा राहिला असेल तर पोस्टमनकाकांना फोन करून विचारणे ३) त्याप्रमाणे मजकुरात भर घालून, बदल करणे. लिहिलेला मजकूर नीट वाचून, शुद्धलेखन तपासणे. नंतर आवश्यक ते बदल करणे, अशी कामे होती.

यानुसार राजेश कामाला लागला. आवश्यक तिथे आई, बाबा, शिक्षकांची मदत घेतली. आता त्याची मुलाखत शालेय नियतकालिकासाठी द्यायला तयार झाली.

पूर्वतयारी करून मुलाखत घेण्याचा तसेच ती मुलाखत शब्दबद्ध करण्याचा आत्मविश्वास, अशाप्रकारे मुलाखत घेतल्यामुळे राजेशमध्ये निर्माण झाला.

•••

**– विजय जोशी**
इ -४/८०१, शिवसागर रेसिडेन्सी, आनंदनगर,
सिंहगड रस्ता, पुणे - ५१

**मुलाखत घेऊन पाहा.**

लेखात सांगितलेलं मुलाखतीचं तंत्र वापरून या सुट्टीत खालीलपैकी एकातरी व्यक्तीची मुलाखत घ्या. तुम्ही घेतलेली मुलाखत शब्दबद्ध करून 'छात्र प्रबोधन'कडे जरूर पाठवा.

**१)** आपल्या परिचयाचा भाजी विक्रेता
**२)** भारतीय लष्कर सेवेत काम करणारा जवान किंवा अधिकारी
**३)** गिर्यारोहण करणारे तरुण **४)** पोलिस इन्स्पेक्टर
**५)** समाज सेवक **६)** वर्तमानपत्राचे वार्ताहर

हिरव्या रानी फुलाफुलातून, गीतभ्रमर गुणगुणती। आम्रतरुवर बसून कोकीळ, वसंतकूजन करिती।।

**अधिक जाणून घ्या : नवरात्री उत्सव** – गुजरात (ऑक्टोबर), नऊ रात्री विविध गरबा, दांडिया रास यांचे सादरीकरण.

## पक्षी जगत

## शृंगी घुबड : *परफेक्ट किलींग मशिन*



शृंगी घुबडाचा चेहरा इतर पक्ष्यांसारखा निमुळता नसून पुढून सपाट असतो. त्यामुळे डोळे आपोआपच समोर बघणारे विकसित झाले आहेत. डोळे टपोरे - मोठे व पुढच्या भागात. त्यामुळे या घुबडांना अंधारात भक्ष्याचे स्थान बरोबर कळते. पिवळ्या-तपकिरी शरीरावर गडद तपकिरी धब्बे या रंगसंगतीमुळे झाडात वा खडकावर बसलेले घुबड सहजी कळत नाही. या पक्ष्याला कानांच्यावर शिंगासारखी भासणारी पिसांची रचना आहे. ही पिसे फिस्कारून प्रतिस्पर्ध्याला आव्हान देण्यासाठी त्याचा उपयोग होतो. त्याची मजबूत बोटे, बोटांच्या टोकाशी टोकदार नखे यामुळे भक्ष्यांची पकड घेणे वा त्यास उचलून वाहून नेणे तुलनेने सोपे जाते.


---



**क्वेलिया - अबब ! केवढी ही संख्या**

आफ्रिकेतल्या सॅव्हाना गवताळ रानात तांबड्या चोचीचा क्वेलिया हा आपल्या सुगरण पक्ष्याच्या कुळातला पक्षी सहजी दिसतो. या पक्ष्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे प्रचंड मोठे थवे ! एकेका थव्यात किमान दहा हजार पक्षी असतात. या पक्ष्यांचा आकाशात उडणारा थवा एखाद्या टोळधाडीसारखा दिसतो. थव्याने उडताना त्यांचे कसब असे की एक पक्षी दुसऱ्याला बिलकूल धडकत नाही. एक पक्षी वळला की बाकी सगळे वळतात. एक पक्षी पिकावर उतरला की सगळा थवा खाली उतरतो. दिवसा वेगवेगळे फिरणारे थवे. रात्रीच्या मुक्कामासाठी एखाद्या परिसरात, वृक्षांवर वा राईमध्ये एकत्र येतात. आफ्रिकेतील या जातीच्या क्वेलियांची एकूण संख्या सुमारे १५० कोटी असावी असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

– **संजीव नलावडे**, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे




## मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य– भारोतेरी माटीर घोरे (बंगाली गीत)

**गीताचा भावार्थ**

भारतमातेच्या पवित्र मातीच्या कणाकणातून, डोलणाऱ्या शेतातील पिकांमधून आणि दुथडी भरून वाहणाऱ्या नदीच्या दोन्ही काठांवरून जणू सुरेल बासरीची धून ऐकू येते. श्रीकृष्णाच्या बासरीच्या जादुई स्वरांनी जशी गुरे-वासरे धुंद होतात, अगदी तसाच आनंद आम्हालाही मिळतो.

दिवेलागणीची वेळ झाल्यानंतर आम्ही गोठ्यात, देवाजवळ आणि तुळशीजवळ जेव्हा सांजवात लावतो; तेव्हा आम्हाला खूप आनंद मिळतो. जणू त्या चिमुकल्या ज्योतीने अंधार भेदण्याचे बळ आम्हाला मिळते. रात्रीच्या वेळी मंद वाहणाऱ्या वाऱ्यासोबत लोकसंगीत कानावर पडतं, नकळत पाय ठेका धरतात. पहाटेच्या वेळी आम्ही जेव्हा साखरझोपेत असतो; त्यावेळी पक्ष्यांची किलबील सुरू होते. रात्री आईची अंगाई आणि पहाटेचा पक्ष्यांचा किलबिलाट या स्वर्गीय स्वरांची तुलना कशाशी बरे करावी? माझ्या गावच्या नदीतून वाहणाऱ्या पाण्याचं आणि त्याच्या लाटांवर हेलकावणाऱ्या नावेचं लयबद्ध संगीत मनाला आनंद देतं. 'विविधतेत एकता' हे तर आमच्या देशाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. मग त्या आपल्या देशातील नद्या असोत वा भाषा किंवा इथला निसर्ग ! मी या देशात जन्माला आलो हे माझं सद्भाग्यच! 'हे ईश्वरा या देशात मला पुन: पुन्हा जन्म मिळूदे !'

(या गीताची चाल छात्र प्रबोधनच्या संकेतस्थळावर ऐका. सुट्टीत ऐकून, पाठ करून ती आपल्या गावातील बंगाली मित्र-मैत्रिणींना जरूर म्हणून दाखवा अन् त्यांची शाबासकी मिळवा.)

– **कु. मुग्धा कुलकर्णी**, सरस्वती विद्यालय, कराड
(छात्र प्रबोधनतर्फे आयोजित स्फूर्तिगायन स्पर्धेत सहभाग)



**झाडे झाली हिरवीशी, शीळ घुमते रानात। ओल जांभळ्या मेघांची, वाहे नदीच्या पाण्यात।।**

**अधिक जाणून घ्या : दुर्गा पूजा –** पं. बंगाल (ऑक्टोबर), दुर्गा, सरस्वती, लक्ष्मी, गणेश यांच्या प्रतिमांच्या भव्य मिरवणूका.



**मातृभाषेचा करू आम्ही आचारातून प्रचार, 'छात्र प्रबोधन' देई तुम्हा हा प्रेरक विचार.**






असा अलौकिक चित्रकार हा, कुणी देखिला आहे का? । नयनोत्सव जो सदा रंगवी, कुठे कुंचला आहे का? ।।



**अधिक जाणून घ्या : कथिगलदीपम् उत्सव** – तामिळनाडू (नोव्हेंबर), दीपोत्सव.

**स्थल, काल, परिस्थितीचे करुया चिंतन । 'छात्र प्रबोधन' करी विचारांचे मंथन.**

# अद्‌भुत अरुणाचल !!

– अभिजित हजारे



‘अरुणाचल प्रदेश’, हे नाव उच्चारताच डोळ्यांसमोर येतात उंच उंच पर्वतरांगा, ब्रह्मपुत्रेचं पात्र आणि निसर्गाने जणू सौंदर्याची उधळणच केली आहे असं ठिकाण. हे सर्व डोळ्यासमोर येत असताना अरुणाचलचं आणखी एक चित्र उभं राहतं; ते म्हणजे अविकसित असलेलं एक राज्य, भारत आणि चीन यांच्यातील सीमावाद – त्यामुळे निर्माण होणाऱ्या खूप साऱ्या समस्या!!

नुकतंच अरुणाचल प्रदेशमधील ‘रोईंग’ आणि ‘हुन्ली’ येथे जाऊन आलो. पण संदर्भाशिवाय ही ठिकाणी कोठे आहेत, हे जाणकारांशिवाय कोणालाच समजणार नाही. अरुणाचलमधील ‘लोअर दिबंग व्हॅली’ या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण रोईंग आहे आणि याच जिल्ह्यात पूर्वेकडे भारत–चीन सीमेलगत वसलेले हुन्ली हे अति दुर्गम गाव. जिज्ञासा, उत्सुकता आणि मनात अरुणाचलविषयी खूप प्रश्न होते.

मनातील याच प्रश्नांची उत्तरे शोधण्याची संधी पुण्यातील ‘ज्ञान प्रबोधिनी’ या संस्थेमार्फत चालविलेल्या ‘ज्ञान सेतू’ या उपक्रमाने दिली. ‘ज्ञान सेतू’ या उपक्रमाचा हेतू म्हणजे ज्ञानाच्या माध्यमातून दूर असलेल्या लोकांशी जोडून घेण्यासाठी टाकलेले एक पाऊल. असंच एक पाऊल आमच्या ११ जणांच्या गटानं ५ डिसेंबर २०१३ रोजी अरुणाचलकडे टाकलं. आता सुरू झाला ३ रात्री आणि ४ दिवसांचा ४५०० कि. मी.चा प्रवास. विविधता आणि त्यात गुण्यागोविंदाने राहणारी माणसं, ही भारताची खासियत आहे. हीच खासियत मला रेल्वेमध्ये अनुभवायला मिळाली. ही विविधता पाहताना डोक्यात एकच वाक्य घुमत होतं.

*‘पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड , उत्कल बंग.’*

८ डिसेंबर २०१३ रोजी आम्ही गुवाहाटीमध्ये पोहोचलो. गुवाहाटीमध्ये फिरताना जणू आपण सैन्याच्या कॅम्पमध्येच आहोत की काय, असं वाटत होतं. पण हे सर्व ‘का आणि कशासाठी’ हा प्रश्नही डोके वर काढत होता. दि. ९ डिसेंबर २९१३ रोजी सकाळी ४.३० वाजता न्यू तिनसुकियापासून ‘रोईंग’चा प्रवास सुरू झाला. एक थरारक प्रवास! ब्रह्मपुत्रा एक प्रचंड मोठी नदी आणि तितकेच मोठे तिचे पात्र आम्ही बोटीने पार केले. बोटीमधून बस, जीप, २ व्हिलर गाड्याही पात्र पार करत होत्या. ब्रह्मपुत्रेवरील रखडलेल्या पुलाच्या बांधकामामुळे ही तारेवरची कसरत करावी लागते.

आता वेळ होती अरुणाचलमध्ये प्रवेश करण्याची. आसाममधून ‘लोअर दिबंग व्हॅली’मध्ये प्रवेश करताना ‘शांतीपटू’ गेटवरती प्रवेश परवाना आणि इतर ओळखपत्रांची तपासणी होते. दुसऱ्या राज्यातील लोकांना अरुणाचलमध्ये प्रवेश घेण्यासाठी परवानगीची गरज लागते, या गोष्टीचा मनस्वी राग येत होता. आमच्याच देशातील भागात जायला परवानगीची गरज काय? पण परवानगीची का गरज आहे हे आम्हाला रोइंगचे आयोजक कोमिनी मेटो आणि आय. ए. एस. अधिकारी संदीप सिंग यांनी समजावून सांगितलं आणि ते आम्हाला पटलंही. तेव्हा डोळ्यासमोर आलं, सिमला आणि उटी येथील मानवी हस्तक्षेपामुळे लोप पावणारे नैसर्गिक सौंदर्य. हाच मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी, निसर्गाच्या संरक्षणासाठी ‘प्रवेश परवानगी’ची गरज आहेच; अन्यथा येथील हिमालयाच्या सुंदर रांगांवरती आलिशान हॉटेल्स उभी राहिली असती.



लवलव हिरवीगार पालवी, काट्यांची वर मोहक जाळी। घमघम करती, लोलक पिवळे, फांदीवर काळोखी काळी।।



**अधिक जाणून घ्या : पुरी बीच उत्सव –** ओरिसा (नोव्हेंबर), समुद्री दगड, शिंपले, शंख व समुद्री वाळूच्या शिल्पांचे प्रदर्शन.

**काळासंगे धावण्यासाठी धरावी विज्ञानाची कास, सभासद होऊन ‘छात्र प्रबोधन’चे मिळतो हा विश्वास.**



अरुणाचलमधील आमच्या कामाची सुरुवात तेथील शाळांमधून झाली. 'जर बदल घडवायचा असेल तर युवकांपासून सुरुवात करा आणि जर क्रांतीच घडवायची असेल तर लहान मुलांपासून सुरुवात करा.' आम्ही या तत्त्वाचे पालन करत होतो. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना भेटी देत होतो. विज्ञानातील गमती-जमतीची कार्यशाळा घेत होतो आणि त्याचा उपयोग ही मुलं नक्कीच स्वत:चं आणि देशाचं भवितव्य घडवण्यात करतील; अशी आशा करून समाधानाने बाहेर पडत होतो.

एकीकडे आमचे हे शैक्षणिक काम चालू असताना दुसरीकडे आम्ही नकळत तेथील समाजस्थितीही न्याहाळत होतो. अविकसित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या राज्यात मुला-मुलींमध्ये भेद केला जात नाही. त्यामुळे यांना अविकसित म्हणावं तरी कसं? येथे मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जाते आणि आत्मनिर्भर केले जाते, हे दिसत होते. हीच गोष्ट आपली ताकद दुप्पट करू शकते आणि जागतिक स्पर्धेचा आपण समर्थपणे मुकाबला करू शकतो, याची प्रकर्षाने जाणीव करून देत होती. 'अरुणाचली' भारतीय संस्कृतीशी इतके समरूप झाले आहेत की, त्यांना जगातील कोणतीही शक्ती भारतापासून-मातृभूमीपासून विलग करू शकत नाही. मग भलेही ती शक्ती चीन का असेना ! हे जाणवून आम्हाला अभिमान वाटला.

अरुणाचलची युवा पिढी दिसण्यात *मॉडर्न* म्हणण्यापेक्षा *वेस्टर्न* आहे; पण शिक्षणाच्या बाबतीत फारशी प्रगत झालेली दिसत नव्हती. पाश्चात्य संस्कृतीचा वरवरचा प्रभाव त्यांच्या बाह्य आचरणात दिसत असला तरी विचारांच्या पुरोगामीपणाचा अभाव सामान्यत: दिसला.

अरुणाचलची थंडी रक्त गोठवणारी होती. समुद्रसपाटीपासून २६९० मी. उंचीवर बर्फ पडतो. कमी उंची असूनही बर्फ पडण्याचे भौगोलिक कारण आम्हाला समजले नाही. पण तेथील लोकांची श्रद्धा अशी आहे की त्यामागे काही दैवी संकेत असावा.

उंचचउंच पर्वतांच्या दुर्गम रांगांमधून *बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन* (BRO) ने रस्ते बांधणी केली आहे. तेथील रस्ते 'आनिनि' या गावापर्यंत जातात. (भारताचे चीनकडील टोक) पर्यंत जातो. BRO चे ब्रीदवाक्य 'Only sky is the limit' असं आहे. म्हणजे, 'आम्ही फक्त आकाशात रस्ते बांधू शकत नाही.' असंच त्यांना सूचित करायचं असावं. त्यांच्या या रस्ते उभारणीच्या कामाला, त्यांच्या इच्छाशक्तीला सलाम...!!!

असा २६ वेगवेगळ्या जमाती असलेला वैशिष्ट्यपूर्ण अरुणाचल प्रदेश. या एकेका जमातीची लोकसंख्या २० ते २५ हजारांपर्यंत. या प्रत्येक जमातीची वेगवेगळी परंपरा आणि भाषासुद्धा. या भाषा जगातील सर्वात जलद नष्ट होणाऱ्या भाषांपैकी आहेत. या भाषांच्या संवर्धनासाठी सरकारकडून पावले उचलली गेली पाहिजेत. सरकार अरुणाचलमध्ये 'मेगा प्रोजेक्टस्' उभारण्याचे नियोजन करत आहे. पण या प्रोजेक्टसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ अरुणाचलमध्ये नाही. बाहेरून येणारे मनुष्यबळ हे एकेका जमातीच्या लोकसंख्येइतके असेल. मग या मूळ जमातीच्या लोकांच्या अस्तित्वाचं काय? या विकासाच्या गर्दीत त्यांचे अस्तित्वच विरून जाऊ नये, इतकीच अपेक्षा...

•••

**– अभिजित हजारे**
दत्त कॉलनी, पो. बेडग, ता. मिरज, जि. सांगली 416410
abhijithajare@india.com



माझ्या आनंद लोकात, केले वसंताने घर। आंब्याआंब्याच्या फांदीला, फुटे कोकिळेचा स्वर।।





**अधिक जाणून घ्या : गुरुनानक जयंती –** पंजाब (नोव्हेंबर), शीख प्रभात फेऱ्या व लंगर.


'छात्र प्रबोधन'सवे घेऊ झेप आकाशात, चंद्र सूर्यासवे गाणे गाऊ आनंदात.


# चौकोनी ठोकळ्यांची किमया


१९५० च्या सुमारास 'पिएट हाइन'या डॅनिश लेखकाने 'सोमा क्युब्स्' हा खेळ तयार केला. तुम्हीही हा खेळ घरच्या घरी तयार करू शकाल. या खेळासाठी एकूण २७ एकसारखे घन ठोकळे लागतात. तुम्ही लाकडाचे अथवा प्लॅस्टिकचे तयार ठोकळेही वापरू शकाल. ते तुम्हाला स्वत: तयार करायचे असल्यास बाजारामध्ये २ सें.मी. ह्न २ सें.मी. आकाराची इलेक्ट्रिक वायरिंगसाठी वापरली जाणारी बॅटन पट्टी मिळते; ती १ मिटर लांबीची पट्टी विकत आणा.त्याचे २-२ सेंमी.चे तुकडे तयार करा. सँडपेपरच्या साहाय्याने घासून, बरोबर २ सें.मी.ह्न२ सें.मी. ह्न२ सें.मी. या आकाराचे २७ घन तुकडे तयार करा. खालील आकृतीत दाखवल्याप्रमाणे ते फेव्हिकॉलने चिकटवून ७ आकार तयार करा.





















आता या सात आकारांच्या आधाराने पुढे दिलेल्या काही रचना तयार करून बघा.त्रिमितीची समज वाढायला या खेळाचा निश्चितच खूप उपयोग होईल.लहान-मोठे-सर्वांना हा खेळ वेड लावेल,यात शंकाच नाही.



या खेळावर प्रभुत्व मिळविण्यासाठी प्रारंभी दोन आकार घेऊन,त्या आधारे शेजारील आकृतीप्रमाणे पायरी तयार करा.एकदा हे जमलं की मग या सात आकारांच्या आधारे एका मोठा घन तयार करा. त्यातल्या त्यात ही एक सोपी रचना आहे. वेगवेगळ्या २३० पद्धतींनी हा मोठा घन तयार करता येतो. तुम्ही किती पद्धतींनी तो तयार करू शकाल?ते तुमचे तुम्हीच तपासून पाहा.

हे सात आकार वापरून वर दिलेल्या सोडून, अन्य कितीतरी रचना तुम्हीसुद्धा तयार करू शकाल.

अजून एक गमतीशीर गोष्ट अशी आहे, की एकूण सात आकारांपैकी १ क्रमांकाचा आकार बाजूला ठेवला तर उरलेल्या आकारांचा वापर करून तुम्ही अगदी १ क्रमांकाच्या आकारासारखीच रचना तयार करू शकाल आणि त्याची उंची १ क्रमांकाच्या आकाराच्या दुप्पट असेल.

मग खेळ तयार करा अन् डोकं वापरून त्रिमितीमध्ये मनसोक्त रमून जा.तुम्हाला काही नवीन रचना सुचल्या तर आम्हाला अवश्य कळवा!

●●●


**- डॉ. अरविंद गुप्ता**

arvindtoys@gmail.com



(सायन्स रिपोर्टर, फेब्रुवारी ९९च्या सौजन्याने)

(छात्र प्रबोधन पूर्वप्रसिद्धी सौर चैत्र शके १९२१/ एप्रिल १९९९)




फुलात न्हाली पहाट ओली, क्षितिजावरती चंद्र झुले। नभात भिजल्या केशरियाचे, रंग फुलांवर ओघळले।।


**अधिक जाणून घ्या : विष्णुपूर उत्सव –** पं. बंगाल (२७ ते ३१ डिसेंबर), हस्तकलेचे प्रदर्शन व विक्री.





गाणं म्हणत जगण्यासाठी, फुलासारखं फुलण्यासाठी, हवं 'छात्र प्रबोधन' हाती.

# छात्र प्रबोधनतर्फे आयोजित स्पर्धा - आढावा व निर्णय

'तुम्हीच संपादक व्हा' ही मराठी व इंग्रजी हस्तलिखित स्पर्धा, गावाचा परिचय करून देणारा पीपीटी तयार करण्याची स्पर्धा (स्लाईड शो) व भारतीय भाषेतील स्फूर्तिगीत समूहगायन स्पर्धा या तीन स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या सर्व मित्र-मैत्रिणींचे प्रथम कौतुक आणि पाठीवर शाबासकीची थाप !

मराठी हस्तलिखित स्पर्धेत यंदाच्या वर्षी इ. सातवी ते दहावीमधील ३३ संघ (सुमारे ३०० विद्यार्थी) महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून सहभागी झाले होते. पुण्याबरोबरच कराड, चाळीसगाव, भंडारा, रत्नागिरी, नाशिक, सांगली, गोवा, कल्याण, नागाव, लातूर, सातारा, निगडी, डोंबिवली, अकोला, चोपडा इ. विविध गावांचे प्रतिनिधित्व स्पर्धेत होते. या सर्वच मुला-मुलींनी आपलं हस्तलिखित उत्तम, दर्जेदार, नावीन्यपूर्ण, नेटकं करण्याचा मनापासून प्रयत्न केला होता. चांगलं अक्षर, चांगली चित्रकला, चांगलं लेखन, चांगलं संपादन अशा वेगवेगळ्या क्षमता, गुण असलेल्या विद्यार्थ्यांचा चांगला गट तयार झाल्याचे हस्तलिखितातून जाणवत होते. गटानं काम करण्याचा विद्यार्थ्यांचा प्रयत्नही खूप चांगला होता. यावेळी हस्तलिखितांच्या स्वरूपात थोडा बदल करण्यात आला होता. हस्तलिखितातील वाङ्मयीन वैविध्य वाढावे यासाठी प्रतिभाशाली लेखन, कल्पना विस्तार, मुलाखत, वस्तूंचे उपयोग या तंत्रांचा वापर करण्यास सांगितला होता. **तसेच २५ पानांचा एक स्वतंत्र विभाग एकाच विषयाला धरून** लिहावयाचा होता. विद्यार्थ्यांनी या नव्या स्वरूपात हस्तलिखित सादर करण्याचा खूप चांगला प्रयत्न केला. हस्तलिखिताबाबत परीक्षकांचे अभिप्राय संबंधित शाळेला स्वतंत्रपणे कळविले जातील. सर्व स्पर्धांमधील प्रथम तीन क्रमांकप्राप्त हस्तलिखिते/कलाकृती छात्र प्रबोधनच्या कार्यालयात पाहाण्यासाठी/ऐकण्यासाठी उपलब्ध आहेत.

इंग्रजी दिवाळी अंक सौर कार्तिक १९३५ (२०१३) मध्ये इंग्रजी हस्तलिखित स्पर्धेचे निवेदन देण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये **ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे येथील ५ संघांनी भाग घेतला होता.** यामध्ये **स्पेक्ट्रम** या हस्तलिखिताची संकल्पना खूपच छान होती. त्यांचे संकलनही उत्तम दर्जाचे आहे. **वंडर्स**मधील कविता आशयाच्या दृष्टीने चांगल्या होत्या.

'पीपीटी' स्पर्धेमध्ये 'आपलं गाव किंवा शहर' या विषयावर 'स्लाईड शो' तयार करावयाचा होता. या स्पर्धेत पुण्याबरोबरच, अकोला, कराड, रायगड, सातारा, औरंगाबाद, चोपडा येथील एकूण १५ गट (४५ ते ५० विद्यार्थी) सहभागी झाले होते. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांनी आपल्या शहराचा अभ्यास केलेला जाणवला. 'स्लाईड शो' तयार करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी शहरातील वस्तूसंग्रहालये, देवळे, सर्व बागा, स्टेशन, बस स्थानक, ऐतिहासिक वास्तू यांच्या माहितीचा वापर केला होता. आपल्या शहराच्या अभ्यासाचा बारकाईने केलेला हा प्रयत्न स्तुत्य होता. काही ठिकाणी मार्गदर्शकांचेही साहाय्य घेतल्याचे जाणवले.

प्रकल्पांचे सादरीकरण, एखादया विषयाची मांडणी करण्यासाठी पीपीटी हे महत्त्वाचे माध्यम आहे. त्यादृष्टीने या तंत्राचा स्पर्धेपुरता विचार न करता आपल्या अभ्यासात त्याचा वापर तुम्ही अधिक प्रभावीपणे कराल हा विश्वास आहे.

'स्फूर्तिगीत गायन या स्पर्धेत इतर दोन स्पर्धांच्या तुलनेने केवळ **५ संघांनी भाग** घेतला. कन्नड, तमिळ, राजस्थानी, बंगाली व गुजराथी राष्ट्रभक्तीपर गीतांचा समावेश यामध्ये केला आहे. सर्वांनी आपापल्या ठिकाणी व्हिडीओ रेकॉर्डिंग करून त्याची सीडी परिक्षणासाठी पाठविली होती. सहभागी विद्यार्थ्यांचा प्रयत्न खूपच चांगला असल्याचे जाणवले. नवनगर विद्यालय, निगडी यांचे तमिळ गीत होते. त्यांचे शब्दोच्चार, गेयता, सादरीकरण चांगले झाले आहे. ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र, लातूर यांनी राजस्थानी गीताचा बाज छान सांभाळला आहे. एकूणच विद्यार्थी वर्गाचा विशेष उत्साह जाणवला.

पुढील वर्षीही तुम्ही सर्वांनी अधिक संख्येनं आणि अधिक गुणवत्तेनं छात्र प्रबोधनच्या नावीन्यपूर्ण स्पर्धांमध्ये सहभागी व्हावं, असे आग्रहाचे आवाहन! (स्पर्धेचा निर्णय शेजारील पानावर पाहावा.)

**स्पर्धांचे परीक्षक -** • हस्तलिखित स्पर्धा-अंजली कर्वे, प्राची गरुड, शामला खळदकर, ज्योती कानेटकर, जयश्री काटीकर, नीलिमा करमरकर, मधुरा लुंकड • पीपीटी स्पर्धा - अभिजित एकंबीकर, रोहिणी ढवळे, चारुता परांजपे • स्फूर्तिगीत गायन स्पर्धा- सिमंतीनी जाहागिरदार, देवेंद्र भोमे

**स्पर्धा समन्वयक - सुलभा कुलकर्णी**

**आला वसंत जेव्हा, हलकेच शीळ आली। रंगीत पाखरांची, उतरून ओळ आली।।**



**अधिक जाणून घ्या : कावडी उत्सव –** तामिळनाडू (डिसेंबर), सजवलेल्या कावड्या घेऊन देवाचा डोंगर चढणे.

**सर्वांगीण विकसनातून मिळवून देण्या आत्मविश्वास, 'छात्र प्रबोधन' मासिकाचा नित्य असे हा ध्यास.**

## स्पर्धा निर्णय

**१. हस्तलिखित स्पर्धा – मराठी :**

**प्रथम क्रमांक** : **‘स्वच्छंद’** फाटक हायस्कूल, रत्नागिरी

**द्वितीय क्रमांक** : **‘अक्षरजीवन’** बाल शिवाजी माध्यमिक शाळा, अकोला
(संयुक्तपणे) **‘अंगण’** लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे

**तृतीय क्रमांक** : **‘दोस्ती गणिताशी’** सरस्वती विद्यालय, कराड
(संयुक्तपणे) **‘ऋतुपर्ण’** तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव

**उत्तेजनार्थ** : १. **‘तरंग’** नवनगर विद्यालय, निगडी–पुणे २. **‘झेप’** के. रा. केतकर माध्यमिक शाळा, डोंबिवली ३. **‘हस्तलिखित’** संवाद पाटील, स्वतंत्र गट, जळगाव ४. **‘घे भरारी’** न्यू इंग्लिश स्कूल, सातारा

**२. हस्तलिखित स्पर्धा – इंग्रजी : प्रथम क्रमांक संयुक्त– १. स्पेक्ट्रम २. वंडर्स** (ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे)

**३. माझा गाव/शहर या विषयावर स्लाईड शो(पीपीटी) स्पर्धा :**

**प्रथम क्रमांक :** स्व. शेठ रा. कि. लाहोटी कन्याशाळा, कराड

**द्वितीय क्रमांक :** ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, पुणे

**तृतीय क्रमांक :** मेघना धानोकर गट, बाल शिवाजी माध्यमिक शाळा, अकोला

**४. भारतीय भाषांमधील स्फूर्तिगीत समूह गायन स्पर्धा :**

**प्रथम क्रमांक** : ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र, लातूर (राजस्थानी गीत) **द्वितीय क्रमांक :** सरस्वती विद्यालय, कराड (बंगाली गीत) **तृतीय क्रमांक :** ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, पुणे (तमिळ गीत)

**श्री. दिवाकर बाळकृष्ण बापट** (कै. बाळकृष्ण दत्तात्रय बापट यांचे स्मरणार्थ), **सौ. ललिता लिखिते** (कै. शं. रा. देवळे यांचे स्मरणार्थ) **श्रीमती निर्मला गोपाळ किराणे** (कै. गो. म. किराणे यांचे स्मरणार्थ) या देणगीदारांनी दिलेल्या देणगीच्या ठेवींवरील व्याजातून हस्तलिखित स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकांची पारितोषिके देण्यात आली आहेत. अन्य सर्व पारितोषिके ‘छात्र प्रबोधन’ तर्फे देण्यात आली आहेत. सर्व यशस्वी स्पर्धकांना पुस्तकरूपाने ही पारितोषिके पाठवली आहेत.

## प्रतिसादी वाचकवीर व्हा... १

### हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

दर महिन्याचा ‘छात्र प्रबोधन’चा अंक तुम्ही आवडीने वाचत असालच. या वासंतिक अंकापासून अंकावर आधारित काही प्रश्न दर महिन्याच्या अंकात देणार आहोत. **या वासंतिक अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. ३१ मे२०१४ पर्यंत** ‘छात्र प्रबोधन’कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक आवर्जून बारकाईने वाचाल/पाहाल व अंकातील साहित्याचा अधिक आंनद मिळवाल, असा विश्वास आहे.

१. **‘सुरुवात’** कथेतील निहारच्या आजीच्या स्वभावाचे कोणते पैलू तुम्हाला जाणवतात?
२. **गारपीट** या कथेतील **पान क्र. २१** वरील चित्रातून प्रसंग, निसर्ग, भावभावना व्यक्त करणारा १० ओळींचा परिच्छेद लिहा.
३. **कॅरमच्या खेळात** भौतिक शास्त्राच्या कोणकोणत्या तत्त्वांचा, नियमांचा वापर केला जातो?
४. **‘मचाणा’**वरून निरीक्षण करताना कवयित्रिला निसर्गातील कोणत्या गोष्टी दिसतात?
५. मुलाखतीची कुठली तंत्रे **संवाद कौशल्य** या लेखातून आत्मसात करायला सांगितली आहेत?
६. **सॅलड डेकोरेशनच्या** कलाकृतीतील भाज्यांचा वापर करून नवीन कलाकृती करा व त्याचा फोटो व कृती ‘छात्र प्रबोधन’कडे ई–मेलने पाठवा.

पातळ पोपटी पानांमधून, चैतन्याचं गाणं झुलतं। कोकिळेचा कंठ होऊन, कुणीतरी गाऊन जातं।।

**अधिक जाणून घ्या : बिहू उत्सव –** आसाम, पिकांच्या वेगवेगळ्या तीन हंगामात साजरा करतात.

कृती, संवाद, विचार, मनोरंजन यांचा मेळ म्हणजे ‘छात्र प्रबोधन’.

# ज्ञान प्रबोधिनीतर्फे सुट्टीतील अनिवासी शिबिरे - २०१४

| शिबिराचे नाव | दिनांक / वेळ | वयोगट | तपशील व शुल्क | विभाग-संपर्क |
|---|---|---|---|---|
| १. बालविकास शिबिरे | २१ ते २७ एप्रिल<br>**मे** – ५ ते ११, १२ ते १८, १९ ते २५<br>स. १२ ते दु. ५ | ७ ते १२ वर्षे<br>मुले – मुली | विविध बौद्धिक क्षमतांना चालना देणारे खेळ, प्रकल्प, गटकार्य इ.<br>**शुल्क रु. १५००/–** | **प्रज्ञा मानस संशोधिका**<br>सुजाता होनप<br>९४२०१७८०२०<br>वीणा तिखे<br>८३९०९९८२६३ |
| २. क्षमता संवर्धन शिबिर | २८ एप्रिल ते ४ मे<br>स. १२ ते दु. ५ | ८ वी, ९ वी व १०वीत गेलेले<br>मुले – मुली | बौद्धिक, सामाजिक, भावनिक कौशल्ये व अभ्यास कौशल्ये यांवर आधारित खेळ, प्रकल्प, व्याख्याने, गटकार्य इ.<br>**शुल्क रु. १५००/–** | |
| ३. सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा | २५ एप्रिल ते ५ मे<br>वेळ : स. ८ ते १० | इ. ५ वी ते ९ वी<br>मुले–मुली | **शुल्क रु. १०००/–** | **शैक्षणिक उपक्रम संशोधिका**<br>विनायक माळी<br>९१५८५८४५८७<br>०२०–२४२०७१९३/९४ |
| ४. विज्ञान शिबिर | २५ ते २७ एप्रिल<br>वेळ : स. ११ ते ४ | | **शुल्क रु. ७५०/–** | |
| ५. त्रिमितीची किमया कार्यशाळा | २८ ते ३० एप्रिल<br>वेळ : स. ११ ते ४ | | **शुल्क रु. ७५०/–** | |
| ६. बालविकास शिबिर(शिरूर) | २१ ते २४ एप्रिल | ७ ते १२ वर्षे<br>मुले – मुली | विविध बौद्धिक क्षमतांना चालना देणारे खेळ, प्रकल्प, गटकार्य इ.<br>**शुल्क रु. १,३००/–** | **प्रशांत अवचट,**<br>छात्र प्रबोधन वितरण केंद्रप्रमुख ९८८१०४९४३८ |
| ७. व्यक्तिमत्त्व विकसनासाठी विद्याव्रत संस्कार | २१ ते २७ एप्रिल<br>वेळ: संध्या. ४ ते ७.३० | १३ ते १५ वर्षे<br>मुले – मुली | नोंदणीचा अंतिम दिनांक : १५–४–१४<br>**शुल्क रु. ५००/–** | **संत्रिका विभाग**<br>०२०–२४२०७१४६ |

## तुम्ही काय कराल अन् का कराल...?

अमेय आणि त्याच्या मित्रांनी सुट्टीचे मनसुबे आखायला सुरुवात केली होती. कोकणात एका मित्राच्या घरी २–३ दिवस जायचा बेत मित्रमंडळी आखत होती. अमेयला आईबाबांकडून कोकणात जायला परवानगीही मिळाली होती. अमेय फोटो खूप छान काढत असे. त्यामुळे, ''नवीन कॅमेरा सहलीला घेऊन जाऊ का?'' असं अमेयनं बाबांना विचारलं.

''स्वत:च्या जबाबदारीवर कॅमेरा घेऊन जायला माझी काहीच हरकत नाही'', असं उत्तर बाबांनी त्याला दिलं. बाबांच्या या उत्तरावर अमेय तेव्हा काहीच बोलला नाही. तसा तो मितभाषी आणि थोडा भिडस्तही होताच! पण तिथून पुढे अमेयच्या मनात चलबिचल सुरू झाली... • मित्रांनी कॅमेरा मागितला तर 'नाही' म्हणण्याचं धाडस मला दाखवता येईल का?

- घ्यावं का कॅमेऱ्याच्या जबाबदारीचं लोढणं गळ्यात?
- पण मग निसर्गाचे फोटो काढण्याची आयतीच चालून आलेली संधी मी का सोडायची?
- मोबाईलवर फोटो काढून फोटोंच्या गुणवत्तेत तडजोड का करावी? वगैरे

मित्रांनो, अमेय अजून कुठल्याच निर्णयापर्यंत पोहोचला नाहीये. स्वत: अमेयच्या जागी तुम्ही आहात अशी कल्पना करा बरं... मग अशावेळी तुम्ही काय कराल? आणि तसंच का कराल? असं 'छात्र प्रबोधन'कडे लिहून पाठवा पाहू... तुमच्या निवडक प्रतिक्रियांना 'छात्र प्रबोधन'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.


**– शिल्पा कुलकर्णी**

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ चैत्र, शके १९३६, १ एप्रिल २०१४ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे –२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.


















**या वैशिष्ट्यपूर्ण भारतीय वास्तूंना ओळखा आणि जाणून घ्या त्या वास्तूंचा इतिहास...**



सौर चैत्र, शके १९३६/ एप्रिल २०१४ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ चैत्र, शके १९३६ /१ एप्रिल २०१४
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, Published & Posted at S.P. Post Office On 1st of Every Month

सौर दिनदर्शिका शके १९३६

| | एप्रिल २०१४ | चैत्र वैशाख |
|---|---|---|
| मं. | 1 | ११ |
| बु. | 2 | १२ |
| गु. | 3 | १३ |
| शु. | 4 | १४ |
| श. | 5 | १५ |
| र. | 6 | १६ |
| सो. | 7 | १७ |
| मं. | 8 | १८ |
| बु. | 9 | १९ |
| गु. | 10 | २० |
| शु. | 11 | २१ |
| श. | 12 | २२ |
| र. | 13 | २३ |
| सो. | 14 | २४ |
| मं. | 15 | २५ |
| बु. | 16 | २६ |
| गु. | 17 | २७ |
| शु. | 18 | २८ |
| श. | 19 | २९ |
| र. | 20 | ३० |
| सो. | 21 | वै. १ |
| मं. | 22 | २ |
| बु. | 23 | ३ |
| गु. | 24 | ४ |
| शु. | 25 | ५ |
| श. | 26 | ६ |
| र. | 27 | ७ |
| सो. | 28 | ८ |
| मं. | 29 | ९ |
| बु. | 30 | १० |

## कुमारांच्या कुंचल्यातून...

**'तुम्हीच संपादक व्हा!' या हस्तलिखित स्पर्धेतील काही निवडक मुखपृष्ठे**

(या स्पर्धेचा निकाल आतील पानावर पाहा.)




के. रा. कोतकर विद्यालय, डोंबिवली




लोकमान्य टिळक विद्यालय, गोवा



तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव


ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी



रचना विद्यालय, नाशिक

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

प्रति –

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ २०/–
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/–

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन.